चरित्र

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

वाचनालय )      वाचनालय / संदर्भ / नौपाडा

९१ सन १८९३

फडनीस नाना

खक- धनुधारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)



म. ग्रं. सं. ठाणे
चरित्र
नं. २७९

[redacted] रचित

[redacted]राष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# [redacted] फडणीस नाना.

रामवाडी
मुंबई.

किंमत ६ आणे.

[redacted]हेत.)

## धारी.

या लेखकांचें नांव मा[illegible] नाहीं असा मराठी वाचक विर यांच्या लेखांतील ऐटदार म[illegible] खोंचदार व मार्मिक टीका आ "आपण कोण" याची चट[illegible] पट [illegible]ा तऱ्हेनें वि प्रतिपादनाची खुबी आतां सर्वांच्या चांगल्या पसंतीस उतरली [illegible] खुद्द **सरकारी रिपोर्टांत** यांची भाषा "अगदीं शुद्ध-इडि[illegible] टिक–**आवेशयुक्त** आणि **अभिमानोत्तेजक** असते" [illegible] शेरा मिळालेला आहे. व शिवाय त्याबद्दल सर्वांची खात्री पू[illegible] झालेली असल्यामुळें आह्मीं येथें जास्त लिहिलें पाहिजे असें न[illegible] सदरहू लेखकांकडून बरींच पुस्तकें आह्मीं आजवर लिहविलीं आ[illegible] हेत व लिहिण्याचें काम अद्यापही तसेंच चालू आहे. त्या पुस्त[illegible] कांपासून आमच्या मंडळीच्या मनावर मोठा कल्याणप्रद संस्क[illegible] होण्याचा निश्चितपणें संभव आहे. ह्मणून तीं पुस्तकें सत्वर मिळ-ण्याची आह्मीं मुद्दाम तजवीज योजिली आहे. आजवर सुमारें १५ पर्यंत पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत; त्यांची माहिती येणेंप्रमाणें:—

## धनुर्धारीकृत पुस्तकें विक्रीस तयार.

एकदम दोन रुपयांचीं पुस्तकें घेणारास किंमतीच्या **पाऊण पटीनें** मिळतील. आह्मांकडे **आगाऊ दोन रुपये** ठेवल्यास छापून तयार होणारींही पुस्तकें पाऊणपटीनें मिळतील. [illegible] पे. नें पाठवूं.

### १ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

१ **मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग १. किं. ८=

यांत मराठ्यांनीं हैद्राबादकर नबाबावर केलेल्या मोहिमांच[illegible] ग्रंत हकीकत आहे.

**मराठ्यांच्या मर्दुमकी.** भाग. २. किं. ८≡

म्हैसूरकर हैदरटिपू यांच्याशीं चाललेल्या झुंजांचें व कर्ना[illegible] तील स्वाऱ्यांचें यांत वर्णन आहे.

धनुर्धारीरचित

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

राजकार्यधुरंधरमंडळी—

# १ फडणीस नाना.

"खूप शर्तिनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना"

हें पुस्तक

जनार्दन महादेव गुर्जर

बुक्सेलर आणि पब्लिशर ह्यांनीं

छापून प्रसिद्ध केलें.

सप्तंबर, सन १८९३.

किंमत ६ आणे.

(सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मुंबईंत,
जावजी दादाजी
ह्यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

## [illegible]

## प्रारंभ. [illegible]

चांगल्या पदार्थांचें कौतुक वाटून जिवाला एक प्रकारचा आनंद होणें मनुष्यधर्मास अगदीं साहजिक आहे. आकाशांतील चकचकणारा तारागण, अगाध जलधीच्या महाभयंकर लाटा, सुंदर वनांतील रमणीय पुष्पवाटिका, मधुर फळभारेंकरून नम्र झालेले तरुवर, अमृतोपम जीवनाचा—अर्थात् उदकाचा—सांठा पाठीवर घेऊन नागमोडीवळणानें खळ्खळ् मंद शब्द करीत मोठ्या लगबगीनें धांवत सुटलेल्या नद्या, इत्यादि निसर्गांतील निर्जीव पदार्थांचें दर्शन किती आनंदकारक वाटतें, त्यांच्याकडे घटकाभर नजर फेंकली तर, अनेक काळज्यांनीं व दुर्धर त्रासांनीं, त्रस्त झालेली मानसकलिका कशी उमलून घटकाभर प्रफुल्लित होते, हें कोणास सांगण्याची गरज नाहीं ! हा जो, निसर्गांतील पदार्थ मात्रांच्या अंगांतील मोहक व जनमनोल्हादक धर्म तोच मनुष्यमात्रांत अवर्णनीय व अद्भुत गुणांच्या सहवासानें अतिशयेंकरून आढळतो. हें जग पडलें विनाशी. येथील वस्ति मृत्युलोकची. तेव्हां एकाकालीं दीन दुनयेला थक्क करणाऱ्या किंवा त्याच्या कौतुकास अर्थात्—अभिमानास व योग्य गर्वास पात्र असणाऱ्या वस्तु सदांच तशा राहणें केवळ अशक्य होय! सहस्ररश्मी भगवान् सूर्यनारायण नभोमंडळावर आरोहण करूं लागतांच मंद व शीतल प्रकाशांतला तारागण लुप्त झाल्याप्रमाणें होतो; घटकाभर हायसा बसेन ह्मणून वायुराजानें मनांत आणिलें कीं, जलधीमहाराज गुपचिप स्वस्थ बसतात; सर्व ऋतूंत श्रेष्ठ व सर्वांना पसंत असणारा वसंत परत जाऊं लागला ह्मणजे तरुवर प्राचीन वैभव आठवून टिपसें ढाळूं लागतात; नभोमंडळांत सारखी धांदल उडवून गडद

अंधार पाडणाऱ्या पाहुण्यांची स्वारी खालीं भूतलावर येतांच त्याच्याबरोबर घटकाभर सहल करण्यासाठीं नद्या–नद आपलें विशाळ, उग्र रूप धारण करून हलकल्लोळ माजवून सोडतात. त्याच प्रमाणें आपल्या निष्कलंक वर्तनाचा, अगाध बुद्धिमत्तेचा, विशाळ कल्पकतेचा, अभिनंदनीय व सुखावह स्वभावसौरस्याचा, एकंदरींत परम पूज्य व कौतुकावह शरीराकृतीचा आणि अनुकरणीय राहणीचा "जमजीच्या अजब तडाख्यांत', पुरा लोप होऊन जातो ! रात्र सरल्यावर दिवस आहे, स्तब्धतेला हुसकून लावणारा वायु घटकेघटकेला उच्छृंखल होतो, वसंतऋतु पुनः येतो, वर्षाकाळानंतर दुसरे दिवस आहेत त्यांच्या दर्शनानें कौतुक वाटण्याचा व कौतुक वाटल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या अभिमानाचा लाभ वारंवार होण्याचे प्रसंग हरहम्मेष येतात. पण निसर्गांतील अपूर्व करामतीचा व निसर्गाचा स्वामि–उपभोक्ता–ह्मणून निर्माण केलेला मनुष्यमात्र एकदा गेला कीं गेला ! पुनः तो कधींच आणि कोणास, कांहींही केल्यानें, मिळणार नाहीं किंवा तो दिसणें दुर्लभ. हा मोठा भयंकर व खेदकारक ईश्वरी योजनेंतला पक्षपात होय !

निसर्गांतील निर्जीव वस्तुमात्राचें कौतुक वाटणें याजपेक्षां सजीव व निसर्गस्वामी जो मनुष्य त्याचें कौतुक अधिक वाटणें अगदीं साहजिक आहे. परंतु एकदां मनुष्य गेलें तें गेलेंच. तें पुनः कांहीं केल्या परत दर्शनलाभ द्यावयाचें नाहीं. परमहंसपरिव्राजकार्य श्रीमच्छंकराचार्य आर्यधर्मसंस्थापक यांनीं आपल्या अवघ्या ३२ वर्षांच्या कारकीर्दींत स्वतःच्या देहास अनेक प्रकारें कष्टवून अंगच्या अलौकिक करामतीनें व अतिदेदीप्यमान बुद्धिसामर्थ्यानें अखिल भरतखंडास सुरेख व सुखावह असा उन्नत धर्मविचार व धर्मरचना आंखून दिली व आ-

पल्या जन्मसार्थकतेचीं सुरेख साधनें उपलब्ध करून दिलीं. तेव्हां अशा सत्पुरुषाचें, अशा जगदुपकारकर्त्यांचें साक्षात् दर्शन केवढ्या कौतुकाचें व कोण आनंदाचें होईल हें सांगून कांहीं कळावयाचें नाहीं! ज्या "यवनकुंजरशिरपर" चढाई करणाऱ्या महाराष्ट्रमृगेंद्र **श्रीशिवछत्रपतीनें** जिवाची पर्वा न वाळगतां, मदोन्मस्त, जुलमी, क्रूर, इमामदांडगे व आर्यभूस त्राहि त्राहि करून सोडणारे अशा नरपशूंना एकीकडे हुसकून लावित आपल्या स्वराज्याची भव्य, दिव्य आणि देदीप्यमान इमारत शत्रूच्या छातीवर उठवून दिली; आणि आपले स्वजन, आपला स्वदेश यांचा डंका सारखा दुमदुमत ठेवून तमाम जगभर दरारा बसविला, त्या परम भाग्यशाली **श्रीशिवछत्रपतीच्या** प्रत्यक्ष दर्शनानें, महाराष्ट्रभूचें "पयःपान" केलेली मंडळी खचीत कौतुकानंदसागरांत गटकळ्या खात राहिली असती! विरक्ततेच्या निस्सीम व अत्युग्र स्वरूपानें ओतप्रोत भरलेली आणि "जगाच्या कल्याणा"साठीं सारा देह सारखा झिजवीत मनाला उपदेश व जनाला नीतिपथानें जाण्यास प्रोत्साहन देणारी परमपूज्य व महाराष्ट्र ललायमानभूत साधुमूर्ति श्रीसमर्थ **रामदासस्वामी** पुनः दृष्टीस पडतील तर त्या भाग्यास आणि त्या आनंदास पारावार नाहीं! असो, ह्मणजे सारांश खऱ्या कौतुकाचा व कौतुकाचा ह्मणून अभिमानाचा जो मुख्याधार सजीव, ज्ञाता आणि उपकारकर्ता पदार्थ तो मनुष्य होय! परंतु त्याच्या दर्शनापासून होणाऱ्या कौतुकाचा व आनंदाचा लाभ सदा आणि सर्वांस सारखा होत नसतो हें मनुष्यजातीचें खडतर दुर्भाग्य आहे.

याकरितां गेली मूर्ति ती गेली, परंतु त्याचें प्रेमळ व कौतुकास्पद चरित्र तरी ऐकण्यास मिळेल तर सुद्धां कांहीं थोडकें

नाहीं. मूळस्वरूपाऐवजीं प्रतिबिंब–प्रतिछाया–"फोटोग्राफ" तसाच प्रकार जीवंत राहणी पाहण्याच्या ऐवजीं तच्चरितामृताचें प्राशन हें होय ! ह्मणजे चरित्राचें वाचन साक्षात् दर्शनाइतकें नाहीं, थोडें कमी, पण तें कौतुकानंदास्पद वाटणें केवळ साहजिक आहे. आनंद उत्पन्न करावा, कौतुक वाटवावें व विमल यशःकीर्तीचा वगैरे प्रभाव प्रचीतीस आणावा, असें करणें एकप्रकारचा चांगला उपकार व सन्मित्रतेचें उत्तम लक्षण होय ! कांहीं ऐकलें, पाहिलें व कळलें ह्मणजे ते विषय मनांत बिंबून आपणही तसें असावें, करावें वगैरे प्रकारची प्रवृत्ति स्वभावतः होत असते. अक्षर वळविणाराला कित्ता, विद्यार्थ्याला अध्ययन तसें होतकरू तरुणांस चरित्रवाचन होय. वडील माणसांचें आचरण पाहून त्याबरहुकूम वागण्याची आपली प्रवृत्ति अगदीं साहजिक असते. त्याच प्रमाणें उदात्त व थोर कीर्तीच्या नरश्रेष्ठांचीं चरित्रें वाचून आपणही यथामति तसें होण्याचा प्रयत्न कां करूं नये, असें उगीच मनांत तरी येण्यांचा संभव आहे. यासाठीं, आणि, एकदां आपली कीर्ति ध्वजासारखी फडफडवीत सोडून जगाकडून धन्य धन्य ह्मणवून घेतलेल्या थोर सद्गृहस्थांचें स्मरण वारंवार व्हावें व त्याबद्दलचा अभिमान सदोदित जाग्रत राहावा ह्मणून हीं पुढील चार पानें लिहिण्याचा प्रयत्न यथामति व यथाशक्ति केला आहे. गतवैभव होऊन बसलेल्यास प्राचीन वैभवाची आठवण दुःखास व अपमानास कारण. त्याप्रमाणेंच हल्लीं आह्मां महाराष्ट्रीयांसआलेल्या जनानी व नादान दैन्यावस्थेंत आपल्या रणधुरंधर व राजकार्यधुरंधर पूर्वजांची आजोबा पणजोबांची आठवण, बेशर्मेस व हळहळीस कारण होईल हें कांहीं खोटें नव्हे. परंतु तें पत्करिलें. कारण, त्या योगानें तरी कांहीं भले व लायख विचार सुचतील. असो. एका-

मागून एक राजकार्यधुरंधर मंडळी भेटेल तितकी व भेटेल तशी वाचकमित्रांपुढें मुलाखतीस आणण्याचा संकल्प केल्याप्रमाणें खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या **फडणीस नानांस** आज सादर केले आहेत.

ह्या प्रयत्नांत दोष असतील तर, रोग्याच्या अंगांतील आजारावर जालीम व कडक उपायांची वैद्य जशी योजना करितो त्याप्रमाणें मार्मिकांनीं ह्यावर टीका करावी, ही सविनय आणि आग्रहपूर्वक विनंति आहे. वैद्यानें कडू औषधाची योजना करून रोगमुक्त केलें ह्मणजे रोग्याला जसे मोठे उपकार वाटतात, तसेच, दोषस्थलाच्या निर्देशाबद्दल टीकाकाराचे उपकार प्रस्तुत लेखकास वाटतील, हें कांहीं निराळें सांगणें नको.

धनुर्धारी.

श्री० महाराष्ट्रीय लिपी पुस्तकालय ... बाबगीपुस्तकालय

# अनुक्रम.

१ ओळख. २ लहानपण. ३ आयुःक्रम. ४ दरबारांत शिरकाव. ५ पुढला घोटाळा. ६ पुनः कारभारप्रवेश. ७ संकटाचा आरंभ. ८ कारस्थानाची सुरवात. ९ सवाईमाधवरावाचा जन्म. १० इंग्रजांशीं राघोबाचें संधान. ११ आपसांत तंटेबखेडे आणि फंदफितूर. १२ पुढला कावा. १३ इंग्रजांच्या कटकटी. १४ राघोबाचा शेवट. १५ टिपूशीं लढाई—पहिला प्रसंग. १६ दुसरा प्रसंग. १७ महादजी शिंदे व नाना यांतील तेढी. १८ खर्ड्याची लढाई. १९ सवाईमाधवरावाचा मृत्यु. २० पुढील मसलत. २१ बाजीरावाची खटपट. २२ नानाफडणिसांचे गोंधळ. २३ शिंद्याची खटपट. २४ नानांच्या कारस्थानाची कमाल. २५ कैद. २६ बंधमुक्ति. २७ पुनः राज्यकारभाराची सुरवात. २८ शेवट.

# फडणीस नाना.



जन्म. शके १६६३. मृत्यु. शके १७२१.

खूप शांतिनें राज्य राखिलें यशवंत **फडणीस नाना.**

. . . . . .

. . . .

ना. . . . .

. . . .

# फडणीस नाना.

१ ओळख.—भट आणि भानु या उपनांवांचे दोन कोकणचे सुखवस्तु ब्राह्मण गृहस्थ शाहू महाराजांच्या कारकीर्दींत घांट चढून देशावर आले. शाहू महाराजांची कारकीर्द ह्मणजे मराठी साम्राज्याच्या भरभराटीचा समय. स्वराज्यांत गुणीजनांच्या गुणांचें सुरेख चीज होत असलें ह्मणजे आपल्या अंगची करामत दाखविण्याला लोकांना उमेद येते व प्रसंगही मिळतात, ही गोष्ट कांहीं मोठ्या आश्चर्याची नव्हे. कोकण प्रांत ह्मणजे साक्षात् सुदामजीच्या घरासारखा अति दरिद्री, त्यांतील जमीन खडकाळ, उत्पन्न भिकारडें, आणि कमकस अन्नाशीं सदा गांठ. त्यांत हबशी, पोर्चुगीज असल्या लोकांनीं आपले हातपाय यथेच्छ पसरण्याच्या भानगडी अनेक चालविलेल्या होत्या. त्या वेळीं त्या सर्व जुलमांस व कोकणच्या दारिद्यास कंटाळून व कांहीं साधल्यास पहावें ह्मणून भट व भानु यांनीं, कोकणांतून आपलें चंबूगवाळें गुंडाळून देशावर प्रयाण केलें. कर्मधर्मसंयोगानें व सुदैवानें भटास पेशवाई मिळाली. आपल्यास जी काय ओलीकोरडी भाकर मिळेल ती उभयतां मिळून खाऊं असा करार, भट आणि भानु यांचा प्रयाणसमयींच झाला होता. त्याप्रमाणें भटास पेशवाई मिळाली तेव्हां, त्यांनीं भानूस आपली फडणीशी सांगितली. त्यानंतर भट व भानु किंवा पेशवे आणि फडणीस यांच्यांत फार उत्तम प्रकारचा सलोखा राहून फडणीसांनीं पेशव्यांस फार उत्तम प्रकारचें सहाय्य दिलें व प्रसंगविशेषीं पेशव्यांनीं सुरक्षित

व शाबूत राहावें ह्मणून फडणीसांपैकीं एकानें आपला प्रत्यक्ष प्राणही ह्मणतात अर्पण केला! पहिले पेशवे **बाळाजी विश्वनाथ** व पहिले फडणीस **हरि महादेव** ह्या उभयतांनीं कोकणांतून देशावर येऊन **साताऱ्यास** पेशवाई आणि फडणीशी मिळविली. भटांपैकीं बाळाजी विश्वनाथ एकटेच इकडे देशावर आले आणि **भानूंपैकीं हरि महादेव, रामाजी महादेव, बाळाजी महादेव** असे त्रिवर्ग बंधु आले. **बाळाजी विश्वनाथाच्या** कारकीर्दीत व हयातींतच **हरि महादेव** व **बाळाजी महादेव** भानु स्वर्गवासी झाले. **हरि महादेव** ज्वरानें वारले व **बाळाजी महादेवांनीं** ह्मणतात, **बाळाजी विश्वनाथांस** वांचविण्याकरितां स्वतः आपण होऊन आपणांस कत्तल करून घेतलें. तो प्रकार असाः—**बाळाजी विश्वनाथांस** वाटेंत लुटून ठार मारावें व त्यांच्या जवळील दिल्लीपतीनें दिलेल्या सनदा वगैरे उपटून घ्याव्या, असा कट दिल्लीदरबारच्या कांहीं बदमाष मुत्सद्दी मंडळीनें केला. ही गुणगुण कळतांच **बाळाजी भानु** फडणीसानें **बाळाजी विश्वनाथ** पेशव्यांस न जाऊं देतां, आपणच पेशवा ह्मणून तो पुढें सरसावून गेला. तेव्हां, कटांत ठरल्याप्रमाणें बदमाषांनीं त्याची कत्तल केली. अशी एक आख्यायिका आजतागाईत प्रचारांत आहे व ती निराधार असावी असेंही कित्येकांस वाटतें. तें कसेंही असलें तरी **भानु** व **भट** हे एकमेकांशीं खऱ्या मित्रभावानें आणि केवळ घरोब्यानें वागत, याजबद्दल मात्र कांहीं शंका नाहीं.

बाळाजी विश्वनाथानंतर त्याचा मुलगा **बाजीराव** हा पेशवा झाला. **बाजीरावाच्या** पश्चात् पेशवाईची मसनद **नानासाहेबांस** मिळाली. कोकणांतून आलेल्या त्रिवर्ग **भानूंपैकीं हरि महादेव, रामाजी महादेव** व **बाळाजी महादेव** या प्रत्येकांनीं एकामागून एक अशा प्रकारें पेशव्यांची फड-

णीशी केली. **बाजीरावाच्या** कारकीर्दींत या त्रिवर्ग बंधूंतील अखेर राहिलेले **रामाजी महादेव** हेही कैलासवासी झाले. **हरि महादेव** निपुत्रिक होते. **रामाजी महादेव** व **बाळाजी महादेव** यांस मात्र एकेक मुलगा होता. **रामाजीच्या** मुलाचें नांव **बाबूराव. बाळाजीच्या** मुलाचें नांव **जनार्दन.** अखेरचे फडणीस **रामाजी महादेव.** यांनीं कैलासवास केला तेव्हां, **बाबूराव** व **जनार्दन** हे उभयतां चुलतबंधु अल्पवयी याजकरितां त्यांचें फडणीशीचें काम, कोणा इतरास, त्यांच्या नांवानें चालविण्यास, **बाजीरावानें** सांगितलें होतें. **बाबूराव** व **जनार्दनपंत** वयांत आल्यावर ते स्वत: आपली फडणीशी गाजवूं लागले. पण त्या वेळचे पेशवे ह्मणजे साक्षात् दिनकर, त्यांच्या पुढें या लेखणीवाल्या फडणीसांचें कितीसें आणि काय तेज पडणार ? ते फडणीशी चालवीत होते इतकेंच. या **जनार्दनपंताचे** चिरंजीव **बाळा** नांवाचे होते. त्यांनाच **नाना** ह्मणण्याचा परिपाठ होता. व हेच आजच्या चरित्राचे **नायक;** पंतप्रधान पेशव्यांचे **फडणीस;** महाराष्ट्रीयांतील अप्रतिम **राजकार्यधुरंधर;** हिंदुपद पादशाहीचा डंका सारखा दुमदुमवून इंग्रज, फ्रेंच, मोंगल, हैदर, टिप्पु अशासारख्या कावेबाज शूर वाघांच्या नाकांत वेसणें अडकवून त्यांना खडे चारावयास लावणारे **वस्ताद;** शाहाणे शाहाणे ह्मणविणाऱ्यांच्या शाहाणपणास खग्रास ग्रहण लावणारे **राहु;** भयंकर वादळांत, साम्राज्य नौका सांपडली असतां व तिला हिसक्यावर हिसके बसत असून आतां बुडेल, घटकेनें खडकावर आपटेल, अशी खरी भीति, घटकोघटकीं डोकावीत असतांही त्या नौकेला सुरक्षितपणें पार पाडून नेणारे अप्रतिम कुशल **नावाडी** आणि एकंदर महाराष्ट्रीयांच्या शाहाणपणाचें, राजकारस्थान-

बुद्धीचें, विलक्षण बाणेदारपणाचें, आणि उद्योग, नियमितपणा, व्यवस्था, टापटीप, कदर, धोरण, सारासारविचार इत्यादि क्वचित् व दुःसाध्य मनुष्यपणाच्या अवश्य घटकावयवांपैकीं सर्वांचें माहेरघर असे **नानाफडणीस** इ. स. १७४१ सालीं सातारा येथें **जनार्दन बल्लाळ भानु** व **सौ. रखमाबाई** यांच्या पोटीं जन्मास आले. **नानांचे** वडील लहानपणींच वारले; त्यांचा पेशव्यांशीं पिढीजाद स्नेह, नौकरसंबंध आणि थोडासा व जरा लांब असा आप्तपणा असल्यामुळें त्यांची सर्व प्रकारें शुश्रूषा किंवा त्यांच्या त्यावेळच्या कां होईना, शिक्षणासंबंधानें सर्व प्रकारच्या देखरेखीची वगैरे जबाबदारी खुद्द पेशव्यांकडेच होती. त्यावेळचें शिक्षण ह्मणजे बहुतेक अनुभविक ज्ञान व जगांतला व्यवहार शिकविणें एवढेंच होतें. शाळा, वर्ग, मार्क, परीक्षा, पास, नापास, नंबर, बक्षीस, "मेडल" वगैरे कांहीं नसल्याकारणानें, पुढें, जगास दिपविणाऱ्या अक्कलवंताचें व धोरणी पुरुषाचें मूळ स्वरूप कसें या संबंधानें अनुमानिक कथा कांहीं सांगण्यासारख्या नाहींत. व खुद्द पेशव्यांशीं निकटसंबंध असणाऱ्या मुलांची इतरांशीं तुलना करण्याचें साधेल तरी कसें ? ह्मणून शाहाणपणाचा व चतुरतेचा पुतळा अशी जगभर ख्याती पावलेल्या **नानांच्या** बाळपणाच्या बारीकसारीक गोष्टी सांगण्याचें साधन कांहींएक सध्यां अनुकूल नाहीं.

२ **लहानपण.**–त्यावेळच्या फडणीशी–अर्थात कारकुनी–बाण्यास अवश्यक अशी आधिभौतिक व आध्यात्मिक विद्या **नानांनीं** संपादन केली. शिलेदारीबाण्याच्या शिक्षणाकडे मात्र **नाना** ढुंकून पहात नसत. त्यांचा स्वभाव व त्यांची प्रकृति लष्करी धंद्यास केवळ निरुपयोगी अशीच असे. पेशवे सार्वभौम राजे. त्यांच्या घरीं जगाच्या सर्व उलाढाली चालत. त्यामुळें **नानांस**

अनायासें राजकार्यधुरंधरतेचें शिक्षण अनुभवसिद्ध असें आयतेंच मिळे. पण **नानांच्या** अपरंपार राजकार्यकुशलतेचा, त्यांच्या आटोकाट धोरणाचा, अप्रतिम शाहाणपणाचा, आणि विलक्षण टापटीपी व्यवस्थेचा फारसा प्रादुर्भाव लहानपणीं व पूर्ववयांत कोठें कोणाच्या नजरेस आला नाहीं. आणि आला नाहीं यांत फारसें नवल नाहीं. कारण, अंधारच नाहीं तर देदीप्यमान ज्योतीचा प्रकाश पडणार तरी कसा? युद्धप्रसंगच नाहीं तर अंगचें शौर्य दिसणार कोठून? भूकच नाहीं तर पंचपक्वान्न असलें ह्मणून त्याची चव कोणास कळणार आहे? **सदाशिवराव भाऊ, राघोबा, नानासाहेब, मेहेंदळे, रास्ते, विंचूरकर, मल्हारराव सुभेदार, जनकोजी, दत्ताजी शिंदे** असलाली मंडळी समशेरा खेंचून स्वराज्यासभोंवती खडा पाहरा करीत; "**मराठे**" हा शब्द कानीं पडतांच मी, मी, ह्मणणारे शत्रु गर्भगळित होत असत; आणि "आह्माला सर करावयाला आतां मुलूख कोणता?" "पादाक्रांत करण्याला आतां शत्रु कोण?" अशा विवंचनेंत चूर असणारे **मराठे नरशार्दूल,** डरक्यांमागून डरक्या फोडीत त्यांच्या गर्जनेनें आकाश दणाणून जाई. तेव्हां **नाना फडणीसां**सारख्याच्या तेजाचा मुळीं दर्प सुटला नाहीं, तर त्यांत फारसें नवल नाहीं. पुष्प फुलून त्याच्या सौगंधाचा परिमल फांकूं लागण्याला अवकाश असेल तर, तोंवर, कळीच्या व पानांच्या रूपाचें वर्णन करीत बसणें भाग पडतें. त्याप्रमाणें **नानांचा** शहाणपणा, राजकार्यधुरंधरत्व इत्यादि प्रतापदिनकर नभोमंडळावर आरूढ होऊन आपल्या तेजानें भूमंडळास दिपवूं लागे तोंपर्यंत, त्या अरुणोदयसमयींचें वर्णन करीत बसणें सध्यां प्राप्त आहे. कीर्तिशिखरावर चढलेला फडणीस **नाना,** मार्ग कसा कसा आक्रमीत गेला हें चांगलें कळण्यासाठीं त्याचा

एकंदर आयुःक्रम, कसा असला तरी, सांगत बसणें अवश्य आहे; त्याला दुसरा इलाज नाहीं.

**३ आयुःक्रम.**—नानाला लहानपणापासून ह्मणतात उच्छृंखलपणा व खोडकरपणा माहीत नसे. एकीकडे व मुकाट्यानें गयाळासारखें त्यानें स्वस्थ बसून असावें. कोणाच्या आध्यांत ना मध्यांत, देव, देवपूजा, देवळें हेंच त्याचे लहानपणींचे खेळ. परमार्थाकडे प्रवृत्ति विशेष. लष्कर, धाडस, लढाई, शस्त्रास्त्रें यांची नानाला फार भीति होती. पानपतच्या महाभयंकर युद्धास, मोठ्या जयघोषानें व ईर्षेबाज उमेदीनें, मराठे, पुण्याहून हिंदुस्थानाकडे जावयास निघाले तेव्हां, बरोबर नाना फडणीसही निघाले. याचें कारण, तीर्थें क्षेत्रें अनायासें घडतील, हेंच मुख्य होय! लढाईच्या संबंधानें त्यांच्या मनांत काहींएक नव्हतें. पेशव्यांच्या सैन्याबरोबर असतांना नानांनीं आपले तीर्थविधि उत्तम प्रकारें करून देवतादिदर्शनामुळें आपणांस बरेंच धन्य मानिलें. नानांनीं स्वदस्तुरचें एक आत्मचरित्र लिहिलें आहे त्यांत या स्वारीसंबंधानें लष्करी हकीकतीपेक्षां, अमक्या देवाचें दर्शन झालें, तमक्या तीर्थांत स्नान घडलें, याची कथा अशी, त्याची तशी, याचाच विस्तार विशेषेंकरून केलेला आढळतो. यावरून पानपतावर चालून गेलेल्या लष्कराबरोबर जाण्यांत नानांचा हेतु फक्त पारमार्थिक होता. लष्करी बाणा किंवा त्या संबंधाची कोणतीही हुरूप नानांस नव्हती. नानांबरोबर त्यांची वृद्ध मातोश्री आणि पत्नी हीं केवळ तीर्थयात्रेच्या उद्देशानें समागमें होतीं.

पानपतास मराठ्यांची भयंकर कत्तल झाली व दुराणी लोकांनीं मराठ्यांच्या सैन्याचा अगदीं निःपात केला; तेव्हां उरलेंसवरलेलें थोडथोडकें सैन्य माघारें फिरलें, त्यांतच नाना फडणीस

ही होते. बायकांपोरांची वाताहत होई तोंपर्यंत, **नाना** सैन्याबरोबर होते. पण जेव्हां धरण फुटल्यासारखें मराठी सैन्य इतस्ततः मार्ग शोधूं लागलें तेव्हां **नानाही**, त्यांच्या बरोबरच, जिवाच्या धास्तीनें, वाट फुटेल तसे व तिकडे धांवूं लागले. **नाना** कांहीं शिपाईबाण्याचे लष्करी गडी नव्हते; तेव्हां त्यांनीं पळता पाय काढला तर त्याबद्दल त्यांना कोणीही दोष देणार नाहीं. **नानांनीं** आपल्या चरित्रांत पळत सुटलेल्या मराठी सैन्याची बरीच निंदाव्यंजक शब्दांनीं निर्भर्त्सना केली आहे. यावरून, व शिपाईबाणा नसतां ही अगदीं अखेरपर्यंत **भाऊसाहेबांज**वळून **नाना** हालले नाहींत यामुळें, **नाना** शिपाई गडी असते तर ते कदाचित् पळून जाण्याच्या ऐवजीं कत्तल होण्यास कदापि भ्याले नसते, असें कोणासही साहजिक वाटेल. **नाना** मातृभक्त असत आणि केवळ परमार्थबुद्धीनें व विरक्ततेनें **नाना** मराठ्यांच्या सैन्याबरोबर हिंदुस्थानाकडे गेले, तर, आपल्या जन्मदात्या वृद्ध मातोश्रीस, गिलच्यांच्या तावडींत व पळण्याच्या गर्दींत सोडून **नाना** एकटे सडे पळत सुटले, यांत त्यांचा नुस्ता भेकडपणाच तेवढा स्पष्ट होतो असें नाहीं, तर दुसरा त्याजपेक्षां जहल दोष **नानां**च्या माथीं येतो असें कोणांस वाटेल, तर तें गैर होय, असें प्रतिपादण्याला कांहीं कारणें, प्रस्तुत लेखकापाशीं तरी नाहींत. तरुण पत्नीची गोष्ट एखादेवेळ असो, पण वृद्ध मातोश्रीची पर्वा न बाळगतां आपल्या बचावासाठीं **नाना** पळत सुटले हें त्यांच्या कीर्तीस न साजे असेंच झालें ह्मणावयास हरकत नाहीं. मातृभक्तीची पराकाष्ठा, आणि देहाचें खरें सार्थक करून दाखविण्याचा सुयोग असतां तो **नानांनीं** भेकडपणामुळें खरोखर व्यर्थ दवडला, यांत कांहीं शंका नाहीं. ईश्वर अंगावर संकटें लोटून मनुष्याची पारख पहात असतो, व त्याच्या कल्याणाचीच सदा त्याला

इच्छा असते, ही गोष्ट आमच्या ध्यानांत चांगली ठसेल तर दुःखाचें व ईश्वरी योजनेवर विनाकारण रागावण्याचें मुळींच कारण राहणार नाहीं. एवढें तरी वाचकांस चांगलें कळो ह्मणजे **नानांच्या** भेकडपणाचा हा उल्लेख केल्याचें चीज झाल्यासारखें होईल.

असो. ह्मणजे **नाना** पानपताच्या रणभूमींतून जन्मदात्या वृद्ध मातोश्रीची कांहींएक पर्वा न बाळगतां आपला जीव वांचविण्यासाठीं धूम पळत सुटले! ह्या प्रायश्चित्तार्थ ह्मणूनच कीं काय नकळे, वाटेंत, त्यांचे जे काय हाल झाले तें कांहीं पुसून सोय नाहीं. पायीं अठरा अठरा वीस वीस कोस मजल–अन्न नाहीं, पाणी नाहीं, अशी–करावी लागली. हरघडी यमस्वरूपी गिलच्यांच्या प्राणघातकी समशेरीची धास्ती आणि रणाची भीति यामुळें **नानांच्या** भेकडमनाची कोण त्रेधा उडाली असेल याची कल्पनाच करावी; वर्णनानें तें काम भागावयाचें नाहीं!

केव्हां झाडपाल्यावर भूक भागवीत, केव्हां मिळेल तसलें पाणी पीत, केव्हां उपाशीं तर उपाशीं आणि केव्हां तान्हेलेले तर तान्हेलेले. अशा प्रकारें उघडेबागडे **नाना** कसे तरी एकदांचे–लढाईतल्या पराभवाचें वर्तमान न कळल्यामुळें पाठपुरावा करण्यासाठीं ह्मणून निघालेल्या–मराठ्यांच्या सैन्यांत येऊन दाखल झाले. वाटेंतले हे वनवास आणि शिवाय आमांशादि आजार प्रकृतीला जडलेले, तेव्हां, पानपतचा महाप्रळय पाहून प्रथम विरक्तीकडे झुकणाऱ्या **नानांच्या** मनाला कांहीं काळ तरी कडकडीत व प्रखर वैराग्य प्राप्त झालें असेल तर त्यांत फारसें नवल नाहीं. श्रीमंत **नानासाहेब** पेशव्यांनीं, **नाना** फडणीसांस, श्रीकृष्ण भगवानानें अर्जुनास गीता उपदेशिली तसा, पुष्कळ बोध केला. **नानांच्या**

इ. स. १७६१.

मनांत श्रीवाराणसी क्षेत्रांत वास करून उरलेल्या आयुष्याची विरक्ततेंत कालक्रमणा करावी असें होतें. **नानासाहेब** पेशव्यांचें मन अगोदरच शोकानें भडकलेलें असल्यामुळें **नानांला** विरक्ततेपासून विमुख करण्याचें त्यांना यश लाधलें नाहीं. त्यांनीं काशी क्षेत्रास जाण्याची **नानाला** कशी तरी परवानगी दिली व त्याप्रमाणें **नाना** तिकडे निघून चालतेही झाले !

**४ दरबारांत शिरकाव.**—पण ईश्वरी योजना कांहीं निराळीच. मराठी साम्राज्यावरील कळस, **नाना** फडणीसाच्या हातून बांधला जावयाचा, तेव्हां त्या ईश्वरी योजनेचें आकलन करण्याचें माणसांच्या स्वाधीन असणार आहे थोडेंच !

**५ पुढला घोटाळा.**—पानपतच्या गारतीमुळें शोकाचा जो भडका उठला त्यांत श्रीमंत **नानासाहेब** पेशवे अगदीं होरपळून गेले. स्वर्गवासाखेरीज त्यांचें दुःख कमी व्हावयाचें नव्हतें. त्यामुळें **नानासाहेब** कैलासास चालते झाले. जातेसमयीं **नाना** फडणीसांस, भेटण्यासाठीं या ह्मणून त्यांनीं बोलावूं पाठविलें. आपल्या धन्याची प्रकृति फार बिघडली आहे, त्यांना भेटण्यास

इ.स. १७६१.

जावें हा आपला धर्म, ह्मणून फडणीस **नाना** काशीहून पुण्याकडे यावयास निघाले. तों वाटेंतच त्यांना **नानासाहेब** कैलासवासी झाल्याचें वर्तमान समजलें. इतके लांब आलों तेव्हां, सरकारवाड्यांतील इतर मंडळीस भेटावें व त्यांच्या दुःखाचें यथाशक्ति सांत्वन करावें, ह्मणून **नाना** पुण्यापर्यंत एकदांचे येऊन दाखल झाले. **नानासाहेबांनंतर** पेशवाईपद त्यांचे चिरंजीव **माधवराव** यांजला मिळणें रास्त, त्याप्रमाणें तें त्यांस मिळालें. **नानांस**, आपली फडणीशी पत्करा ह्मणून त्यांच्या नव्या मालकांनीं फर्माविलें व त्यांचा तो हुकूम अमान्य करण्याची कांहीं **नानांची**

प्राज्ञा नव्हती, काशीवास करून जन्माचें सार्थक करावें असे विरक्त झालेले **नाना** कसे तरी एकदांचे राज्यशकटास जुंपले गेले.

पण मध्यें आणखी कांहीं विलक्षण घालमेली झाल्यामुळें **नानाला** त्या नव्या आश्रमांत चैन पडेना. **माधवराव** पेशवे मालक खरे, पण त्यांचे चुलते **राघोबा दादा** भारी शूर शिपाई. त्यांची समशेर हा वेळपर्यंत फत्ते आणि त्यांचा स्वभाव फार साधा होता. **माधवरावाचा** राज्यारोहण**समय** आणि त्या सत्वशील शूराच्या हृदयांत मंथरेच्या उपदेशाची संचार करण्याची **संधि** एकत्र जमून आली. पानिपतच्या भयंकर गारतीमुळें हिंदुपदपादशाहीस जबरदस्त धक्का वसून त्या सरशी ती जमिनीवर कांहीं वेळ सपशेल पडण्याचा **काळ**, आणि गृहकलहाग्नीनें तिची पेट घेण्याची **वेळ** अगदीं सारखीं जमून आलीं हें आह्मां मराठ्यांचें फार भयंकर दुर्दैव होय! **राघोबाचें** आणि **माधवराव** पेशव्यांचें पटेना. **माधवरावास** वाटे पानपतच्या कत्तलीचा सूड घ्यावा. **राघोबा** ह्मणे मी पेशवा, माझी सत्ता सर्वत्र असावी. तेव्हां याचा परिणाम असा झाला कीं **राघोबा** आणि **माधवराव** यांच्यांत युद्ध जुंपलें. एकमेकांचा प्राण घेण्यासाठीं हे उभयतां चुलतेपुतणे समरांगणीं दंड थोपटून उभे राहण्यास सिद्ध झाले!! हिंदुपदपादशाही नष्ट झाली तरी पत्करलें पण आपला हेका तडीस गेला पाहिजे ह्मणून **निजामा**सारख्या कदीम दुस्मानास आणि मराठ्यांच्या ताटा खालील मांजरास **राघोबानें** आपल्या बगलेंत घेतलें. "श्रीमंतांच्या बावन पागा" व त्यांमध्यें "नामी नामी सरदार" बहुत होतें. त्यांच्यांत एकोपा असे यामुळें त्यांचा वचक सर्वांस सारखा होता. पण **राघोबानें** केवळ स्त्रैणपणामुळें स्त्रीलंपट होऊन

ग्रंथसंग्रहालय

त्या "नामी नामी सरदारांत" फंदफितूर सुरू केला. कांहीं-जण राघोबास व कांहीं माधवरावास मिळाले. पण इतक्यांत माधवरावानें, स्वतःच्या मानापमानाची, राष्ट्रमंडळाच्या अपमानापुढें कांहीं किमत नाहीं असें जाणून, अरिरक्तप्राशनास सोकलेल्या राघोबाच्या समशेरीनें आतां आपला आ घरीं पसरला, तो टाळण्यासाठीं, राघोबाच्या पायांवर डोई ठेवण्यास कमी केलें नाहीं. हिंदुपदपादशाहीवर शस्त्र चालविण्यास उद्युक्त झालेला राष्ट्रवैरी राघोबा पुतण्या शरण येतो ह्मणतांच थंडावला. "काका, आह्मी आपसांत भांडूं तर आपल्या शत्रूची मस्ती कोण जिरविणार ? पानपतच्या कत्तलेचा वचपा कसा निघेल ? आपणांस स्वर्गी बसलेले वाडवडील काय ह्मणतील ? राज्यच तुह्मांस हवें तर मी हा तुमच्या स्वाधीन झालों. तुह्मी राज्य संभाळा आणि शत्रूचें पारिपत्य करा." असें माधवरावाचें भाषण ऐकून राघोबा, थोडासा शुद्धीवर आला ! राघोबा व माधवराव यांच्यांत समेट झाला खरा, पण माधवरावाच्या तर्फे असलेली कारभारी मंडळी त्याच्या डोळ्यांत खुपे व त्यांचा सूड कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें राघोबा घेण्यास टपला होता, त्यामुळें माधवरावाच्या तर्फेची मंडळी केवळ बेदिल होऊन मराठी साम्राज्याबाहेर परागंदा होण्यास निघाली. शेजारींच निजामासारखें भाबडें, पण महत्वाकांक्षी मोंगलाई राज्य होतेंच. शौर्यानें लागा साधत नाहीं तर काव्यानें साधूं अशी त्यांची उमेद. पण भाबडेपणा कुठें त्यांना सोडतो ? राघोबांस भिऊन निघालेली प्रधान ह्मणा कारभारी ह्मणा मंडळी बाहेर पडूं पहात होती. त्यांस निजामानें आपल्याकडे पाचारण केलें. कारण त्यांच्या हस्तें पेशवाई पालथी करण्याचा त्याचा मोंगलाई कावा होता. पण ती मंडळी महा-

राष्ट्रभूचें "पयःपान" केलेली व **माधवरावाच्या** तालमेंतली, हें कांहीं **निजामाच्या** महत्वाकांक्षी ध्यानांत आलें नाहीं. **नाना** फडणीस हे **माधवरावाच्या** कारकीर्दींत राज्यकारभारांत होते. त्यांनीं आपली फडणीशी मुकाट्यानें सोडली; पण **निजामाच्या** दरबारांत कांहीं ते गेले नाहींत. **राघोबा** काय पारिपत्य करतील तें करोत ह्मणून **नाना** स्वस्थ पुण्यांतच राहिले! बिचारा गरीब करणार काय ?

**६ पुनः कारभारप्रवेश**–आपलें प्राणप्रिय राष्ट्र लौकरच मरावयाचें होतें व ईश्वराची इच्छा ही तशी ह्मणून **माधवरावासारखा** अलौकिक व प्रतापनिधि राष्ट्रपति अकालीं कैलासवासी झाला! भरज्वानींत आणि शौर्य व प्रतापनिधीच्या भरभराटींत **माधवरावाला** काळानें गांठलें. **हैदराला** गाय करीन, हिंदुस्थान केवळ मेंढवाडा पुनः बनवीन, हिंदुपदपादशाहीचा विजयध्वज अबाधीत फडफडावयास लावीन, इत्यादि सर्व बेत जागच्या जागींच ठेवून आपणाकडे निघून येण्याची, सर्वसत्ताधारी परमेश्वरानें **माधवरावा** पाठिमागें निकड लाविली! **थेऊर** मुकामीं कुळस्वामी गजानन आहे, त्याच्या सन्निध देहशांति करावी ही **माधवरावाची** इच्छा असे. पानपतचा सूड घ्यावा व आपणांस असलेलें कर्ज आपणांदेखत फिटावें ही माधवरावाची अखेरची व प्रबळ आशा होती. व त्याप्रमाणें **माधवरावाने** ह्या माझ्या आशा कोण पूर्ण करील असें सभोंवतीं जमलेल्या आपल्या कारभारी मंडळींत अगदीं सद्गदित अंतःकरणानें ह्मटलें. कारभारी मंडळींत **फडणीस नाना** होतेच. त्यांनीं पुढें सरसावून कर्जाची जिम्मा आपण पत्करिली व पंचवीस लाखाचे–पेशवे **माधवराव** याच्या नांवाचे असलेले–रोखे, तेथल्यातेथें आणून **माधवरावा** पुढें ना-

नांनीं ठेविले! **नाना** शिपाई गडी नव्हता; नाहीं तर हैदर व गिलची यांचींही शिरें आणून तो **माधवरावास** दाखविता असें, त्यानें कर्जाची व्यवस्था कशी हां हां ह्मणतां केली, यावरून वाटतें! **नाना फडणीसाच्या** अंगच्या पाणीदारपणाची हीच ओळख इतरांस पटली ह्मणावयास हरकत नाहीं.

**७ संकटाचा आरंभ**–श्रीमंत **माधवराव** कैलासवासी झाले तेव्हां पंतप्रधानकीचीं सूत्रें त्यांचे धाकटे बंधु **नारायणराव** यांच्या हातीं आलीं. मरतेसमयीं आपल्या चुलत्या, "स्त्रीवश होऊन यश हारविण्यास" मागें पुढें न पाहाणाऱ्या व महाराष्ट्रदेशास आणि परंपरेनें अखिल हिंदुस्थानास, ठार करण्यासाठीं, जलाल जहराचा पेला भरून देणाऱ्या **राघोबांकडून**, **माधवरावांनीं**, **नारायणरावास** पेशवा करीन, त्यांत अंतर करणार नाहीं, अशी आणभाक घेऊन ठेविली होती. **राघोबा** सारख्या सरळ पण सरदारी दिलाच्या भल्या गृहस्थानें, **नारायणरावास** पेशवा समजून, आपल्या हिंदुपदपादशाहीची इभ्रत बचाविण्याचा निश्चय आरंभीं केला होता. परंतु स्वतःच्या अकलेचा माणूस नसला ह्मणजे पुढें तो कोणाचें काय ऐकेल व कसकशा उद्योगास प्रवर्तेल याचा कांहीं नियम सांगतां येणार नाहीं. वचन दिल्याप्रमाणें **राघोबानें नारायणरावास** मोठ्या आनंदानें पेशवाईपद देवविलें. परंतु पुढें थोडक्याच दिवसांत **राघोबाचें** आणि **नारायणरावाचें** पटेनासें झालें. **नारायणरावाचें** राज्य आपलें, त्याचा उपभोग आपला आपण घ्यावा, हा विचार **राघोबाच्या** मनांत, मंथरेवर कडी करणाऱ्या **आनंदीबाईनें** भरवून दिला. **माधवरावाच्या** मरणसमयीं पेशव्यांचा कुलकारभार **सखारामबापूंकडे** होता. त्याप्रमाणें फडणीशी **नानाकडे** असे. अनेक कारस्थानें रचून व "ध" चा

"मा" करून श्रीमंत **नारायणराव** पेशवे पंतप्रधान यांच
महाभयंकर खून त्यांच्या राहत्या–नांदत्या–वाड्यांत भरदो
प्रहरीं आणि त्यांच्या राजधानींत **राघोबा** आणि **आनंदीबा**
यांच्या कारस्थानी कपटामुळें घडून आला! आणि तो खू
झाला तेव्हांपासूनच **नानाचें** राजकार्यधुरंधरत्व महाराष्ट्रभ
गाजूं लागलें! तो खून होता ना ह्मणजे **नानाच्या** शहाणपणाच
किंवा कार्यधुरंधरतेचा इतका डंका कधींही न वाजता! **नारा
यणरावाच्या** वधामुळें ज्या आमच्या अनेक निंद्य नुकसान
राष्ट्रदृष्टीनें झाल्या त्यांचा वचपा एकाच्या गुणविकासाला
कारण झाल्यामुळें तो अंशतः भरून आला; असें, दुधाची तहा
ताकावर भागविण्याप्रमाणें समाधान करण्याला थोडी जाग
आहे ह्मणावयाची!

८ **कारस्थानाची सुरवात–नारायणरावाचा** भर दिवस
ढवळ्या खून झाला हें वर्तमान कळतांच पुण्याच्या कारभा
मंडळाचें धाबें दणाणून गेलें! सर्व राज्याचीं सूत्रें चालविणाऱ्या
व तमाम दुनयेंतली खित्तिमगुप्त बातमी आणविण्यांत पटाई
असणाऱ्या शापादपिशरादर्पीना घरांतलें कारस्थान कसें क
ळलें नाहीं याचें तमाम दुनयेस आजतागाईत आश्चर्य वाटतें
आपल्या कीर्तीस काळोखी आणणारें हें कृत्य होय, असें त्या
ळच्या कारभारी मंडळीस वाटलें असेल याबद्दल बिलकूल शंक
नाहीं. **नारायणरावाच्या** चुलत्यानें त्याला "**धरावा**" ह्म
णून हुकूम दिला आणि त्या "**ध**" चा "**मा**" त्याच्या कृत्य
स्त्री **आनंदीबाईनें** केला. काका माझें राज्य घ्या पण जीवदा
द्या, मरावयाचेंच तर आपल्या क्षात्रधर्माला उचित अशा
न्हेनें मरूं द्या; वगैरे प्रकारच्या अनेक विनवण्या **नाराय**

रावानें केल्या, तरी त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं; इमानी नौकर **चांपाजी इच्छाराम** इत्यादिकांची कत्तल आणि श्रीमंतांस बचावण्याकरितां आड आलेल्या "गोमाते"चा सुद्धां वध, आणि तोही भरदिवसा, या गोष्टीनें कारभारी मंडळीच्या मनाचा केवढा संताप झाला असेल याची केवळ वर्णनेंच द्यावयाला कांहीं नकोत. कल्पना, तें काम सहज करूं शकेल. असो. सरकारवाड्यांतील अनर्थाची वरी वाईट व्यवस्था लाविल्यानंतर श्रीमंतांच्या और्ध्वदेहिकाला कारभारी मंडळी नदीच्या कांठीं जमली होती. तेथें बसल्या बसल्या आमच्या फडणीस **नानांनीं** एक वाळूचें लिंग केलें आणि एकेकास हळूच बोलावून, ब्रह्मघातकी राघोबास किंवा त्याच्या संततीस इतउत्तर नमस्कार करावयाचा नाहीं, अशी आण करणें कांहीं वावगें नाहीं असा **नानांनीं** आपला निर्धार तेथल्या मंडळीस कळवून ह्मटलें कीं, असा निर्धार असणाऱ्यांनीं या वालुकालिंगावर हात ठेवावा. प्रथमतः **सखाराम** बापू, **त्रिंबकराव** मामा व **नानांचा** लंगोटिमित्र व उपाध्याचा मुलगा **हरिपंत फडके** यांनीं शपथा वाहिल्या. **नाना** तर त्यांत प्रमुखच. या चौघांनीं **राघोबास** पेशवाई पचूं द्यावयाची नाहीं असा प्रथम निर्धार केला, पण तो साधणार कसा? ब्रह्महत्या, गोत्रजहत्या, पुत्रवध करून मिळविलेली पेशवाई **राघोबा** स्वस्थपणें सोडणार आहे थोडीच. शिवाय ही चौकडी ह्मणण्यासारखी लढाऊ कांहीं नव्हे. **राघोबा** मातबर शूर. त्याच्यावर सर्व लष्कर खुष. पेशवाईचीं त्याला वस्त्रें मिळालेलीं. **सखाराम बापू** व फडणीस **नाना** हे मुळीं शिपाईबाण्याचे नव्हत; घरीं बसून व कानावर लेखणी ठेवून "गोष्टी सांगेन युक्तिच्या चार" या कामांत ते पटाईत. **पेठे मामा–त्रिंबकराव–व हरिपंत**

हे उभयतांच काय ते लष्करी गडी; आणि मसलत पाहिली तर राज्यक्रांतीची. पण नानासारख्या धुरंधर मुत्सद्याच्या अपार कारस्थानी कल्पकतेला, ही गोष्ट काय पण असल्या लक्षावधि असल्या तरी त्यांची पर्वा वाटावयाची नाहीं. शक्ति केवढीही असली तरी ती युक्तीपुढें लटपटते, हें सर्वांस ठाऊक असलेलें प्रमेय होय !

राघोबास पदभ्रष्ट करण्याची प्रतिज्ञा करून तर नाना चुकले. पण पुढें काय करावें ह्या विचारांत ते मग्न झाले. नारायणरावाची स्त्री गंगाबाई आणि पानपतच्या मोहऱ्याची स्त्री पार्वतीबाई या दोघींस आनंदीबाईनें कैदेंत ठेविलें होतें. एके दिवशीं नानाला रस्त्यावरून जातांना पाहतांच पार्वतीबाईनें त्यांना खुणावून खिडकीजवळ बोलाविलें आणि सांगितलें, "गंगाबाईस दोन महिने होऊन तिसरा महिना लागला आहे. तुह्मी चार मुत्सद्दी आहांत तर याचा पुढें विचार करावा." नानांनीं विचारलें आह्मीं काय करावें याचा हुकूम व्हावा. तिनें सांगितलें राघोबास कैद करा. ईश्वरी कृपेनें गंगाबाईस मुलगाच होईल. नाना फडणिसास, या पार्वतीबाईच्या बोलण्यानें किती हुरूप आला असेल हें कांहीं सांगणें नकोच. लगेच दुसऱ्या दिवशीं नानांनीं प्रमुख प्रमुख कारभारी मंडळीस आपल्या घरीं बोलाविलें. ते अकराजण व नाना बारावे, ह्मणून राघोबाच्या पक्षाची मंडळी त्यांस तिरस्कार दाखविण्यासाठीं "बारभाई" ह्मणत व त्या वेळेपासूनच "बारभाई" हा किंचित् तिरस्कारवाचक व "गोंधळ"दर्शक शब्द मराठी भाषेंत प्रचारांत आला आहे. गंगोदक, तुळशी, गीता इत्यादि पवित्र व धर्मसंबंधाच्या वस्तु एकमेकांनीं एकमेकांच्या हातांत देऊन परस्परांचा परस्परांस विश्वास बसण्यास आवश्यक अशा

आणा शपथा घेतल्या. नंतर नानांनीं आपला मनसुबा इतरांस कळविला कीं "राघोबास कैद करून पदच्युत करावयाचें. राज्य गंगाबाईच्या नांवानें चालवावें. तोंवर त्या प्रसूतही होतीलच. मुलगा झाला तर सर्वांत उत्तम झालें. नाहीं झाला तर दत्तक देऊन त्याच्या नांवानें राज्य चालवावें." त्याला सर्वांनीं आपली संमति दिली व तो बेत कायम झाला. या कामीं लागणारें द्रव्य, प्रत्येकानें आपापल्या नांवावर कर्जाऊ काढून पुरवावें,असें नानांनीं सांगितलें, तेंही सर्वांस मान्य झालें.

या हकीकतीवरून फडणीस नानाच्या आंगचें धाडस व्यक्त होतें. त्याचप्रमाणें त्याच्या मनांतली स्वामिभक्ति व पापकर्माचा त्याला असलेला तिटकाराही स्पष्ट कळून येतो. राघोबासारख्या रणधुरंधर योद्ध्यास, इतक्या साहसानें मिळविलेल्या— राज्यापासून पदभ्रष्ट करण्याचा विचार आणि तोही कानावर लेखणी ठेवून दप्तरीं शिस्त ठेवणाऱ्यानें करावा हें काय लहानसान धाडस? मसलत फसली तर आपला परिणाम काय होईल हें काय नानासारख्या धोरणी पुरुषाच्या ध्यानांत आलें नसेल? स्पर्धा राघोबाशीं, तो गादीवर विराजमान, त्याच्या पदरीं सैन्य अगदीं जय्यत. जातीनें तो मोठा जवानमर्द योद्धा, आणि त्याला कैद करून पदभ्रष्ट करण्याची मसलत, कारकुनी बाण्याचा कागदीजवान करितो, हें धाडस नव्हे तर आहे तरी काय? नाना लष्करी कामांत भितरा अथवा भेकड पण राजकारस्थानांत केवळ निधड्या छातीचा, खमक्या पठ्या हेंच खरें! बरें राघोबानें गादी मिळविली तर त्यांत नानाचें काय वेंचत होतें? फडांत बसून फडणिशी गाजविणाऱ्याला राज्यसंबंधीं उलाढालीत पडून स्वतःला भयंकर धोक्यांत अडकवून घेतल्यानें प्राप्त होणाऱ्या संकटाचें नाहक्क वांटेकरी होण्याचें कांहींतरी कारण

नानाला होतें काय? नाहीं. परंतु नानाची स्वामिभक्तिच तशी निस्सीम; ह्मणून त्याला असल्या उठाठेवी करून स्वतःचा जीव आपण होऊन धोक्यांत व संकटांत घालून घेणें भूषणास्पद व आनंदकारक वाटलें! आपल्या उपकारकर्त्या यजमानाच्या प्रत्यक्ष मुलास मारेकऱ्यांकडून भरदिवसा ढवळ्या मारवून मारविणारा आनंदानें नांदतो आणि त्याच्यापुढेंच आपण रोज नमो ह्मणून जावें यापरीस धोका, संकटें, जिवाची भीति, हीं नानाला जास्त आनंदास्पद वाटणें केवळ स्वामिभक्तीस उचितच होय! मृतराष्ट्रांत, नेभळ्या आणि निर्लज्ज स्वहितपरायणतेंत रुळण्यास संवकलेल्या मंडळींत, अंगावर शहारे उठविणारे घोर जरी अन्याय असले तरी तिकडे कानाडोळा करून आपला मतलब साधण्याकडे लक्ष ठेवण्याची प्रवृत्ति असते. पापकर्माचा तिटकारा उघड आणि स्पष्ट दाखविणें मनुष्यपणाचें खरें लक्षण आहे. व हें लक्षण आह्मीं विसरत चाललों ह्मणून तर आमच्या समाजांत हल्लीं इतकी बेबन्नगरी चालली आहे! बाहेरख्याली, इष्कीबाजी, दारूबाजी किंवा इतर कितीही "बाजी"पणा करून पाजी बनलें तरी त्याला कोणी उघड नांवें ठेवणारा भेटत नाहीं. समाजाचा, घराचा किंवा स्नेह्याचा अथवा दुसऱ्या कोणाचाही आळा व भीति नाहींशी झाली; याचा परिणाम आमच्यांतील **नीतिमत्ता** रसातळास जात चालली हाच होय! तें तूर्त राहो बाजूला. ब्रह्मघातक्याचा उघड धिक्कार व प्रत्यक्ष तिटकारा दाखवावयाचें काम नानांनीं पत्करून, आपल्या मानसिक धैर्याची, दुनयेस चांगलीच ओळख पटवून दिली ह्मणावयाची! या मानसिक धैर्याबद्दल व त्यांच्या राजकारणकौशल्याबद्दलच आमचे मराठी शाईर, शूरमर्दाच्या तरवारीबरोबरच, नानाच्या "**मनसुब्याची समशेर**" धन्यवादानें गात!

खलबतांवर खलबतें करून व आणाशपथांनीं एकमेकांस अगदीं जखडून घेतल्यावर राघोबाच्या पक्षानें ह्मटलेले "**बारभाई,**" **नानासाहेबाच्या** संततीलाच पेशव्याची मसनद देण्याच्या तयारीस लागले. **राघोबा** पुण्यांत असेपर्यंत आपली मसलत पार पडतेशी "**बारभाई**"स दिसेना. प्रयत्न करणाऱ्यांस ईश्वर सहाय्य करितो या समजुतीच्या वारंवार आणि हरहमेश प्रत्ययास येणाऱ्या, सिद्धांताची सत्यता इतिहासांत नमूद करण्याचा वखत यावा ह्मणूनच कीं काय पुण्याबाहेर जाण्याचा **राघोबाला** एकदांचा प्रसंग आला. पुणेंदरबारांत दुफळी माजली आणि "पुण्यप्रतापी सदायशवंत पंत–प्रधानाच्या" मसनदीस रक्ताचा विटाळ झाला, हा एक आपणांस उत्तम शुभशकून, असें **हैद्राबादकर** नबाबास वाटल्यामुळें, वारंवार **पेशवे** ठेंचित असलेलें, आपलें डोकें त्यानें पुनः एकवार वर उचलिलें! **निजामास** वाटलें आतां मात्र आपणांस पेशवाई सहज बुडवितां येईल. आणि त्याप्रमाणें लढाईची जय्यत तयारी त्या मोंगलाई **निजामानें** चालविली! हें वर्तमान कळतांच आपली समशेर **निजामास** दाखविण्यासाठीं **राघोबानें** स्वतः स्वारीस जाण्याचा बेत ठरविला. **राघोबा** अनायासें पुण्यांतून बाहेर जातो हें एक चांगलेंच काम झालें असें या "**बारभाई**"स वाटतें न वाटतें तोंच त्यांचा मोठा हिरमोड झाला. कारण **नाना** फडणीस, **बापू**, इत्यादि प्रमुखप्रमुख "**बारभाई**" **राघोबानें** आपल्या सैन्याबरोबर घेतले. पण मनाचा निश्चय निश्चल असला ह्मणजे, कोणासही अडचणींला लोटून रस्ता मोकळा करितां येतो! **राघोबाच्या** बरोबर असणाऱ्या "**बारभाई**"तील प्रमुख प्रमुख मंडळीनें दुखणाईतपणाचा उत्तम बाहाणा केला. दुखणेकरी मुत्सद्यांस लष्कराबरोबर नेल्यानें विपरित परिणाम घडाव-

याचा आणि आपलेंही काम व्हावयाचें नाहीं असें कोणासही वाटणें अगदीं उघड आहे. **नाना फडणीस** तर आपण भारी अजारी असा सुंदर वाहाणा करीत व तो राघोबास खराच फार आजारी—वाटे. ह्मणून तावडतोब तुह्मीं पुण्यास चला व तेथें चांगला औषधोपचार करून प्रकृति दुरुस्त करून घ्या, असें **राघोबानें** आपण होऊन **नानांस** सांगितलें. **नाना** पुण्यास जाऊन पोंचले तसे दुसरे दोघे तिघे अजारीपणाच्या बाहाण्यानें स्वारींतून, **राघोबाच्या** परवानगीनें, परत आले. "**बारभाई**"तील पुरेशी मंडळी पुण्यास जमतांच त्यांनीं आपला मनसुबा तडीस नेला. **गंगाबाई** राज्याची मालकीण, **सखाराम बापू** व **नाना फडणीस** तिचे कारभारी, आणि **राघोबा** केवळ **बंड** आहेत, त्यांचा राज्यावर कांहीं अधिकार नाहीं, अशी "बारभाई"नें शहरोंशहरीं द्वाही फिरवून सर्वांस कळविलें. **गंगाबाई** व **पार्वतीबाई**, कृत्या **आनंदीबाईच्या** कैदेंत होत्या, त्यांची मोठ्या युक्तीनें सुटका अगोदरच करून घेतली होती. **भोंसले** वगैरे फौजबंद सरदारही **नानांनीं** आपणांस अनुकूळ करून घेतले. **भोंसले** नागपूरकर, **राघोबास** कैद करण्याकरितां त्याच्या सैन्यावर चाल करून जाऊं लागले. इतक्यांत पेशवाई गिळंकृत करण्याची ही उत्तम संधि आहे असें जाणून **हैदरानेंही**, तिकडे कर्नाटकांत, आ पसरिला होता. त्याच्या तोंडांत आपली समशेर खुपसावी ही **राघोबाची** इच्छा असे. त्याप्रमाणें तिकडे **राघोबा** जावयास निघाला. व नागपूरकर **भोंसल्यांनीं** आपणांवर मोहीम योजिली आहे तर त्याचा समाचार तुह्मीं घ्या, असें, "बारभाई"त सामिल असलेल्या पण **राघोबास** तें कळूं न देतां त्याच्या सैन्याबरोबर राहून प्रसंग मिळतांच कैद करावयास टपलेल्या **त्रिंबक**-

राव मामाला, राघोबानें सांगितलें ! "बारभाई"च्या पक्षास मिळून राघोबास कैद करावयाला आलेल्या भोंसल्यांवर "बारभाई"पैकींच एका शूरास राघोबा रवाना करितो यांत राघोबाच्या भोळसरपणापेक्षां नानाच्या मनसुब्याची गुप्तताच विलक्षण होय, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं ! असो. हैदरावर, राघोबा चाल करून जाणार तोंच हैदराकडून राघोबास पत्र आलें कीं, तुमच्या घरीं फंदफितूर फार माजला आहे; आह्मीं तुमचे दोस्त ह्मणून तुह्मांला कळवितों कीं, त्याचा अगोदर बंदोबस्त करावा. खरा कावेबाज गडी तो हैदर! इकडे पेशव्यांचा मुलूख बळकावीत बळकावीत पुंडाई माजवावयाची आणि तिकडून आपणांवर सैन्य येतें ह्मणतांच, दोस्तीच्या बाहाण्यानें, काडशह बसवावयाचा, हा त्याचा कुशल कावेबाजपणा अवर्णनीय होय. पण त्या योगें स्वराष्ट्राच्या सौभाग्यावर स्वलोभामुळें तुटून पडणाऱ्या राघोबाच्या मानसिक दौर्बल्याची मात्र, तिटकाऱ्याची कीव येते ! हैदरानें असा दोस्तीच्या बाहाण्यांत काडशह राघोबावर दिला आणि राघोबानें तें ध्यानांत आणून हैदराच्या पुंडाईकडे कांहीं न बघतां, त्या हैदरासारख्या राहूच्या जबड्यांत महाराष्ट्रसार्वभौम "राका चंद्रकलेला" टाकून "बारभाई"च्या कारस्थानाविषयीं धडपड चालविली. या गर्हणीय व नादान स्वलोभाच्या उदाहरणाशेजारीं त्याच वेळीं "बारभाई"पैकीं एकाचें उदात्त व औदार्यपूरित उदाहरण मांडलें ह्मणजे, अनुक्रमें स्वहितबुद्धीची नीचता आणि निरपेक्षतेचा थोरपणा स्पष्ट कळेल ! आणि त्याचप्रमाणें राष्ट्रकल्याणास एका व्यक्तीची कां होईना, परार्थ औदार्यबुद्धि कशी सहाय्यभूत होते व एकाच्या निर्लज्ज स्वहिततत्परतेमुळें राष्ट्रावर कसलाले अनर्थ कोसळतात हेंही चांगलें सम-

जून येईल, ह्मणून ती हकीकत विषयांतराची पर्वा न बाळगतां देणें जरूर वाटतें.

मोंगलाई निजामानें, बंड राघोबास पकडण्याच्या कामीं सहाय्य करावें ही "बारभाई"ची त्याला विनंति होती व ती ना-इलाजामुळें आणि निरुपायामुळें कशी तरी हैदराबादकर निजा-मानें कबूल केली. परंतु तो मध्येंच जांवई—रुसवा फार व वारंवार आणीत असे. एके प्रसंगीं निजामानें "बारभाई" पैकीं लष्करी सरदार हरिपंत त्याला ह्मटलें "घरचा हा तंटा आहे. यामध्यें आह्मीं पडूं इच्छित नाहीं" त्यासरशी फ-डके हरिपंत ह्मणाले, "फार ठीक आहे. राघोबा कांहीं प-रचक्र नव्हे. घरचा दुस्मन आहे. त्याचा आमचा मिलाफ आह्मीं वाटेल तर आतांच करून घेऊं आणि मग उभयतां मि-ळून तुह्मांस रसातळास दडपूं. याचा विचार पहा." त्यास-रशी नबाबाचे डोळे लक्कन उघडले. आणि निमूटपणें तो "बारभाई"च्या सैन्याबरोबर राघोबास पकडण्यास आला! हैदरानें मतलबी काडशह स्वरूपानें "बारभाई"च्या कारस्थानाची बातमी देणें आणि त्यामुळें हैदरास मनमुराद पेशवाई मुलूख लुटण्याची मुभा पर्यायानें देऊन आपल्या स्वहितांत तत्पर होणें या राघोबाच्या वर्तनांत आणि हरिपंत फडक्यानें निजामाशीं नि-स्पृह व परार्थपर ठेवलेल्या वर्तनांत किती अंतर आहे हें कांहीं पुनः व जास्त विस्तृत सांगत बसण्याची बिलकूल आवश्यकता नाहीं! अस्तु.

आपणांस बुडविण्याचे, "बारभाई"नीं खेळ मांडले ही वार्ता कशी तरी राघोबास कळली खरी. राघोबाजवळ असलेले स-रदारही "बारभाई"नीं फितविले होते. प्रतिनिधि पटव-र्धन, घाटगे आदिकरून सरदारांचा मग राघोबास संशय येऊं

लागला. **भवानराव** प्रतिनिधीजवळ वाजवीपेक्षां फाजील सैन्य आहे हें पाहून **राघोबानें** त्याला दूषण दिलें. प्रतिनिधींना **राघोबाशीं** खवंडाळी काढावयाची होतीच. तेव्हां, **राघोबाला** त्यानें थोडें उणें अधिक उत्तर दिलें त्यासरशी **प्रतिनिधीचें** शासन करावें ह्मणून **घाटगे** व **पटवर्धन परशुरामभाऊ** यांना **राघोबानें** फर्माविलें कीं, **प्रतिनिधीचा** गोट लुटा. **घाटगे** व **पटवर्धन** "बारभाई"च्या कटांत सामिल होतेच; आणि शिवाय त्याच्यांत तेजस्वीपणास साजे अशा गुणांची बरीच समृद्धि असून त्यांस मिळणारें बाळकडूही निराळ्या प्रकारचें होतें ह्मणून त्यांनीं **राघोबास** रोकडा जबाब दिला कीं, "घरांतल्या घरांत आह्मी समशेर चालविणार नाहीं. शत्रु असेल तर दाखवा. त्याचा समाचार घेऊं." तेव्हां **राघोबाची** खात्री झाली कीं, ही सर्व मंडळी "बारभाई"च्या कटांत सामिल झाली आहे. यास्तव खासा स्वारी पुण्याकडे जाऊन पोरखेळ मांडणाऱ्या "बारभाई"चा बंदोबस्त करावा.हा मनसुबा **राघोबानें** कायम केला. **राघोबा** पुण्याकडे जाणार तों वाटेंत पंढरपुराजवळ **त्रिंबकराव**मामानें त्याला गांठलें. उभयतांची कांहीं वेळ चकमक झाली;आणि **नारायणरावास** ठार करणाऱ्याच्या कटांतील एका गाड्यावर राघोबानें अबदागीर धरविला. हें **मामा** व त्याच्या सहाय्यास आलेली **पटवर्धनाची** लहानशी टोळी यांच्या नजरेला आलें. त्या सरशी त्यांचा त्वेष एकाएकींच मनस्वी उचंबळला. कारण, राजास कपटानें व दग्यानें ठार करणाऱ्या नीच नराधमांच्या डोक्यावर अबदागीर धरलेलें त्या बाणेदार शूरांस कांहीं पाहवलें नाहीं. अनावर त्वेषामुळें, लष्करी शिस्तींत, बराच घोंटाळा माजला आणि त्यामुळें **राघोबाला** अनायासें चांगलें यश मिळून विजयप्राप्ति झाली! **त्रिंबकराव** मामा जखमी होऊन पडलेले **रा-**

घोबाच्या हातीं सांपडले. त्यांचे हाल जे कांहीं राघोबाच्या स्त्रीनें (आनंदीबाईनें) मांडले ते कानांनीं मुद्धां ऐकव नाहींत. पण इंग्लंड देशाच्या इतिहासांत आढळणारे "मार्टयर्स" ह्मणजे, सत्याकरितां व आपल्या मनाची खात्री झाली त्यावि रुद्ध वागावयाचें नाहीं या कृतनिश्चयाकरितां देहांतशिक्षेस किंव जिवंतपणीं चितेंत जाळून घेण्यास तयार होणारे खरे सत्यप भिमानी आमच्या देशांत नाहींत असें ह्मणणाऱ्यांस "एक शिवाय करून" आणि तेंही महाराष्ट्रांत असें ह्मणावया लावण्यासाठींच कीं काय कोण जाणे **त्रिंबकराव** मामा पेठे यांनीं, पाषाणहृदयाच्या अंगावरही रोमांच थरारून उठतील, अशा प्रकारचे हाल अगदीं निमूटपणें सोशिले!!

**त्रिंबकराव** मामाचा पराजय झाला आणि **राघोबा** विज योत्सवानें पुण्याकडे चालून येतो आहे असें ऐकतांच **नाना** प्र मुख "बारभाई"च्या तोंडचें पाणी पळालें. "सत्यसंकल्पाचा दाता भगवान" या वचनावर पूर्ण भरंवसा ठेवून **नाना** वगैरे स्वस्थ बसले, हीच फार उत्तम गोष्ट होय! **नानाचा** पक्का नि-श्चय कीं, **राघोबाचे** पाय ह्मणून मसनदीस लागूं द्यावयाचे ना-हींत, आणि त्यासाठीं भगीरथ प्रयत्न करावयाचे. पण मा-माच्या पराभवानें **नानांचें** मन भारी खिन्न व उदास झालें. त्यांना लष्करी बाणा नव्हता ह्मणून "आतां पुढें काय करावें" हा जप सारखा **नानांनीं** चालविला. **फडके हरिपंत** कट्टे शूर व रणधुरंधर त्यांनीं दम सोडला नाहीं. **भोंसले नागपूरकर** व हैद्राबादवाले **निजाम** यांच्या सहाय्यानें राघोबास धरण्याचा यत्न **हरिपंतांनीं** सारखा चालविला. यामुळें प्रथमतः पुण्या

१ जवानमर्द ब्राह्मणभाई ३ या पुस्तकांत ह्यांचें स्वतंत्र वर्णन देण्यांत आलें आहे.



न जातां परभारें नर्मदा उतरून **शिंदे, होळकर** यांचे सहाय्य यावें व "बारभाई"चा निःपात करावा ह्या धोरणामुळें **रा-घोबा** पुण्याचा रस्ता सोडून हिंदुस्थानाकडे जाऊं लागला. **शिंदे, होळकर** यांनीं, कायम आश्वासन असें कांहींच न देतां, नुस्त्या नादांतच **राघोबास** ठेवण्याचा संकल्प करून इकडे क्षा "बारभाई"शीं मसलती चालविल्या.

९ **सवाईमाधवरावाचा जन्म**—इकडे **नारायणरावाची** स्त्री **गंगाबाई** प्रसूत होऊन तिला मुलगाच झाला. मुलास व्वा महिना होतो न होतो तोंच त्याच्या नांवानें पेशवाईची द्वाही फिरवून पेशवाईचीं वस्त्रेंही त्याच्या नांवानें साताऱ्या-हून आणविलीं. त्या मुलाचें नांव **सवाईमाधवराव** ठेविलें. **सवाईमाधवरावासंबंधानें** अनेकांच्या अनेक कुतर्की दंतकथा आहेत. कोणी ह्मणतात **सवाईमाधवराव** सोनाराचा मुलगा. कारण **गंगाबाईस** खात्रीनें मुलगाच होईल असा भरंवसा नव्हता ह्मणून "बारभाई"नीं **गंगाबाईच्या** बरोबरीच्या अनेक गर्भिणी स्त्रिया पुरंदरावर ठेविल्या होत्या. **गंगाबाईस** ऐन वेळीं मुलगी झाली आणि दुसऱ्या एका सोनारणीस मुलगा झाला त्व्हां "बारभाई"नीं अदलाबदल करून **नानासाहेबांचा** औरस वंश चालविण्याची प्रतिज्ञा शेवटास नेली! या दंतकथेस काय आधार असेल तो असो. पण ही दंतकथा केवळ काल्प-निक, थोतांडी आणि कुत्सित बुद्धीची होय असें कोणासही व्हांच वाटेल. कारण, ब्रह्मघातकी ह्मणून **मालकास** रानोमाळ टकत उधळत लावणारे "बारभाई", प्रसंग बांका आला ह्म-णून सोनाराच्या मुलास मालक मानून आपल्या **धर्माचा** चुथडा राजविण्यास तयार होतील, ही कल्पना करणें, बालिश व स्वमत ह्मणून एक कांहीं आहे हें ऐकूनही ज्यांस ठाऊक नाहीं अशा

अजागळांसच साजते. गर्भिणी सोनारीण "बारभाई"नीं पैदा केली ती काय ब्राह्मण गर्भिणी मिळत नव्हत्या ह्मणून कीं काय? "बारभाई"ना १००० ब्राह्मणचित्पावन–गर्भिणी मिळवून पुरंदरीं ठेवणें शक्य होतें. पण तसें न करितां त्यांनीं सोनारीणच पैदा केली, हें कल्पनेला सुद्धां जुळत नाहीं. एवढी गोष्ट मात्र खरी कीं **नानाप्रमुख** पंचयतानानें पुरंदरावर पांच सात गर्भिणी ब्राह्मणस्त्रिया **गंगाबाईस** कर्मणुकीकरितां व सोबतीसाठीं ठेविल्या होत्या. पतिनिधनदुःखानें विव्हळ झालेल्या आणि कृत्या **आनंदीच्या** सासुरवासांत हाल हाल काढून थकलेल्या अनाथ **गंगाबाईस** कर्मणुकीसाठीं (बरोबरीच्या कोठून मिळणार?) पांच सात गर्भिणी **नानांनीं** पुरंदरावर पाठविल्या असतील तर त्यांत विशेष नवल नाहीं! शिवाय दुर्गाबाई **राघोबाची** कन्या ही पुरंदरावर होती. तिच्या देखत **गंगाबाई** बाळंत झाली. व ह्मणूनच पेशवाईसाठीं हपापल्यामुळें अंध, मूर्ख आणि अविवेकी बनलेला राघोबा **सवाईमाधवरावाची** द्वाही ऐकून स्वस्थ बसला. गचाळ व मूर्ख लोकांच्या चकाट्यांत आढळून येणारी वरील दंतकथा **राघोबास** चांगली पथ्यावर पडती व त्याचा फायदा घेतल्याशिवाय **राघोबा** कदापि राहताना. मसनदी आलेलें सव्वा महिन्याचें पोर सोनाराचें हें जर **राघोबाला** सांगतां आलें असतें व तसें **राघोबा** सांगत फिरता तर "बारभाई" केव्हांच फिके पडते! आणि मग सुरतेहून वसई आणि वसईहून डभई असे हेलपाटे घालीत बसण्याचेंही **राघोबास** विशेषसें कारण पडतेंना.

अस्तु. ह्मणजे तात्पर्य इतकेंच कीं, **सवाईमाधवराव** सोनाराचा मुलगा ही केवळ भ्रामक व चुकीची दंतकथा होय. ही दंतकथा सांगणारे व ऐकून ती खरी असेल असें मानणारे चांगले

अज्ञानी व विचारशून्य असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. "बारभाई"चें संकट पाहून करुणा आली व त्यांनीं तें संकट दूर करण्यासाठीं एका तपस्व्यानें गंगाबाईच्या पोटीं अवतार घेतला, ही धर्मवेडी व कल्पनामय दंतकथाच वरीलपेक्षां जास्त भली असें वाटलें तर त्यांत विशेष नवल नाहीं. एकंदरींत कसेंही असलें तरी **सवाईमाधवराव** **गंगाबाईच्या** पोटीं जन्मास आले आणि त्यामुळें "बारभाई"स धीर येऊन **राघोबा** जास्त निराश होत चालला ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे.

**गंगाबाईला** पुत्र झाला यायोगें **नानासाहेबांचा** वंश चालवावयाचा, इतरांस नमस्कार करावयाचा नाहीं, ही **नानांची** प्रतिज्ञा, ईश्वरानेंच शेवटास नेण्याचें मनांत आणलें ह्मणावयाचें! परंतु पुत्र झाला तरी, पेशवाईनभोमंडळांत गुडुप्प अंधार पाडणारीं निजाम आदिकरून ढगें, अतिवेगानें एकदा येथें तर दुसऱ्यानें तेथें चमकणाऱ्या कारस्थानी विजांचा चकचकाट, आणि गर्भगळित करणाऱ्या मत्सर व दुही यांच्या मेघगर्जना थोड्याथोडक्या नव्हत्या. **नाना** निधड्या छातीचा मनसुबेदार, ह्मणूनच, तो या काहुरास बगलेंत मारून, "या आणखी कितीजण येता ते," अशा रीतीनें संकटांस दरडावीत उभा ठाके. मूळ मसलतींतले "बारभाई" आपसांत फाटाफूट माजवीत; समशेरबाहादुर सरदार मंडळीवर कैद कोणाची उरली नाहीं; **राघोबा** "आलों, गिळतों, खातों" ह्मणून भलाबुरा मार्ग व उच्चनीच वृत्ति इत्यादिकांची बिलकुल पर्वा न बाळगतां "बारभाई"च्या पाठीस एकसारखा हात धुऊन लागलेला; बरोबरीचा साथीदार मातबर मुत्सद्दी, व सबंध शाहणा **बापू**, केव्हां कसा व कोणीकडे झुकेल "याचा अंत ब्रह्मादिकांस न कळे," इतक्या चंचल वर्तनाचा; आणि केवळ दुस्मनपणा वाढविणाऱ्या स्वार्थसाधूंच्या कुमकीवर मसलत पार पाडून नेण्याचा

प्रसंग; इतकीं हीं संकटें तुडविण्याचें काम **नानाफडणिसाच्या** हातून ह्मणूनच पार पडलें! इतरांची प्राज्ञा नव्हती. आणि त्यांत त्यात्यांत फडणविसाचे चुलत चुलत बंधु **मोरोबादादा** पहिल्या प्रतीचे व अस्सल फितूर; त्यांना वाटे काय कीं, आपला चुलत चुलत बंधु आपल्या बुद्धिप्रकाशानें महाराष्ट्रदेश दिपवीत आहे, तर त्याला खग्रास ग्रहण लावावें, ह्मणजे आपली कांहीं चहा झाली तर होईल. असा मतलब **मोरोबादादा** फडणीसाचा. ह्मणून तो **राघोबास** फितुर झाला; आणि **नाना** व **बापू** या धुरंधर मुत्सद्यांस कैद करून, तीच वाट **गंगाबाई** व **सवाई-माधवराव** यांचीही लावावी, असा घाट **नानांच्या** चुलत चुलत बंधूनें घातला! पण तो कांहीं शेवटास गेला नाहीं. **नानांचा** उपाध्याय व लंगोटीयार " जवानमर्द ब्राह्मणभाई " **हरिपंत फडके** यानें **मोरोबाचा** फितूर मोठ्या शिताफीनें पकडून ती वर्दी **नाना** व **बापू** यांस दिली. त्यामुळें **राघोबाचा** राज्य-प्राप्तीचा हाही डाव फसला.

**राघोबा** समोर उभा राहून कांहीं सामन्याला येत नाहीं व दूर दूर पळत राहून राज्यांत सारखा बखेडा व फितूर मांडतो तेव्हां त्याला आतां काव्यानें तरी पकडावें असा **नानांनीं** मन-सुबा योजिला. **शिंदे** व. **होळकर** हे **नानांस** सामील झाले. आणि **नाना, बापू** व **राघोबा** या त्रिवर्गांची–तुमची आपसांत समजूत करून देतों, असा ह्या उभयतांनीं घाट घातला. **नाना** व **बापू राघोबाशीं** सलोख्याचें बोलणें करण्यासाठीं पुण्याहून पुढें गेले, त्याप्रमाणें **राघोबा, शिंदेहोळकरांबरोबर, तापी** उतरून खालीं आले. उभयतांचीं बोलणींचालणीं झालीं; पण त्यांपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. **राघोबा** हेकट हट्ट धरून बसले, तो ते कांहीं केल्या सोडीनात. तेव्हां **राघोबास** कैद क-

रून अटकेंत ठेवण्याचें **नाना** व **बापू** यांनीं **शिंदेहोळक-रांच्या** संमतीनें ठरविलें. ही बातमी **राघोबास** आगाऊ कळली व त्यामुळें छावणींतून **राघोबानें** अगोदर पळ काढिला. त्याच्या पाठीस **शिंदेहोळकरांचें** व "बारभाई"चें सैन्य लागलें. व त्या सैन्यानें **राघोबाचा** पुरा मोडही एक वेळीं केला. तेव्हां **राघोबा** रातोरात **खंबायतेस** पळून गेला.

**१० इंग्रजांशीं राघोबाचें संधान.** "दोघांचें भांडण" झालें कीं "तिसऱ्याचा लाभ" झालाच पाहिजे. विश्वासानें एखाद्याच्या मांडीवर मान ठेविली व तो आपलें कुलशील इत्यादि चटसारें गुंडाळून आपण दिलेलें वचन व केलेले करार दग्यानें भिरकाटित सुटला व ती मान कापण्याचें निंद्य व नीच कृत्य त्यानें आरंभिलें तर तें गुपचिपपणें सिद्धीस जाईल यांत विशेष नवल नाहीं. इंग्रज, व्यापारी बाण्यानें केवळ तटस्थपणा पत्करून व प्रसंग येतांच "अमुकं देही तमुकं देही" ची मधुकरवृत्ति स्वीकारून इष्टकामसिद्ध्यर्थ पूर्वसमुद्रावर बकध्यान लावून बसले होते. **नानासाहेब** पेशव्यांशीं, तुमचे आह्मीं आमरण इमानी दोस्त, असा करार इंग्रजांनीं केला होता. व **माधवराव** पेशव्यांच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या मदतीनें एक दोन कामेंही या वनयेभाईनीं पार पाडून घेतलीं होतीं. परंतु स्नेही, आमरणांत आश्रित, असा करार लेखी करूनही कोठें व्रण पडेल आणि केव्हां आपली नष्ट व दुष्ट टोंच मारूं हा जप कोणत्या वृ-[१]

१ पेशव्यांमध्यें आपसांत तंटा उपजण्याचा कांहीं संभव आहे किंवा काय व कोठें आणि कधीं तरी गृहकलहाग्नीची ठिणगी तरी पेटण्याचा सुप्रसंग येईल किंवा कसें याची बित्तिबातमी देण्याबद्दल पेशव्यांचे आमरणस्नेही इंग्रज आपल्या वकिलास वारंवार लिहीत असें सि० स्टे० पेपर्स मुंबई, हे पाहिल्यानें कळून येणारें आहे.

त्तीस अनुरूप याचा उल्लेखही या लेखणीस " अस्पर्श" वाटतो! **राघोबानें** आपल्या पुतण्याचा खून करून राज्यप्राप्तीची हाव धरिली, तिला आडफांटा, " बारभाई "नीं आणून **राघोबास** " बंड " ठरविलें. त्याचा पक्ष कोणीही उचलीना, तेव्हां पेशव्यांचे 'आमरण दोस्त' ह्मणून कारारमदार करून दिलेल्या **इंग्रजांनीं राघोबाचा** पक्ष उचलला. दरसाल वीस लाखांच्या उत्पन्नाइतका मुलुख तोडून देणें व शिवाय साऱ्या पेशवाईचा आठवा हिस्सा, इतकें कबूल करून घेतल्यावर **इंग्रजांनीं राघोबाचा** पक्ष धरून " बारभाई "च्या पारिपत्याचा विचार चालविला! **राघोबाबरोबर** आपलें सैन्य देऊन इंग्रजांनीं पुण्यास जाण्याची तयारी केली. इकडे घरीं गडबड होतांच "दोस्त" इंग्रजांनीं पेशव्यांचा कांहीं मुलूख वळकाविला होता, त्याचा समाचार घेणें एकीकडेच राहून त्याच " ध्रुव-दोस्त " इंग्रजांस **राघोबानें** आपल्या भावी व मनोराज्यांतल्या पेशवाईपदाची तक्षीम देऊन सोडली.

आपलें सैन्य बरोबर देऊन इंग्रजांनीं **राघोबाची** पुण्याकडे रवानगी केली खरी, पण तें त्यांचें करणें, त्या इंग्रजांच्या कलकत्त्याकडील वरिष्ठ अमलदारांस बिलकूल आवडलें नाहीं. **राघोबानें** आपल्या पुतण्याचा वध केला आहे, तेव्हां त्याचा पक्ष धरणें न्यायास अनुसरून नाहीं व स्नेहीपणास विरुद्ध दिसतें, हा आव कलकत्तेकर **हेस्टिंग्सलाटानें** घातला. पण अंतस्थ हेतु निराळाच. **मुंबई, मद्रास** इकडे असलेल्या इंग्रजव्यापाऱ्यांवरील मुख्य अंमलदार **कलकत्त्याचा** लाट; त्याचाच हुकूम सर्वांनीं मानावा, असें नुक्तेंच ठरलें होतें. **मुंबईकडील** इंग्रजांनीं वर लिहिल्याप्रमाणें **राघोबाचा** पक्ष धरून त्यास सैन्याची कुमक केली, यांत **कलकत्तेकरांचा** मुळींच सल्ला घेतला नाहीं, ही गोष्ट

त्यांच्या मनास फार झणाणली व आपला अधिकार नव्यानें मिळाला तो किती जाज्वल्य, हें दाखविण्याच्या नादीं गुंतूनच **हेस्टिंग्स** या नांवाच्या कलकत्तेकर लाटानें **राघोबाची** कुमक करूं नका, पाठविलेलें सैन्य परत बोलवा असें फर्मावून पुण्याच्या दरबारांतील "बारभाई"शीं तुह्मीं आह्मीं दोस्तीचा संबंध ठेवूं, अशा बाहण्याचें बोलणें लाविलें! **नाना**फडणीस इंग्रजी काव्यास पुरून उरण्याजोगा होता; परंतु मनुष्य कसलाही हिम्मतवान, व केवढाही मर्द असला तरी, प्रसंग बांका आला ह्मणजे त्याला गाय व्हावें लागतें ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं. इंग्रजांचा हा डावपेंच **नानांच्या** ध्यानांत केव्हांच येऊन चुकला, व त्यांच्या चोंबड्या व कपटी दोस्तीच्या वर्तनाचा सुरेख सूड त्याला घ्यावयाचा होता. पण विचारा करणार काय? **राघोबास** हातीं घ्यावें, आणि इंग्रजांस थोपटून बसवावें अशा प्रकारें एकीकडली बाजू, थावराथावरीनें, जरा सुखरूपपणाची वाटली ह्मणजे, पायथ्याशीं गुरगुरणाऱ्या **हैदर**वाघाच्या डोक्यांत एकादा सोडगा घालण्यास मिळेल तर पाहावा हीं **नानाचीं** धोरणें; व त्याच धोरणांवर **नानानीं** इंग्रजांशीं तह करून, **राघोबास** एकदांचें आपल्या स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न केला!

**११ आपसांत तंटेबखेडे आणि फंदफितूर.** बाहेरले दाहा शत्रु, कट्टेदुस्मन पत्करतात पण आंतला एक हितशत्रु सहन होत नाहीं. बाहेरले शंभर शत्रु करूं शकणार नाहींत इतकें नुकसान एक घरभेद्या सहज करूं शकतो. यास्तवच प्रत्यक्ष शत्रूची गर्दन साफ उडविण्याच्या शौर्यापेक्षां, घरभेद्या व एक दोघां नव्हे दहापंधरा फंदफिसादवाल्यांस, बगलेंत मारून, त्यांच्या तमाम बेतांची व राज्यकारस्थानी बावटळीची धूळधाण उडवून देणाऱ्या कार्यधुरंधराच्या मनुष्याची तारीफ विशेष करणें जरूर आहे.

आणि ह्मणूनच आमचा फडणीस **नाना**, निधड्या छातीचा, फत्ते समशेरीचा, कडव्या व सदाविजयी अशा रणधुरंधराहून जास्त मोठ्या योग्यतेचा होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं! कारण सबंध, घरच्याघर उलटलें असतां व सहाय्यकारी मित्रमंडळ ह्मणविणारे कट्टे दुस्मन बनले असूनही हटकून खास घडणाऱ्या राज्यक्रांतीला साफ मज्जाव करणें; व आपलेंच वर्चस्व पूर्ववत् स्थापणें हें कांहीं साधारण महत्कृत्य नव्हे. **रावोबास** पेशवाईमसनद मिळूं द्यावयाची नाहीं अशी प्रतिज्ञा करणाऱ्या "बारभाई"त एकटा **नाना** एकीकडे व बाकीचे सर्व दुसरीकडे. **नाना**च्या खांद्याबरोबर खांदा देत राज्यधुरा उचलणारा कपटसिंधु **सखारामबापू** आजवर **नाना**ला मित्रत्वानें कारभार चालविण्याच्या कामीं झटून सहाय्य करी; तोही, वरकांती लोभ दाखवून, **नाना**शीं उघड वैर करण्याऱ्यांत सामील झाला! **नाना**चे पुरातन भाऊबंध **मोरोबा दादा** फडणीस तर काय हातांत तिळांजुळी घेऊन बसलेलेच. **नाना**ला कैद करून त्याचा कारभार एकदांचा आपल्या हातीं यावा ह्मणजे झालें या पलीकडे त्या बिचाऱ्याची दृष्टीच पोंचत नसे! **नाना**चीच छाप कां बसावी आमची कां बसूं नये हा मूर्ख हट्ट इतर कारभारी मंडळांत परोत्कर्षासहिष्णुतेमुळें आलेला. **सवाईमाधवरावां**कडेच पेशवाई ठेवावयाची, पण कारभार **दादासाहेबां**कडे सोंपवावयाचा असा घाट, **नाना**व्यतिरिक्त इतर "बारभाई"चा ठरला. **दादासाहेबां**स करभार चालविण्यासाठीं बोलावून आणण्याचे बेत, अगदीं चवाठ्यावर–पुणेंशहरांत चालूं लागले! ह्मणजे इतका प्रबळ पक्ष **नाना**च्या प्रतिपक्षाचा झाला! **नाना**जवळ समशेर कायती "मनसुब्याची" दुसरी लोखंडी किंवा

पोलादी समशेर कुमकेला हवी तरच त्या समशेरीचें चीज, नाहीं तर तिला कोण विचारतो ?

**नानाचे** लष्करी दोस्त **हरिपंत** फडके आणि **महादजी शिंदे** खालीं **हैदर** व **कोल्हापुरकर** यांच्या कटकटींत गुंतून पडले होते. पुण्यास व आसपास जवळ हातासरशीं कोणी नव्हते. यामुळें त्या बिचाऱ्या **नानास** कोण दगदग व काळजी सोसावी लागली असेल याची कल्पनाच केली पाहिजे! इतक्यांत **मोरोबा**-दादांनीं ठरविलें कीं, **नानास** कैद केल्याखेरीज आपल्या हातीं फडणीसी सुखरूपपणें यावयाची नाहीं; आणि **राघोबास** पुण्याला आणलें तर आपणास कारभारी बनण्यालाही अडचण पडेल यासाठीं असें होणें इष्ट नाहीं. त्यांच्या बेताप्रमाणें **नानाला** विश्वासाच्या नादीं गुंतवून दगा करण्याचा विडा कपटपटु **सखाराम** बापू यानें उचलला होता. **नानास** कैद करण्यापूर्वी ४।६ घटका **बापू**, **नानाकडे** जाऊन ह्मणाले, काय करावें ? **मोरोबा** दादांनीं सारखा उच्छाद मांडला आहे. याचा लौकरच कांहीं तरी बंदोबस्त केला पाहिजे; आपल्याला तर कांहीं सुचत नाहीं, आपला मनसुबा कसा आहे ? या **बापूच्या** प्रश्नास **नानांनीं** कांहींच उत्तर दिलें नाहीं. कारण गुप्त बातम्या आणविण्यांत **नाना** हातखंडे होते. आज रात्रीं तोफ होतांच **मोरोबा** दादा आपल्यास कैद करणार, ही बातमी सुद्धां **नानास** अगाऊ मिळाली होती. तर **बापूच्या** थापेबाज कपटजालांत ते कसे सांपडणार ? रात्रीं बारा वाजतां तोफ होणार व त्यानंतर आपणास कैद करण्याकरितां **मोरोबाचें** सैन्य येणार, याकरितां तोफेची वेळ चुकविण्याची व त्यापूर्वीच पुण्याहून पुरंदरावर जाण्याची **नानांनीं** गुप्त तजवीज करून ठेविली होती! **नाना** कोणाला नकळत मध्यरात्रींच्या सुमारास पुरंदरावर दाखल झाले!

**१२ पुढला कावा:**– इंग्रज, मोरोबा, राघोबा, सखाराम बापू व " बारभाई "पैकीं दुसरे सर्वजण एकत्र झाल्यासारखेच होते. तेव्हां त्यांच्यापुढें बिचाऱ्या एकट्या **नाना**चा टिकाव तो कसा लागणार? राज्यकारभाराचा नाद तुटला तो तुटला. शिवाय **सवाई माधवरावा**ची पेशवाई बुडण्याचाही सर्वत्र संभव दिसूं लागला! पुण्यास **मोरोबां**नीं मुख्यकारभाराचीं सूत्रें सुमुहूर्त पाहून आपल्या हातीं घेतलीं. इंग्रज हां, हां करीत पुढें पुढें सरसावूं लागले. आपल्यास आतां पेशवाई खास मिळणार ह्मणून **राघोबा** जिभल्या चाटूं लागला. आणि **नानां**ला पळावयास लावून आपण मोठा पुरुषार्थ संपादन केला या आनंदांत " बारभाई " गर्क होते. पण **नानां**च्या मनसुब्याला नवेंच अवसान व त्यांच्या हिमतीला नवाच दम रोज रोज येई. आतां कांहीं **नाना**चे पाय पुण्यास लागत नाहींत तेव्हां आपले हातपाय यथेच्छ पसरावे, अशी तयारी इंग्रजांनीं जारीनें चालविली. महाराष्ट्रसाम्राज्यनौका, बेवकूफ कर्णधाराच्या स्वाधीन करून एकाद्या खडकावर हापटूं द्यावयाची नाहीं, हा **नानां**चा संकल्प **पुरंदरीं** चालूच असे. वारा येईल तशी पाठ द्यावी आणि बुऱ्या प्रसंगांतून भलाईचा मार्ग शोधण्याची पराकाष्ठा करावी हा जो कार्यधुरंधरतेचा अपूर्व कौशल्यभाग तो **नानां**नीं कमी पडूं दिला नाहीं. या आपसांतील फंदफितुराचें आदिबीज, **मोरो**बाची राज्यकारभार हाकण्याची बलवत्तर लालसा-तें **नानां**नीं ओळखून त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवण्याची सुरुवात केली! मी कांहीं पुण्यास येत नाहीं; पुरंदरास राहून छोट्या **श्रीमंतां**चा परिपाल करितों. तुह्मीं पुण्यास मुख्य कारभारी व्हा. मदतीला **सखारामबापू** इत्यादि मंडळी घ्या व तुह्मीं पांचजण आणि मीं सहावा इतके मिळून मराठी साम्राज्य संभाळूं असें बोलणें **ना**-

नांनीं मोरोबांशीं लाविलें. मोरोबा मुटाईत कारस्थानी नव्हेच; तशांत तो जबऱ्या महत्त्वाकांक्षेच्या सपाट्यांत बिचारा सांपडलेला; तेव्हां त्याला नानाच्या या कावेबाज शरणागतीची भुरळ पडावी हें अगदीं साहजिक आहे! नानाला खात्रीच होती कीं, मोरोबाच्या तोंडीं कसाही लगाम लौकर नाहीं तर उशीरां पण-खात्रीनें आपण अडकवूच अडकवूं! त्याप्रमाणें आमच्या कार्यधुरंधर फडणीस नानानें पुढें लौकरच, मोरोबा दादा वगैरे मंडळीस आपल्या कह्यांत घेऊन, पूर्वीच सर्व हेतु सफल करून घेतले!

आपण होऊन नाना आपल्या हातीं कारभार देण्यास तयार झाले असें पाहून मोरोबाची धन्यता त्रिभुवनांत मावेना. त्याला वाटलें आज आपल्या हातीं मुख्य दिवाणगिरी आली; आतां कांहीं आपल्याला इहलोकीं कर्तव्य उरलें नाहीं. स्वर्ग आतां दोनच बोटें राहिला. नानांचें तेज आतां कांहीं रहावयाचें नाहीं अशा भ्रमांत मोरोबा गुंग होते. पण नाना कांहीं मोरोबासारखे भाबडे व भकेल तिकडे भकणारे नसल्याकारणानें त्यांनीं मोरोबास चार दिवस सुखरूप बागडूं दिलें. हातीं कारभार येतांच मोरोबांनीं राघोबास पुण्याला आणण्याचा विचार चालविला. परंतु, नानांला पक्कें ठाऊक होतें कीं, मोरोबा–मासा कोणत्या गळाला फांशीं पडेल! नानांनीं मोरोबास कळविलें कीं, राघोबाला पुण्यास आणल्यानें व्यर्थ तुमचें तेज मात्र फिक्कें पडेल. तुमचा स्वतंत्र कारभार नष्ट होऊन राघोबाच्या ओंजळीनें तुह्मांस पाणी पिण्याचा प्रसंग येईल; याकरितां, काय करणें तें मोठ्या विचारानें करावें. मोरोबा फक्त अधिकारास हपापलेला, त्याला अशा प्रकारचा उपदेश अलबत रुचावयाचाच. त्यानें नानाचा उपदेश शिरसावंद्य करून त्याप्रमाणें

वागण्याचा निश्चय केला. इतक्यांत **महादजी** शिंदे व **हरिपंत** फडके हे उभयतां **नानाचे** लष्करी दोस्त कर्नाटकांतून पुण्यास आले. ते येऊन पोंचतांच **नानांनीं** पुरंदरापासून आपला मोर्चा पुण्याकडे वळविला; व **मोरोबा**दादा इत्यादि तमाम मंडळीस खाड्खाड् कैद करून आपला अधिकार पूर्ववत्प्रमाणें चालविला. बिचारा **मोरोबा** औट घटका कारभार भोगून कारागृहांत खितापत पडला. **नानासारख्या** कारस्थानपटूशीं व्यर्थ स्पर्धा करण्याचें योग्य प्रायश्चित्त **मोरोबास** मिळालें, हें अगदीं विहितच झालें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. या हकीकतीवरून प्रसंग कसलाही आला तरी कारस्थानी व शाहणे पुरुष दम धरून व प्रसंगीं शरण आल्याचा बाहणा दाखवून अखेर आपला डाव कसा साधतात हें चांगलें कळून येण्यासारखें आहे. कोणतीही गोष्ट कां होईना, ती निव्वळ स्वार्थपर नसली ह्मणजे त्याबद्दलचें वर्तन निंद्य न होतां वंदनीय व कौतुकास्पद होतें, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे! **मोरोबादादाशीं** लढविलेला **नानाचा** हा कावा किती तरी कौतुकास्पद वाटतो, याचें मूळ कारण फारसें गूढ नाहीं. अस्तु. ह्मणजे एकंदरींत **मोरोबास** चांगलें धाब्यावर बसवून **नानांनीं** आपला पगडा पुनः बसवावयाचा तसा बसविला यांत काहीं संशय नाहीं.

**१३ इंग्रजांच्या कटकटी:**—अफाट दर्यांत जहाज लोटल्यावर त्याला चोहोंकडून वादळाची भीति असते व नावाड्याला सर्व धोरणें संभाळून सुकाणूं चालवावयाचें असतें. तशीच गोष्ट राज्यसूत्रधारी प्रधानश्रेष्ठाची होय! आमच्या महाराष्ट्र सार्वभौमसत्तेचें जहाज, दर्यांत हेलकावे खात फिरत होतें व त्या जहाजाला मालक ह्मणविणाऱ्या **राघोबानें** भोंकांमागून भोंकें पाडून आंत पाणी शिरविण्याची पुण्याई संपादिली; हैदर, निजाम असलाले

पिढीजाद व हाडवैरी दुस्मन त्या जाहजांस हिसक्यांमागून हिसके देत; वल्हीं मारणाऱ्यांत एकोपा, जूट, व परस्पर प्रीति हीं नसल्यामुळें मुख्य कर्णधार जो **नाना**फडणीस त्याच्या जिवाला किती दगदगी व त्रास सोसावा लागला असेल हें त्याचें तोच जाणे! 'ऐरावती रत्न थोर' 'त्यासी अंकूशाचा मार' हा प्रकार खरा आहे. **मोरोबा** व **सखाराम**बापू यांस, **नाना**ची जागा पटकावण्याची हाव सुटली व त्या प्रकारची हाव सुटली ह्मणून त्यांनीं बुरे प्रयत्न केले. त्याचें प्रायश्चित्तही त्यांना चांगलेंच मिळालें ह्मणावयास हरकत नाहीं! एकंदरींत **नानां**नीं आपली जागा आतां बरीच सुरक्षित केली. केवळ स्वहिताचा भाग नव्हता, मराठी साम्राज्याचीच **काळजी,** श्रीमंत **नानासाहेबां**चा अस्सल वंश चालवावयाचा, ही **प्रबळ इच्छा** आणि दुष्ट दुरात्म्यांची चलती होऊं द्यावयाची नाहीं हा **निर्धार** यांहींकरून परिपूर्ण असलेल्या **नानां**नीं "खूप शर्तीनें राज्य राखिलें." यामुळें आजच्या या राजकार्यधुरंधराबद्दल प्रत्येकाला मोठा अभिमान वाटून त्याच्या एकंदर कृत्याचें अभिनंदन करणें कौतुकास्पद वाटेल तर त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं.

इंग्रजांच्या अधिकप्रसंगाबद्दल प्रायश्चित्त देण्याचें महादुर्धर कार्य **नानां**च्या हातून ह्मणूनच पार पडलें. इतरांस त्यांचा कावाही पुर्तेपणीं कदापि कळला नसता. इंग्रजांचें **धोरण,** त्यांचा अपार **कावा,** विद्युल्लतेसम चंचल त्यांची **न्यायनीति** व प्रसंगाप्रमाणें हटकून वागण्याची त्यांची **तत्परता** यांची डाळ **नानां**पुढें मुळींच शिजेना. **नानां**च्याऐवजीं दुसरा कोणी "कर्णधार" असता तर इंग्रजांनीं हां हां ह्मणतां पेशवाई घशांत उतरविली असती. परंतु **नानां**च्या राजकार्यधुरंधरतेपुढें त्या बापड्या इंग्रजांस निव्वळ नाकेंच घांशीत बसावें लागलें; व त्यांनीं

तेची मात्र आतां कमाल झाली. असें ह्मटल्यांवचून राहवत नाहीं!

इंग्रजांनीं **नाना**स ह्मटलें, पुरंधरच्या तहाप्रमाणें आह्मांला बक्षीस देऊं केलेला मुलूख द्या, तेव्हां त्याला **नाना** फडणीसानें साफ उत्तर दिलें कीं, त्या पुरंधरच्या तहांत ठरल्याप्रमाणें **दादासाहेब** आमच्या हवालीं करा आणि मग काय मागणें तें मागा. या **नानां**च्या सरळ रोकड्या जबाबाचा इंग्रजांस घुस्सा आला. कारण, **नानां**नीं "जशास तसें" वागण्यांत इंग्रजांच्या दृष्टीनें महद्‌पराध केला. आतां एक मात्र गोष्ट खरी कीं, इंग्रजांचा हा असला **तिरस्करणीय** सांवळा गोंधळ चालला हें पाहून **नानां**नीं इंग्रजांच्या वकिलाचा, फ्रेंचांच्या वकिलासमक्ष, पुष्कळ व मोठा अपमान हरघडी केला. **नानां**नीं भरदरबारांत इंग्रजांच्या पारपत्याबद्दल फ्रेंचांशीं अनेक वेळां बोलणें चालणेंही केलें. पण यांत **नानां**ची चूक ती कोणती हें कळत नाहीं. बनयेभाई दोस्तांनीं आपण केलेल्या तहाला धाब्यावर बसवावें आणि त्याबद्दल प्रायश्चित्त देण्याचा विचार **नानां**नीं केला तर त्यांत दोष **नानां**चा का मुंबईकर इंग्रजांचा? आणि जशास तसें **नाना** करूं लागले तर तो **नानां**चा अपराध, व ह्मणून इंग्रज, या कुरापतीखातर **नानां**शीं लढावयास येतात! ही एकप्रकारची नीतिमत्ताच इतक्या मोठ्या किमतीची ह्मणावी आणि दुसरें काय? असो. आजमितीलाही, जर हाच न्याय प्रचलित आहे, तर तो त्या वेळचा, ह्मणून मेहरनजर करण्याचें, इतिहासकाराला तरी कांहीं प्रयोजन दिसत नाहीं!

इंग्रजांच्या लोंचट आणि तिरस्करणीय **वचनभंग**तेस कंटाळल्यामुळें **नाना**नीं मुंबईकर इंग्रजांस ताकीद केली कीं, पुण्यांतून सर्व गोऱ्यांस परदेशांस हाकलून देणार आहोंत, तर तुह्मीं

आपलें चंबू गबाळें अगोदरच आटोपा. असें करण्यांत, **नानांनीं** हिंदु लोकांच्या नैसर्गिक सभ्यतेचा व भलेपणाचाच पूर्ण अंगीकार केला असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. आणि असें **नानांनीं** फर्माविलें तर त्यांत इंग्रजांस वाईट वाटण्याजोगें काय होतें हें कळणें कठीण आहे. न बोलतां, न सांगतां कत्तल उडवून देणें **नानांचें** शील नव्हतें.

**नानांचा** हा वर्तनक्रम पाहून इंग्रजांस वाईट वाटलें. व त्यांस खूप रागही आला. कारण, आपण यथेच्छ वागडतों तर त्याला **नानांनीं** आड यावयाचें ह्मणजे काय? मोठाच गुन्हा तो आणि ह्या मानानें त्याला प्रायश्चित्तही देणें इंग्रजांचें आद्यकर्तव्य होतें! अस्तु. दुनयादारींतल्या या अशा मौजदार गमजा आहेत त्या पाहून ठेवाव्या इतकेंच.

**नानांचें** पारिपत्य करावयाचें ह्मणजे काय तर **राघोबाला** बगलेंत मारून पेशवाईत आपण हातपाय पसरावयाचे, असा इंग्रजी समज. आणि त्याप्रमाणें **राघोबास** बरोबर घेऊन, इंग्रज, पुण्याकडे यावयास निघाले. या बेताच्या सिद्धतेकरितां कलकत्याहून सैन्य रवाना झालें. पावसाळा संपतांच पुणें शहर काबीज करावयाचें असा इंग्रजांनीं मुंबईत आपल्या घरीं बेत केला. चोहोंकडून फौजा जमवून दादासाहेब व त्यांचे चिरंजीव **अमृतराव**, बोरघांट मार्गें, पुण्याच्या गादीवर इंग्रजांच्या हस्तें राज्याभिषेक करवून घेण्यासाठीं मोठ्या नोकाझोंकानें येऊं लागले. माजरूं डोळे मिटून दूध पितें, कारण तें आपलें करणें कोणाच्या नजरेस पडूं नये. तशी गत मुंबईकर इंग्रजांची झाली. त्यांना वाटलें काय कीं, बोरघांट उतरून पुण्या शेजारीं आपली मजल पोंचे तोंपर्यंत आपला हेतु फडणीस **नानांला** कळावयाचा नाहीं. पण **नाना** इंग्रजांच्या बारशास जेवलेला. त्यानें इंग्रजांची बि-

त्तिम बातमी ठेवून बोरघाटांतच इंग्रजांची चांदी आटविण्याची तयारी करून ठेविली होती. बोरघांटांत इंग्रजांचें सैन्य येतें न येतें तोंच मराठ्यांनीं इंग्रज सेनेवर छापा घातला. “त्राहीं त्राहीं” ह्मणण्याचा वखत मराठ्यांनीं इंग्रजांस आणून, ‘दे माय धरणी ठाय’ अशी त्यांची अवस्था करून सोडली! मराठे आहेत किती आणि आपल्यावर आगीचा डोंब उडवून देतात कोणीकडून हें देखील विचाऱ्या इंग्रजांस कळेनासें झालें. जिकडे पहावें तिकडे “हर हर”चा गजर. मागें परतवेना. पुढें सरकवेना. डावीकडे व उजवीकडेही मारा सारखा चाललेला. अन्न मिळेना, पाणी सांपडेना असा एकच कहर इंग्रजांवर गुदरला. कोणी कप्तान **स्टुअर्ट** ह्मणून इंग्रजी लष्करी अमलदार होता, त्यानें, हा मराठीसेनासमुद्र पसरला आहे तरी कोठवर आणि त्याच्या लाटा कोसळणार तरी किती, याचा अंदाज पाहण्याकरितां एका झाडावर चढून आपली दुर्बीण लाविली, तों इकडे मराठ्यांच्या सैन्यांतून **पानशे** यांनीं एक तोफ त्याच्या शिरावर रोंखून डागिली. त्यासरशी हातांतली दुर्बीण हातांत राहून त्या “इष्टुर फांकड्याचें” शिर कोणीकडल्या कोणीकडे उडून गेलें याचा टावठिकाणा उरला नाहीं!

आपसांत फंदफितूर पाडून अचानक आपल्या पोळीवर तूप ओढून घेण्याची कला इंग्रजांपासून खरोखर शिकण्यासारखी, यांत कांहीं संशय नाहीं. ही कला ह्मणजे मोठ्या महत्त्वाची आणि भारी अकलेची अशांतला अर्थ नाहीं. अशी कला आमच्या देशांतील लंगोट्यांसही कळते. पण अशा क्रमला आपसांत तंटे लावून आपला फायदा करून घेण्याला काळजाचा उलटेपणा हवा असून माणुसकीला अनुरूप अशा अनेक सद्गुणवृद्धीला ठार करावें लागतें; ह्मणून असल्या नीचतम गोष्टींचा त्यांस तिटकारा

[stamp]

स्वभावतः फार येतो. खाटकाला अनाथ गाईच्या मानेवर सुरी ठेवण्याला जशी दिक्कत वाटत नाहीं, त्याला तसें करणें ह्मणजे रोजचा साहजिक व्यवसायच वाटतो, त्याचप्रमाणें केवळ मतलब व नीचस्वार्थपरायणता यांच्या नादीं गुतलेल्यांस स्नेह, दोस्ती, उपकार, कृतज्ञता, सरळपणा, न्याय, नीतिमत्ता इत्यादि कशाची पर्वा नसते. दरोडेखोर असतात त्यांच्या अंगावर देखील बेइमानगिरी व निमकहरामपणा या योगानें कांटा उभा राहतो. एकाला एकदां दोस्त ह्मटलें किंवा एकाचें एक घटका निमक खाल्लें कीं मग स्वप्नांत सुद्धां त्याचा घात चिंतावयाचा नाहीं, हा प्रकार दरोडेखोर रामोशांत आढळून येतो. पण इच्छितकार्य भाग साधण्याकरितां हपापलेल्यांस त्याची कांहीं-एक पर्वा नसते. कसेंही होओ, कांहींही करा, पण आपली भर झाली ह्मणजे पुरे. मग तेथें नीतीचे मुडदे पडोत, का न्यायाची रांगोळी होऊन कृतज्ञतेचा नायनाट होओ; त्याची पर्वा नाहीं. ही त्या वेळच्या बनयेभाईची आचारनीति असे.

**राघोबाला** बगलेंत मारून पुण्यावर येण्याची तयारी करूनच इंग्रज स्वस्थ बसले नाहींत. **नागपूरकर भोसले** आणि इंदूरचे **होळकर** यांच्याशीं संधान बांधून आमच्या सहाय्याला नाहीं तर नाहीं पण पुणेंदरबारच्या सहाय्याला तरी जाऊं नका, तटस्थवृत्ति धारण करा, असा उपदेश इंग्रजांनीं चालविला. कांहीं आमिषाला भुलून नागपूरकर तिकडे वळलेही, पण **नाना** पटाईत मनसबेदार, त्यानें, नागपुरकरांपैकीं एका भावाला आश्रय देऊन, त्याला, इंग्रजांस स्नेही लेखणाऱ्यांशीं तंटा करण्याला फुस दिली. नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नसतें ह्मणून **नानांनीं** नागपुरकराला अशा तऱ्हेनें तोंड वांसावयास लाविलें. होळकर

कांहीं उघडपणें इंग्रजांस मिळाले नाहींत व मराठ्यांचा पक्षही पण त्यांनीं सोडला नाहीं.

इतकी इंग्रजांची तयारी होती तरी मराठ्यांनीं बोरघांटां त्यांची अशी धूळधाण उडवून दिली कीं, 'न भूतो न भवि ष्यति.' दांतीं तृण धरून मराठ्यांस शरण जाण्याखेरीज इंग्रजांना दुसरें गत्यंतरच उरलें नाहीं. आह्मीं हत्यारें खालीं ठेवितों, आ झाला आमच्या गांवीं सुखरूप जाऊं द्या, इतउत्तर तुमच्याशीं वैर करणार नाहीं, इत्यादि प्रकारचा नामोहरमी तह इंग्रजांनीं **वडगांव** मुक्कामीं **नानां**शीं केला. आणि भीक नको पण कुत्रा आवर अशी दशा झाली तेव्हां, मुकाट्यानें आपापल्या जागीं हायसें बसण्यासाठीं ह्मणून, मराठ्यांस नमस्कार करून इंग्रज समरांगणांतून परतले!

अशा प्रकारें **नानां**नीं आपला शह इंग्रजांवर बसविला खरा, पण त्यांचा कोडगेपणा कांहीं कमी झाला नाहीं. **वडगांव** मुक्कामीं झालेल्या अपमानाचा बचपा घेण्यासाठीं इंग्रज अगदीं टपून बसले. केव्हां प्रसंग येईल आणि केव्हां मराठ्यांचा पराभव करूं या खेरीज इंग्रजांस दुसरें कांहींच सुचेनासें झालें. कलकत्त्याचे इंग्रज व मुंबईचे इंग्रज मिळून पुण्यावर चालून येण्यास सारखे झटत. इंग्रजांचा पहिला अदमास काय कीं, आह्मीं निकराचा आव घालून मराठ्यांवर चालून जाऊं लागलों ह्मणजे **नाना** आपोआप बधेल. त्याला आमच्याशीं वैर करण्याची सवड नाहीं. त्याच्या सभोंवतीं हल्लीं प्रबळ शत्रु झाले आहेत. सर्वांशीं वैर धरून त्याचें चालावयाचें नाहीं. फक्त आव घातल्यानेंच आपलें काम होईल. पण **नाना** कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें इंग्रजांच्या या साऱ्या हुलकावण्या धाब्यावर बसविल्या आणि इंग्रजांबरोबर सामना देण्याची



जय्यत तयारी चालविली. इंग्रजांनींही आपली होती नव्हती तेवढी पराकाष्ठा करून पाहिली, पण कोठें कांहीं साधण्याचा रंग दिसेना. इकडे मराठ्यांशीं इंग्रजांनीं युद्धप्रसंग मांडला तों **है-दरनें**, इंग्रजांवर, मद्रासेकडे झडप घातली. तेव्हां मराठ्यांशीं दोस्ती संपादून हें एकदांचें युद्ध संपवावें आणि **हैदरा**वर चालून जावें, असें इंग्रजांस वाटलें. कारण, "समूळंच विनश्यति" असा आव **हैदरा**नें घातला होता. मराठ्यांशीं जय मिळाला नाहीं तो नाहींच पण आतां सुखरूप मराठे सोडतील तर पुरे असें इंग्रजांस झालें. तुह्मीं मध्यस्थी करून आमचा व मराठ्यांचा स्नेह करून द्या असें बोलणें कलकत्तेकरांनीं **नागपुर**करांशीं लाविलें. आह्मीं अमूक अटीवर तह करण्यास कबूल आहों असें इंग्रजांनीं **ना-नां**स कळविलें. तहाचें बोलणें करण्यासाठीं **नानां**कडे एक वकीलही इंग्रजांनीं रवाना केला. तरी **नानां**चा रोंख कांहीं निराळाच. पेशव्यांजवळ **हैदरा**चा वकील असे त्याला **नानां**नीं ह्मणावें, हा पहा इंग्रजांचा वकील तह करण्यास आला आहे. आमच्या खंडणीचा **हैदरअल्लीनें** निकाल करून आमच्याशीं दोस्ती ठेविली नाहीं तर इंग्रज व आह्मीं एक होतों आणि **हैदर-अल्लीस** ठार बुडवून सोडतों. इकडे इंग्रजांच्या वकिलास **नाना** तंबी देत कीं, हे पहा **हैदर** आह्मीं एक होऊन तुमचा नायनाट करून टाकूं. मर्जी असेल तर मुकाट्यानें आमच्या इच्छेप्रमाणें तह करून मोकळे व्हा!

**नाना** आणि इंग्रज यांच्यांत तहाच्या कलमांचा जो लढा पडला तो कांहीं केल्या कमी होईना. इंग्रज अडचणींत आहेत, **हैदरअल्लीनें** त्यांना चांगला शह दिला आहे. तेव्हां या अडचणीच्या प्रसंगीं वांकवावे तसे इंग्रज वांकतील हा भरंवसा **नानां**चा. आणि इंग्रजांस वाटे आपण सध्या अडचणींत आ-

होंत हें कांहीं मराठ्यांस ठाऊक नाहीं; उलट **नानाच** बेजारीस आला असेल त्यामुळें तो कोणताच तह•ठरूं देत नाहीं. **नानांला** इंग्रजांच्या अडचणीची चांगली माहिती होतीच. शेवटीं इंग्रजांसच दम निघेनासा झाला आणि ह्मणून ते **महादजीबुवांस** मध्यस्थी घालून एकदांचा तह-आणि तो **नानांच्या** मर्जीप्रमाणें—करण्यास आर्जवूं लागले !

**नानांच्या** मनांत इंग्रजांस पुरे पादाक्रांत करून त्यांस पुनः वर डोकें करितां येईना असें करावयाचें होतें. पण **महादजी** शिंद्याच्या मनांत इंग्रजांवर मेहर दाखवावयाची, कारण एक तर स्वहितबुद्धि आणि दुसरें हिंदुस्थानांत आपली सत्ता वाढविण्याच्या कामीं इंग्रजांनीं सहाय्य करावें ह्मणून त्यांच्यावर मोहबत करण्याची **महादजीस** साहजिक इच्छा होती !

**महादजी** शिंद्यानें आपण मराठ्यांशीं तह करून देतों अशी खातरजमा केली आणि **नानास** कळविलें कीं, इंग्रज आपणांस शरण आले आहेत. व त्यांच्याशीं आपल्या तर्फेनें मी करार करितों तर आतां त्यांच्यावर शस्त्र उचलूं नये! अशा प्रकारानें **पाटीलबुवांनीं** मध्यस्थी पतकरून **सालबाई** मुक्कामीं तह केला आणि इंग्रज मराठ्यांत एकदांचें ऐक्य झालें.

हें जें ऐक्य झालें तें करून घेण्यासाठीं इंग्रज कोण "नातवंतवानीं" वर आले होते हें चांगलेंसें ध्यानांत येण्यासाठीं एक क्षुल्लक गोष्ट सांगणें जरूर वाटतें. पश्चिम समुद्रांत इंग्रजांचें एक मोठें लढाऊ आरमार आलें होतें. **धुळप** हे मराठ्यांचे आरमारावरील सरदार, त्यांना, **सालबाई** मुक्कामीं तह होऊन इंग्रज व पेशवे यांच्यांत ऐक्य झालें, ही बातमी कांहीं माहीत नव्हती. ह्मणून **धुळपांनीं** इंग्रजांच्या आरमारावर चाल करून त्यांतील कैक इंग्रजांस ठार मारलें. अखेर इंग्रजांचें तें आरमार

पकडून सुवर्णदुर्गावर नेऊन अडकविलें! हा वास्तविक पाहतां इंग्रजांचा मोठा अपमान **धुळपांनीं** अर्थात् मराठ्यांनीं केला. त्याचा सूड उगविल्याशिवाय राहणें ह्मणजे केवळ शर्मेचें, असें कोणाही इंग्रजास साहजिकपणें वाटावयाचें. पण तसें कांहीं या बाबतींत झालें नाहीं. इंग्रज मुकाट्यानें मूग गिळून बसले. याचा अर्थ असा नव्हे काय कीं, **नानांच्या** दबदब्याखालीं इंग्रज अगदीं चिरडून गेले! हें काय **नानांचें** लहानसान कार्यधुरंधरत्व!!

आणखी एक मजा या आरमारासंबधानें आहे. **इलिजाबेथ** राणीच्या कारकीर्दीत "**अजिंक्यआरमार**" इंग्लंदावर रवाना झालें तशांतलाच प्रकार या आरमाराचाही होय. "**रिव्हेंज**" ह्मणजे सूड हें या आरमाराचें नांव आणि मराठ्यांचा सूड घेण्यासाठींच हें आरमार आलें होतें पण मराठ्यांचे सरदार **धुळप** यांनीं त्या "सूडा"ची धुळधाण उडवून दिली. **इलिजाबेथच्या** कारकिर्दीतल्या अजिंक्य आरमाराचें इतकें स्तोम आणि एवढें कौतुक अद्यापि इंग्रजांस वाटतें याचें कारण त्या लोकांतली स्वदेशप्रीति व स्वदेशच्या इतिहासाचें अभिमानपुरःसर अभिनंदन. तसा प्रकार आमच्यांत नाहीं. सबब कोठलें "रिव्हेंज" जहाज आणि कोण **धुळप** याची वार्ता देखील माहीत नाहीं, असे कैक हरीचे लाल भाग्यावारीनें सांपडतील! असो. कालमहिमा आहे.

**राघोबाचा शेवट.** इंग्रज व मराठे यांच्या झुंजास कारणीभूत जे आत्मलोभी **राघोबा** त्याचा पक्ष अजीबात सोडून देण्याचें, **नानांनीं**, इंग्रजांस भाग पाडलें. **सालबाईचा** तह झाल्यावर राघोबा निराश होऊन बुंदेलखंडाकडे गेला व तेथेंच असतां तो मरणही पावला.

**टिप्पूशीं लढाई**—(पहिला प्रसंग—) राज्यधोरणी पुरुष

असतात ते कोणते वेळीं काय धोरणानें कसे प्रसंग साधतात याचा कांहीं नियम नाहीं. 'गवयाचें पोर रडलें तरी तें ताल-सुरांतच,' अशा अर्थाची ह्मण आहे. तसाच प्रकार या राजकार्यधुरंधरांचा असतो. कोणताही प्रसंग असो किंवा कशीही गोष्ट घडो त्यांत आपला पैठ हा ठेवून द्यावयाचाच, ही रीत कांहीं कधीं चुकत नाहीं. इंग्रजांशीं युद्ध चाललें होतें व शेवटीं त्यांच्याशीं तह झाला. तह होण्याचीं बोलणीं चाललीं असतां नानांनीं हैदर व इंग्रज या दोघांसही हुलकावणी घालीत ठेविलें. पुढें प्रकार झाला तो तर कांहीं विचारूंच नये. तो भाग मनांत यथास्थित बिंबण्याकरितां विस्ताराचा घेणें भाग आहे.

इंग्रजांशीं सामना देण्याकरितां **नाना** गुंतले तेव्हां इकडे टिप्पुपिता **हैदर** याला चांगलेंच आयतें फावलें. **हैदराचा** कावा कोण्या प्रकारचा असे हें एकदां मागें सांगितलेंच आहे. पेशव्यांचा बराच मुलूख **हैदरानें** सर केला, ह्मणून, अनायासें इंग्रज "नातवंतवानी"स आले होते, तेव्हां, तो फायदा घेऊन **नानांनीं** इंग्रजांस **हैदरावर** तुटून पडण्याची संधि दिली. इकडे **हैदराशीं** मैत्री कायम आणि इंग्रजांवर तर पूर्वीच मोहब्बत केली होती. ह्मणजे दोन्ही बाजूंवर **नानांची** मेहेरनजर बाहेरून दिसे. यांत आणखी एक दुसरी खुबी अशी कीं, इंग्रज व **हैदर** युद्धास गुंतले ह्मणजे **हैदरानें** बळकावलेला पेशव्यांचा मुलूख मुकाट्यानें आपण घ्यावा, प्रसंग आला तर इंग्रजांस मिळावें व गरज पडली तर **हैदरखान** हातीं धरावा, अशीही सोयच्या सोय झाली ह्मणजे यायोगें पेशव्यांचा मुलूख **न** मागतां परत मिळण्याची संधि, **हैदराला** वचक आणि इंग्रजांस भीति अशा प्रकारचा हा डाव **नानांनीं** भारी गमतीनें टाकला ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं.

पुढें जेव्हां इंग्रजांचें व टिप्पूचें युद्ध जुंपलें तेव्हां इंग्रजांनीं नानांस विनविलें कीं, टिप्पूकडून हें युद्ध बंद ठेववा. नानांनीं टिप्पूस फर्माविलें कीं, इंग्रजांशीं झुंजूं नये, याउप्पर युद्ध बंद ठेवावें. टिप्पू हैसूरचा वाघ, भारी कडवा मुसलमान आणि तसाच तो शूरही पटाईत. तो काय या ब्राह्मण मुत्सद्यांच्या शांतिरस्तु पुष्टिरस्तूस दाद देणार आहे ! त्यानें नानांच्या फर्मानास चांगलें धाब्यावर बसविलें. तेव्हां अर्थात् अनायासें टिप्पूशीं झगडण्याचा प्रसंग मराठ्यांना आलाच. आतां नानांनीं टिप्पूस असें सांगण्याचा काय अधिकार होता ! व अधिकार नव्हता तर त्यांनीं त्याला कां सांगितलें आणि सांगितलें तें टिप्पूनें ऐकलें नाहीं ह्मणून त्याचें पारिपत्य करण्याचें प्रयोजन काय ! असे साहजिक प्रश्न उद्भवतात. तेव्हां त्याचा थोडासा खुलासा केला पाहिजे.

नानांची नव्हे, तर मराठी सरदारांची समजूतच मूळपासून अशी कीं, टिप्पू हा केवळ पेशव्यांचा मांडलिक. आणि दरसाल हैदर नाईक व त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा टिप्पू पेशव्यांस नक्त खंडणी देत असे. थोरले माधवरावांच्या कारकीर्दीपासून हैदरअल्लीकडे मांडलिकपणा आलेला असून पेशव्यांच्या दरबारीं हैदराकडून एक वकील नेहमीं हजर असे. यावरून पेशवे सार्वभौम आणि हैदर मांडलिक याबद्दल कांहीं शंका आली नाहीं. मांडलिकांस सार्वभौम राजानें फर्माविलें तर त्यांत गैर तें कोणतें ?

शिवाय सालबाईच्या तहांत टिप्पूस लढाई बंद करण्यास पेशव्यांनीं सांगावें असें एक कलम होतें, आणखी टिप्पू आपला मांडलिक, जणों पदरचा, असा भाव जरी नसला तरी घरोब्यांतला, अशाप्रकारचें वर्तन टिप्पूशीं मराठ्यांनीं ठेविलें

होतें. **हैदर** वारल्यावर **नानांनीं टिप्पूला** मातंगपोशीचीं वस्त्रें पाठविलीं होतीं. मातंगपोशी ऋणानुबंधी घरोब्याशिवाय पाठवीत नसतात.

या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे **नानांनीं टिप्पूला** लढाई बंद करण्याची फर्मान दिली यांत कांहीं गैर केलें नाहीं, हें कोणासही समजून येईलच. **नानांनीं** फर्माविल्याप्रमाणें कांहीं **टिप्पू** वागला नाहीं. त्यानें इंग्रजांशीं लढाई चालू ठेवलीच. तेव्हां निरुपायास्तव इंग्रजांच्या सहाय्यार्थ मराठ्यांस आपली कंबर बांधावी लागली. आमच्या कुमकेस या, असा घाबऱ्याघाबऱ्या निरोप इंग्रजांनीं **नानांला** पाठविला आणि त्या निरोपाप्रमाणें **नाना** लढाईची तयारी करितात न करितात तोंच इंग्रजांनीं उतावीळेपणानें **टिप्पूशीं** तह केला. **नानांला** या गोष्टीची भारी चीड आली. कारण एकदां विरुद्धपणा पत्करल्यावर मग माघार घेणें कमीपणाचें लक्षण होय. आणखी इंग्रजांस सहाय्य होऊन **टिप्पूवर** चालून जाण्यांत **नानांचे** दुसरे अनेक हेतु होते. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

**टिप्पू** मनस्वी गर्वी, त्याप्रमाणेंच तो मोठा अविचारीही असे. **निजामाची** त्यानें विनाकारण अप्रतिष्ठा केली, पेशव्यांचा तर राग संपादलाच होता, इंग्रजांशीं दुस्मनगिरी चालूच असे. तेव्हां सर्वांस साधारण शत्रु होण्यांत त्यानें कांहीं चांगला शहाणपणा केला नाहीं. **निजामाच्या** मनांत आपल्या अप्रतिष्ठेचा सूड उगवून **टिप्पूचें** पारिपत्य करावयाचें होतेंच. ह्मणून त्यानें **मराठ्यांचें** सहाय्य मागितलें. **नानांनीं** सहाय्य करण्याचें कबूल केलें. इतक्यांत **टिप्पूनें** मराठ्यांची दुसरी खवंडाळी काढिली. **नरगुंदच्या** संस्थानिकांवर अतोनात जुलूम करून पेशव्यांना चीड येण्यासाठीं कैक ब्राह्मणांस **टिप्पूनें** बहुत छळिलें. **नाना** फडणिसांना या सर्व गोष्टींची चीड येणें अगदीं साहजिक होतें.



ठाणे

अशा प्रकारें टिप्पूवर चालून जाण्याची जंगी तयारी चालविणें **नानांस** भाग पडलें. रास्ते, **पटवर्धन, फडके** आणि **होळकर** हे मराठ्यांच्या तर्फे टिप्पूवर तुटून पडावयास, अस्तन्या सारीत निघाले. **हैद्राबादकर** मोंगलही मराठ्यांच्या बरोबरीनें दाढ्या साफ करीत व दांत ओंठ चावीत **टिप्पूची** कणीक मऊ करावयास सज्ज झाले. खुद्द **नाना** या मोहिमेंत होते. **नानांचें** चरित्र राजकार्यधुरंधरतेच्या संबंधानें लिहावयाचें आहे व त्यांच्या कारकीर्दींत कोणकोणत्या महत्वाच्या गोष्टी घडल्या यांचें टिप्पण देणें भाग, परंतु युद्धांचीं किंवा लढायांचीं साद्यंत वर्णनें देण्याचें कांहीं फारसें जरूर नाहीं. कारण, त्याच्याशीं **नानांच्या** युद्धकौशल्याचा अर्थाअर्थीं संबंध कमी, तेव्हां त्याकडे जास्त कलम वाहविणें अनावश्यक होय. यास्तव या लढाईसंबंधानें जास्त कांहीं न ह्मणतां एवढेंच ह्मटलें तरी पुरे आहे कीं, **टिप्पूवर** मराठ्यांनीं आपली छाप बसवून अखेर विजयश्री आपण संपादिली, **टिप्पूला** तह करणें भाग पाडलें. मराठ्यांनीं त्याच्यापासून खंडणी बरीच वसूल केली. हा सारा प्रताप सरदार मंडळीच्या समशेरीचा. **नानांनीं** तहाचीं कलमें ठरविलीं, युद्धसंबंधाची सर्व सामुग्री यथास्थित जुळविली. **नागपूरकर सेनाधुरंधर** इंग्रजांकडून पैसा उपटीत, व मराठी साम्राज्यांतल्या उलाढालीकडे तटस्थवृत्ति धारण करण्याचें व्रत घेत, हें वर्तमान **नानांस** कळलें होतें. बंगाल्यावर स्वारी करून इंग्रजांना शह द्या, असा **नानांचा, सेनाधुरंधर** भोंसल्यास मागें हुकूम होता. पण १६ लाख रुपये इंग्रजांनीं सेनाधुरंधरांपुढें ओतले, तेव्हां, स्वस्थ राहून नागपूरकरांनीं **नानांच्या** मसलतीस धक्का

आणिला होता. त्याचा राग मनांत ठेवून प्रसंग येतांच **नागपूरकर** सेनाधुरंधरांस, आपल्या राजकार्यधुरंधरतेचा हात दाखवावा असा **नानांनीं** बेत गेला. पण, नागपूरकर सेनाधुरंधरांची एवढी छाती नव्हती कीं, राजकार्यधुरंधर **नाना**फडणिसांबरोबर स्पर्धा करावी! म्हणून आपण होऊन नागपूरकर भोंसले **नानांस** येऊन समक्ष भेटले आणि झाल्या अपराधांची क्षमा करा, इतउत्तर आज्ञेबाहेर वागणार नाहीं, वागलों हें विसरा, अशी त्यांनीं **नानांची** प्रार्थना केली. आपला देह सर्वस्वी मराठी साम्राज्याच्या उत्कर्षार्थ **नानांनीं** वाहिला होता तेव्हां मानापमान, राग, लोभ, या सर्व वृत्तीचा ते त्या साम्राज्याप्रीत्यर्थच विनियोग करीत. आपण होऊन सेनासुभे शरण आले आहेत, तर वांकडें बोलून त्यांचें मन दुखवावें आणि साम्राज्याच्या मसलतीस धक्का बसवावा हें **नानांच्या** हातून कसें घडणार? त्यांजकडून **नानांनीं** म्हैसूरच्या मोहिमेवर जाण्याची कबुलात करून घेतल्यावर आतां आपल्या मनांत कांहीं नाहीं असें **मुधोजी** सेनाधुरंधरास खात्रीपूर्वक सांगितलें. नागपूरकर भोंसले ससैन्य असल्याकारणानें या म्हैसुरावरील मोहिमेला बरेंच यश

---

१ **नानांचा** मूळवतनी गांव **वेळास,** हा इंग्रजांच्या ताब्यांत गेला होता. पण तो सोडवून घेण्याचा प्रयत्न **नानांनीं** कधींच केला नाहीं. याचें कारण **नानांनींच** आपल्या एका पत्रांत लिहून ठेविलें आहे. **नाना** म्हणतात—"मौजे वेळास हा गांव आमचा वतनी आहे. तो इंग्रजांकडे आहे. तो सोडवून घ्यावा असें मनांत होतें. परंतु साष्टी सरकारची सुटली नसतां आपला गांव सोडून घ्यावा हें ठीक नाहीं." **नानांच्या** हातीं अपरंपार सत्ता होती व तिचा उपयोग स्वकल्याणाकडे व स्वार्थतेकडे ते फार करून घेत, असें म्हणणारांनीं ही गोष्ट कृपा करून ध्यानांत ठेवावी म्हणजे त्यांचें तर्कटताडू थोडें तरी अडखळूं लागेल !!

आलें, हें सांगावयास नको. आणि भोंसल्यांस मोहिमेवर आणण्याचें काम **नानांच्या** राजकार्यधुरंधरतेमुळें साधलें.

**नाना** मोहिमेंत होते त्यामुळें सरदारमंडळीस बराच वचक होता. रात्रीं अपरात्रीं वेष बदलून **नाना** आपल्या छावणींत फिरून टेहळणी करीत, यामुळें मराठ्यांच्या सैन्यांत गैरसावधपणा असा कोठेंच दिसला नाहीं.

असो. ह्मणजे मुख्य सारांश इतकाच कीं, **नानांच्या** कार्यधुरंधरतेमुळेंच **टिप्पूवरील** ही मोहिम बहुतेक फत्ते झाली, असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. लष्करी सरदारांनीं आपली पराकाष्ठा करून यश संपादलें ही गोष्ट खोटी असें ह्मणतां येत नाहीं, तथापि लष्करी धोरण नसतां, **नानांनीं**, आपल्या सैन्याचा उत्तम बंदोबस्त ठेवून फार सुरेख व्यवस्था लाविली, आणि त्याचें फल **टिप्पूवर** विजयप्राप्ति हें होय, हें कांहीं कमी नाहीं. अशा प्रकारें **टिप्पूस** शरण आणून मराठे विजयघोषानें पुण्याकडे परतले. परंतु **टिप्पू** अतिमहत्वाकांक्षी असल्याकारणानें एका मोहिमेंत झालेल्या पराभवावर त्याची तृप्ति होईना. दुसऱ्या मोहिमेची त्यानें लौकरच तयारी केली.

**१६. दुसरा प्रसंगः**—इंग्रजांशीं व मराठ्यांशीं **टिप्पूनें** तहाच्या द्वारें स्नेह संपादन केला खरा. पण तो फार दिवस मुळींच टिकला नाहीं. प्रथमतः **टिप्पूनें** इंग्रजांशीं तह केला, त्या अन्वयें मराठे त्याजवर चालून आले. तेव्हां इंग्रजांनीं **टिप्पूच्या** कुमकेस जाणें अत्यावश्यक होतें. पण मराठ्यांशीं झुंजण्याची हिंमत कांहीं इंग्रजांना नव्हती. ‘कुत्ता जाने चमडा जाने’ असा कावा धरून इंग्रज तटस्थ राहिले. त्याचा **टिप्पूस** भारी राग आला होता. ह्मणून तो इंग्रजांच्या कुरापती काढण्याच्या तयारीस लागला. **टिप्पू** कुरापती काढूं लागला हें पाहतांच इं-

ग्रजांनीं, मराठ्यांशीं आणि मोंगलाई निजामाशीं संधान ठेविलें. टिप्पूच्या अंगीं शौर्य असे त्याच्या चौथाईनें तरी धूर्तता ह्मणा किंवा राजकारणी धोरण ह्मणा, त्याच्यांत असतें तर त्याचा असा निःपात सहसा झाला नसता. इंग्रजांशीं कुरापती काढावयाच्या होत्या तर त्या काढाव्या होत्या, पण मराठे आणि मोंगल यांच्याशीं तरी टिप्पूनें सलोखा ठेवावयाचा होता. पण तितकी अक्कल कांहीं टिप्पूंत नव्हती. त्यानें मराठ्यांसही चांगलें दुखविलें. इंग्रजांस जाऊन मिळतों असा नानांनीं आव घातला, इंग्रजांचा वकील आपल्याला कुमक करा अशी रदबदली करीत होता, तरी सुद्धां टिप्पूनें मराठ्यांच्या देण्याचा फडशा केला नाहीं. नानांनीं टिप्पूच्या वकीलाला पुण्यांतून जाण्याची रजा दिली नाहीं. इंग्रजांस कुमक करण्याचें पक्कें ठरलें होतें, तरी नानांची आशा काय कीं एवढ्यावर तरी टिप्पू हुषार होऊन आपल्या देण्याचा फडशा करून स्नेह संपादील. इंग्रजांस कुमक करण्याची नानांला कांहीं मनःपूर्वक इच्छा नव्हती. कारण टिप्पू हा बरा खळ आहे. त्यामुळें इंग्रजांस निरंकुशत्वानें वागतां यावयाचें नाहीं आणि तसें होणें नानांला चांगलें होतें. परंतु टिप्पूला नानां-इतकें धोरण कोठून यावयाचें ? त्यानें तिघांशीं सारखा द्वेष संपादला. यामुळें इंग्रज, मराठे आणि मोंगल हे त्रिवर्ग टिप्पूवर चालून गेले. इंग्रजांचा मुख्य लाट कार्नवालिस हा जातीनें युद्ध चालविण्यास आला होता. नानांनीं आपलें सैन्य इंग्रजांच्या कुमकेस पाठविलें खरें पण त्याचें आंतील धोरण कांहीं निराळेंच होतें. नानांनीं आपल्या सरदारांस आणि मोंगल निजामास साफ व निक्षून सांगितलें होतें कीं, टिप्पूला दीन करण्यापलीकडे आपल्याला दुसरें कांहीं करावयाचें नाहीं. इंग्रज त्याला साफ बुडवूं इच्छितात तर तसें बुडवूं देणें पुढें मागें आ-

पल्या नुकसानीस कारण होईल. याजसाठीं हें मुख्य धोरण ध्यानांत ठेवून मोहीम फत्ते करावी. हीच **नानांची** सक्त ताकीद **हरिपंतास** व पटवर्धन **परशुरामभाऊस** होती. त्याचप्रमाणें आपला स्वतःचा लागेल तितका लागा साधावा असाही **नानांचा** रोंख होता. ह्मणजे इंग्रजांच्या कुमकेस ह्मणून **नानांनीं** आपलें सैन्य **टिप्पूवर** पाठविलें. आणि इकडे आंतून हुकूम सुटत कीं **वेदनूर** सर करा; आमचा हा मुलूख टिप्पूनें बळकाविला तो परत घ्या. आणि **नानांच्या** हुकुमाप्रमाणेंच त्या सरदारांनीं वर्तन ठेविलें. **टिप्पूच्या** मुलखांत एकीकडून इंग्रज शिरले व दुसरीकडून मराठे आपणांकरितां मुलूख बळकावीत चालले. टिप्पूची व इंग्रजांची **श्रीरंगपट्टणावर** गांठ पडली. **कार्नवालिसाचा** दम, **टिप्पूशीं** लढण्याचा निघेना. अरे, साहाय्याला या, कुमक करा, मी अडचणींत सांपडलों, माझा निभाव लागत नाहीं, अशीं **कार्नवालिसानें** मराठ्यांच्या सरदारांस पत्रांवर पत्रें लिहिलीं; पण मराठे सरदार, ही संधि बरी असें जाणून आपल्या राज्याला मुलूख जोडण्याच्या धांदलींतच दंग होऊन राहिले. आतां अगदीं निर्वाणीचा प्रसंग जाणून **हरिपंत** व **पटवर्धन**, **कार्नवालिसच्या** कुमकेस गेले. **कार्नवालिस** हल्ला उठवून दुर्मुखानें परत चालला होता. त्याला वाटेंत मराठी सैन्य भेटलें. त्यामुळें इंग्रजांस दुप्पट हुरूप आला. आणि त्या आवेशांत टिप्पूवर इंग्रज पुनः तुटून पडले. त्यांत इंग्रजांस चांगलें यश मिळालें. पुढें **टिप्पूला** अजी ठार करण्याचा इंग्रजांनीं पक्का निर्धार केला. परंतु **नाना**फडणीसाच्या आग्रहावरून त्याच्याशीं तह करणें इंग्रजांस प्राप्त झालें. **हरिपंत फडक्यानें कार्नवालिसास** साफ सांगितलें कीं, **टिप्पूशीं** तह केलाच पाहिजे. आह्मी त्याला अजी ठार बुडवूं देणार नाहीं. तेव्हां मात्र इंग्र-

ांचा नाइलाज झाला. टिप्पूचें अर्धराज्य मराठे, मोंगल आणि इंग्रज या त्रिवर्गांनीं आपसांत वांटून घेतलें. शिवाय ज्याचा त्याला लढाईचा खर्च मिळाला व खेरीज पेशव्यांनीं काबीज केलेला मुलूख पेशव्यांकडेच राहिला. अशा प्रकारें या दुसऱ्या प्रसंगाचा शेवट झाला !

अशा प्रकारें दिवसेंदिवस **नानांच्या** कीर्तिसागराला भरतें येत चाललें. कोठें कोणी आड येणारा कांहीं उरला नाहीं. आणि असाच प्रकार सारखा चालता तर मराठी साम्राज्याची इमारत भक्कम पायावर मजबूत राहती. पण तें ईश्वरास आवडलें नाहीं. आमच्या राष्ट्रास रसातळाला पोंचविण्याचा **जगन्नियामकाचा** कृतसंकल्पच असल्यामुळें मानवी यत्नाचा तेथें काय इलाज चालणार? असे निराशेचे उद्गार काढणें निदान हल्लींच्या मन्वंतरांत हास्यास्पद होणार, हें उघड आहे. आमच्या परस्परांतील बेवकुफी मत्सरामुळें, नीचतर स्वार्थपरायणतेमुळें व मुख्यत्वें करून अनीतीच्या अजीर्णामुळें आमच्या राष्ट्रास दुर्धर ज्वर जडला आणि त्या ज्वराच्या योगानेंच आमचें राष्ट्र एकदांचें ठार झालें. तो प्रकार कसा हें आतां हळू हळू समजणारच आहे. म्हणून आपलें चाललेलें चऱ्हाट चालू ठेवावें हें बरें.

१७. दक्षिणेंत **नाना,** आपल्या "मनसुब्याच्या" तरवारीनें सर्वांस सारखे पादाक्रांत करीत सुटले, त्याप्रमाणें वर हिंदुस्थानांत पेशव्यांचे पिढीजाद सरदार **महादजी शिंदे** "पाटीलबुवा" आपल्या नंग्या समशेरीनें हिंदुस्थान नी हिंदुस्थान चळचळ कांपवूं लागले. **नानांनीं** मसलती सांगाव्या व पाटीलबुवांनीं त्या पार पाडून फत्ते मिळवावी, असा क्रम चालला होता. **नानांला** दक्षिणेंत **हैदर** आणि **इंग्रज** यांचा नक्षा उतरविण्याला **फडके** सरदार हत्यारबंद होते. त्या-

प्रमाणें हिंदुस्थानांत दिल्ली पातशहा व त्याचे मांडलिक ठार करण्यास **महादजी** शिंदे असत. **महादजी** रणधुरंधर तसाच राजकार्यधुरंधरही होता. **नाना** त्याला हुकूमवजा कारस्थानी मसलती सांगत, त्या तो समशेरीच्या आणि अकलेच्या जोरावर पार पाडी. प्रारंभीं प्रारंभीं **नाना** आणि **महादजी** शिंदा यांच्यांत स्नेह व सेव्यसेवकभाव होता. **नाना** पेशव्यांचे कुल-कारभारी आणि पेशवे **शिंद्याचे** पिढीजाद मालक. तेव्हां हर-एक मसलतीला पेशव्यांचा अर्थात् **फडणीसांचा** सल्ला **महा-दजीस** घ्यावाच लागे. महादजी ह्मणजे आपलाच, त्याची फत्ते ती श्रीमंत पेशव्यांची आणि महादजीची भरभराट ती मराठी साम्राज्याची, अशी प्रारंभीं प्रारंभीं **नानांची** समजूत होती. परंतु पुढें दुर्दैवानें ह्मणा अगर एकमेकांच्या गैरसमजुतीनें ह्मणा **नाना** आणि **महादजी** यांच्यांत परस्परांविषयीं विलक्षण तेढीं पडून भयंकर संशय येऊं लागला. **महादजीच्या** म-नांत **नाना** कारभार करीत आहेत तो आपण करावा, हिंदुस्था-नभर आपली चहा झाली, आपली समशेर चमकली, तशी दक्षि-णेंतही व्हावी ही त्याची इच्छा. आपण शूर आहोंत तसे कार-स्थानीही आहोंत हें सर्वांच्या प्रतितीला आणावें, ही **महाद-जींची** महत्वाकांक्षा. **नानांला** काय वाटे, **महादजी** भारी प्रबळ झाला, दिल्ली बादशाह त्यानें आपल्या हातीं घेतली, फौजफांटा इतका दुसरा कोणाचा नाहीं, **महादजीच्या** शौर्य-दिनकरापुढें सर्व दिपत चालले; त्याला दक्षिणेंत येण्याची हांव सुटली आहे, तो दक्षिणेंत येईल आणि सातारकरांस पेशव्यांनीं वागविलें तसें **महादजी** पेशव्यांस वागविण्याचा प्रयत्न करील ही **नानाची** भीति. **महादजी** मिठ्या गप्पा छाटून पेशव्यांस वश करून घेईल, आपल्या हातचा कारभार मग त्याच्याकडे जाईल

आणि ब्राह्मणांची सत्ता नष्ट होऊन सर्वत्र **शिंद्याची** बडेजावी माजेल अशी **नानांची** समजूत. आणि ती समजूत व ती भीति कांहीं निराधार नव्हती. कारण इंग्रजांना पेशव्यांशीं जें काय बोलावयाचें तें आपणांमार्फत व्हावें अशी **महादजीनें** तजवीज केली होती. **नानाला** हें कांहीं आवडत नसे. विनाकारण **महादजीचें** महत्व कां वाढावें व काय बोलणें करावयाचें तें इंग्रजांनीं आपल्याशीं करावें, असा **नानांचा** आग्रह होता. आणि त्यासाठीं **नाना** आपण होऊन इंग्रजांस ह्मणत कीं, तुमचा एक वकील आमच्या दरबारीं पाठवा. इतक्यांत **महादजीनें** इंग्रजांच्या बंगाल्याकडील मुलुखावर चौथाई बसविली तेव्हां **महादजीची** दोस्ती टाकून इंग्रज **नानांकडे** आले. या गोष्टी घडतात न घडतात तोंच मोठ्या फौजेनिशीं **महादजी** दक्षिणेंत यावयास निघाला. त्याचा अर्थ **नानांनीं** भलता कल्पून इंग्रजांचीं पलटणें पुण्यास आणविण्याची खटपट केली. **नाना** अशी कल्पना करितात ह्मणून **महादजी** सडेच दक्षिणेंत आले व आपल्या येण्याचा हेतुही त्यांनीं स्पष्ट कळविला कीं, दिल्लीपतीपासून मिळविलेल्या सनदा, किताबती, पोषाख, वगैरे खाविंदांस नजर करण्याला मी आलों आहें. त्याप्रमाणें पुण्यास आल्यानंतर मोठा दरबार भरवून फारच थाटामाटानें **श्रीमंतांस** **महादजीनें** अनेक चिजा व पोषाख नजर केले. आणि त्या प्रसंगीं **महादजीनें** इतकी लीनता धन्यास व दरबारच्या मंडळीस दाखविली कीं, यांत कांहीं तरी कावा आहे अशी कोणाचीही आणि केव्हांच खात्री व्हावी. **श्रीमंत सवाई** माधवरावांचे चर्मी जोडे खाकेंत मारून त्यांच्यावर **महादजी** चवरी ढाळीत भरदरबारांत उभा राही. बसा ह्मटलें तर मी केवळ हुजऱ्या, मला इतका मान कशाला ? योग्यता पाहून मीं वागलें पाहिजे

असें **महादजी** ह्मणे. या **महादजीच्या** वर्तनाचा **नानांला** संशय येणें साहजिक होतें. इतक्यांत एकांतीं **श्रीमंतां**जवळ **महादजीनें** गोष्ट काढिली कीं, आतां स्वदेशीं राहून राज्यकारभार करण्याची मजला इच्छा झाली आहे. ती पूर्ण करावी. यामुळें तर **नानांचें** आणि **महादजीचें** वैमनस्य जास्तच वाढूं लागलें. त्याला भर पडण्याला दुसरेंही एक कारण झालें. **महादजीनें** हिंदुस्थानांत अनेक प्रांत काबीज करून मराठ्यांची सत्ता अतोनात वाढविली. सिंधूपासून ब्रह्मपुत्रा नदीपर्यंत असा कोणताच मुलूख उरला नाहीं कीं, ज्यावर मराठ्यांची सत्ता नव्हती. तमाम राजेरजवाडे मराठ्यांस नियमित करभार दरसाल देत असत. **महादजीनें नानांस** ह्मटलें, इतकाले मुलूख सर करण्याला आपणांस अतोनात खर्च आला आहे, तर तो श्रीमंतांकडून मिळावा. **नाना** ह्मणाले सर केलेल्या मुलुखांची वहिवाट आज कांहीं वर्षें तुह्मीं केली आहे, तर त्या वर्षांच्या जमाखर्चांचे कागद दाखवा, जमाखर्च पाहून तूट निघेल ती सरकारांतून तुह्मांस मिळेल. हें कांहीं **महादजीस** आवडलें नाहीं. उभयतांची भरदरबारांत बोलाचाली होऊं लागली. पण उभयतां सारखे समजूतदार आणि खोल कारस्थानी असत. आपसांत असे कलह करीत बसल्यानें कोणते अनर्थ कसे ओढवतील हें उभयतांसही कळण्यासारखें असल्याकारणानें, उभयतांनीं, आपसांत समजूत करून असलेला तंटा एकदांचा मिटविला व मनांत याउपर किल्मिष नाहीं अशाबद्दल आणाभाका केल्या. इतकें घडे तोंपर्यंत **महादजीला** दक्षिणेंतून परत हिंदुस्थानाकडे जावयास लागावें ह्मणून **नानांनीं** होळकरास चिथवून **शिंद्याच्या** सैन्याशीं त्यांनीं कलागत लावून दिली ! होळकराला **महादजीचा** उत्कर्ष सहन होत नव्हताच. त्यांत **ना**-

नांची फूस मिळाली तेव्हां मग काय विचारावयाचें आहे ? होळकरानें दंगल मांडली हें वर्तमान कळतांच **महादजी** हिंदुस्थानाकडे जावयास निघाला. परंतु दुर्दैवानें वाटेंतच **महादजीस** नवज्वराची भावना होऊन त्यामुळें त्याचा काळ झाला. **महादजीचा** कैलासवास ह्मणजे महाराष्ट्रभूच्या सौभाग्याचा उतरता काळच होय! पण ईशेच्छाच ती, तेथें कोणाचा काय इलाज चालणार आहे!

**महादजीच्या** मृत्युसंबंधानें एका अर्वाचीन इंग्रज चरित्रकारानें आपल्या अकलेचे बरेच तारे तोडले आहेत. त्या कुतर्की इंग्रज चरित्रकाराचें ह्मणणें **महादजी** नवज्वरानें मेला नाहीं, तर त्याला **नानांनीं** विषप्रयोग करविला! कारण उभयतांत तसा बेबनावच होता! परंतु याउपर मनांत कांहीं ठेवावयाचें नाहीं, झाल्या गोष्टी विसरावयाच्या, ह्मणून ज्या उभयतांच्या श्रीमंतांसमक्ष आणाभाका झाल्या त्याचें आठ दिवसांच्या आंत असें परिमार्जन होणें शक्य किंवा अशक्य हें ताडण्याची तसदी अकलेला कोणीं द्यावी! आणखी **नाना** ह्मणजे पक्का धोरणी आणि पूर्ण स्वामिकार्यनिष्ठ. त्याला **महादजीच्या** मरणापासून कोण अनर्थ घडतील याचें अनुमान करितां येत नसावें

---

१ **नानां**संबंधानें याहीपेक्षां एक अतिनीच व उच्चारण्यास देखील किळस उत्पन्न करण्याजोगी कंडी इंग्रज इतिहासकारांनीं पिकविली आहे, हें ती पिकविणारांच्या मानसिक दौर्बल्याचें लक्षण होय! तर्काधारानें लादलेला ओंगळ व निर्लज्ज आरोप कमीपणा न आणतां तो आरोप आणणाऱ्यांचीच पारख चांगली करूं शकतो! याजपेक्षां त्या खोट्या व केवळ निराधारी आरोपासंबंधानें जास्त म्हणावयाचा यत्न करणें म्हणजे काळाचा दुरुपयोग करणें होय!

असें मानणें ह्मणजे तें एक प्रकारचें कोत्या बुद्धीचें धाडसच ह्मणावयाचें. आणखी नाना व पाटील यांचा वेबनाव होता तरी ते एकमेकांची मर्जी धरण्यास किती झटत हें त्या उभय-तांमध्यें झालेल्या पत्रव्यवहारावरून चांगलें व्यक्त होतें. शिवाय संपूर्ण राष्ट्रास काळ आणि प्रत्यक्ष पुतण्याचा भयंकर खून करवून साऱ्या हिंदुपदपातशाहीला आग लावण्यास तयार अशी केवळ कृत्या आनंदीबाई दीन होऊन अनाथ व उघडी पडली तरी तिचा सक्त सूड न उगवितां तिला उलटें ममतेनें वागविलें, अशा दिलदार कारस्थान्यांवर असला आरोप इंग्रज चरि-त्रकारांनीं ह्मणूनच केला. व हा आरोप आजपर्यंत कोणाच्या ध्यानींमनीं सुद्धां आला नाहीं. पण तो १८९२ सालीं The Rulers of India–हिंदुस्थानचे शास्ते–या इंग्रजी मालिकेंत दृग्गोचर झाला!

अशा प्रकारच्या कुत्सित तर्कटाची योग्यता त्याची चर्चा न वाढविण्याइतकीच असते. परंतु ओघासच गोष्ट आली ह्मणून तिचा उल्लेख करावा लागला. आणखी या नानांवरील आरोपा-संबंधानें एक गोष्ट कळविण्याची संधि आली आहे, ह्मणून ती गोष्ट कळवून पुढील कथाभाग आटपता घेण्याची तयारी क-रावी हें बरें.

नानांनीं महादजीस विष घालून मारविलें नाहीं. आपलें दुखणें असाध्य वाटलें तेव्हां महादजीनें नानांस मुद्दाम बोला-वणें पाठवून सांगितलें कीं, आतां माझा तर येथला कारभार आटपत चालला, मला औरस संतति नाहीं, माझें नांव चा-लवा, असें ह्मणून महादजीनें दौलतरावाचे हात नानांच्या हातांत दिले. व त्याप्रमाणें नानांनींही महादजीस तुमच्या सर्व इच्छा परिपूर्ण करीन, कांहीं काळजी बाळगूं नका, असें अ-

भिवचन दिलें. त्याच वेळीं नानांस कोणीं वजाविलें कीं, नाना, तुह्मीं केलें हें फार वाईट झालें. हाच दौलतराव तुमच्या नाशाला कारण होईल हें ध्यानांत ठेवा!

तेव्हां असा खरा प्रकार असतां "विषप्रयोगाचा" नानांवर आरोप इंग्रज ग्रंथकारांनीं केला हें त्यांच्या शीलास अनुरूपच असें ह्मणावें झालें.

**१८ खर्ड्याची लढाई.** इतक्यांत हैद्राबादकर नबाबानें आपलें डोकें पुनः वर उचललें. मश्रुन्मुलूख ह्मणून विराटपुत्रासारखा वाचाळ प्रधान निजामाच्या पदरीं होता. त्याला आपल्या शौर्याची भारी घमेंडी होती. तो वारंवार दरबारांत ह्मणे कीं, पेशव्यांना बैरागी बनवून काशीयात्रेला लावून देईन, तरच मी नांवाचा मश्रु. येवढ्यावरच ही स्वारी स्वस्थ बसली नाहीं. तमाशांत नाना फडणीस आणि त्यांचे मालक पेशवे सवाई माधवराव यांचीं सोंगें मश्रूनें आणविलीं! त्याच वेळीं पेशव्यांचे हैद्राबादेंतले वकील गोविंदराव काळे यांनीं प्रतिज्ञा केली कीं, तुह्मीं आमच्या खाविंदांचीं सोंगें तमाशांत आणिलींत तर आह्मी तुह्मांला दारोदार फिरवून तो तमाशा लोकांना दाखवूं. आणि असें करूं तरच नांवाचे गोविंदराव होऊं. पेशव्यांस द्यावयाच्या खंडणीची बाकी निजामानें फार थकविली होती. तिचा फडशा करण्याकरितां नानांनीं सारखा तगादा लाविला. उलगडा होईना तेव्हां निजामांशीं युद्ध मांडणें नानांला भाग पडलें. त्याप्रमाणें युद्ध होऊन खर्डे मुक्कामीं निजामाचा पुरा मोड झाला. निजाम, तह करितों ह्मणून दांतीं तृण धरून नानांस शरण आला. नाना व खुद्द मालक पेशवे हे या मोहिमेंत हजर होते. मश्रुन्मुलूख अगोदर स्वाधीन करा, मग काय तें तहाचें बोलणें, असा नानांचा आग्रह फार होता आणि त्याप्रमाणें अखेर नि-

जामाला कबूल करणें भाग पडलें! अशाप्रकारें निजामाची पुरी फजीती करून मोठ्या विजयोत्सवानें नाना व श्रीमंत पुण्यास परत आले.

**खड्र्याची लढाई** ह्मणजे मराठ्यांच्या प्रतापदिनकराचा संध्यासमय होय. याच वेळीं तमाम मराठे जमून एकदिलानें शत्रूवर चालून गेले. या लढाईनंतर पुनः असला एकोप्याचा प्रसंग केव्हां आलाच नाहीं. आणि आपल्या महाराष्ट्रभूचें नशीबही या लढाईनंतर केवळ फुटकें झालें, ह्मणण्यालाही हरकत नाहीं. **नानांनीं** या मोहिमेंत आपलें कारस्थान चांगलेंच गाजविलें. कारण छपन्न कुळींचे मराठे आणि तमाम सरदार या प्रसंगीं गोळा केले होते. त्यांचा इतमाम, मानमरातब सारखा ठेवावयाचा आणि मराठे आणि ब्राह्मण अशी माजलेली व माजत चाललेली दुफळी अजी नाहींशी करावयाची, हीं कामें कांहीं कमी अवघड नव्हतीं. शिवाय सकृद्दर्शनींच एक मोठी अडचण अशी उत्पन्न झाली होती कीं, या जमलेल्या सैन्याचें सेनाधिपत्य कोणाकडे सांगावें? ब्राह्मण सरदारांस सांगावें तर मराठे सरदार नाखूष होणार, आणि मराठ्यांत तर नांवाजलेला बाणेदार शूर असा कोणी नव्हता. साधारणास सांगावें तर ब्राह्मण योद्ध्यांस वैषम्य वाटावयाचें. **परशुरामभाऊ** पटवर्धन नांवाजलेले व अनुभविक योद्धे. सेनानीचें काम करण्यास तेच काय ते लायक होते; पण त्यांना नेमल्यानें शिंदे वगैरे मंडळीस दुखविल्यासारखें होईल. ह्मणून **नानांनीं** त्याला अशी युक्ति योजिली कीं, स्वतः प्रत्येक ठळक ठळक सरदारांच्या डेऱ्यांस जाऊन कोणाला सेनानी नेमावें ह्मणून त्यांचीच सल्ला घेतली. या युक्तीनें कोणास न दुखवितां आपला कार्यभाग **नानांनीं** साधून घेतला! पुढें शिंद्याच्या पदरीं शेणवी मंडळाचें बरेंच प्रस्थ माजलें होतें. त्याला **नानांनीं** अशी युक्ति यो-

जिली कीं, त्यांच्याकडे बऱ्याच महत्वाचीं कामें सांगून ही आ-जची मोहीम तुमची तुह्मी फत्ते करा वगैरे प्रकारें चांगलें ओं-जारून गोंजारून घेतलें. सारांश आपल्या नेहमींच्या वाणेदार कार्यकौशल्यानें **नानांनीं** ही मोहीम फारच सुरेख पार पाडली.

ही **खर्ड्याची लढाई** झाल्यानंतर **नानांच्या** भाग्याला नव्हे, तर महाराष्ट्रभूच्या सौभाग्यालाही उतरती कळा लागली! आणि शाहाणा शाहाणा ह्मणून नाणावलेल्या **नानांच्या** हातून मोठाल्या चुका आणि घोंटाळे एकामागून एक असे एकसारखे होत चा-लले ! त्या सर्वांचें कथन करणें ह्मणजे मोठ्या खेदाचें काम आहे. मराठ्यांतल्या अप्रतिम शाहाण्याचें ह्मणून हें चरित्र प्रथमतः लि-हिण्यास घेतलें, आणि त्याच्या शाहाणपणाचा हा वेळपावेतों ध-न्यवादही गाइला, पण अखेरीस मात्र त्या शाहाणपणाच्या ऐवजीं मूर्खपणा दाखविण्याचा प्रसंग आला, त्याला इलाज नाहीं! प्रस्तुत चरित्रलेखकाच्या वांट्यास हें अवघड व किळसकारक काम येतेंना ह्मणजे बरें होतें ! पण तसा योगायोगच नाहीं त्याला उपाय काय ? यामुळें **नानांचा** शाहाणपणा सांगत वाचकांच्या माना तुकावयास लावणाऱ्या लेखणीला, त्याच वाचकांची "नाकमुरडी" माजविण्याचा—दृष्टीच्या भीतीनें मुलास तीट=काजळाचें बोट लावण्याचाच हा समय असें समाधानार्थ मानून !! तो—प्र-संग वर्णावा लागतो हाही एक विधात्याचा कृपायुक्त चमत्का-रच ह्मणावयाचा ! **नानांचा** उजवा हात असा मित्र आणि सर-दार **हरिपंत फडके** कैलासवासी झाला त्यामुळें **नानांला** आळा घालणारा असा कोणी उरलाच नाहीं. असो. ही सर्व हकीकत क्रमवार सांगितलीच पाहिजे.

**१९ सवाई माधवरावाचा मृत्यु. नानांची** कदर सर्वत्र सारखी करडी असे. आणखी त्यांना शिस्तीचीही जरा जास्त

चीड होती. शिवाय आपणांवर कोणाचा वरचष्मा असूं नये हा एक जरा प्रमुखत्वेंकरून नानांच्या स्वभावांतला दोष होता. तेजस्वी पुरुष असतात त्यांचा स्वभाव असा असावयाचाच. पण चांगली गोष्ट काय, पदार्थ काय आणि गुण काय ते अतिशयपणांत गुंडाळूं लागले ह्मणजे त्यांची तेवढी किंमत कमी होते, इतकेंच नाहीं, तर तितका त्यांपासून अपायच घडत असतो. **सवाई माधवरावांवर नानांची** अगदीं बालपणापासून देखरेख आणि त्यांचा उत्तम वळण लावण्याचा धाक असे. **नानांला, सवाई माधवराव,** आपल्यापुढें रांगलेलें पोर असें वाटणें साहजिक होतें व ह्मणूनच **सवाई माधवरावांच्या** धनीपणा मुळें **नानांला** फारसा प्रतिबंध झाला नाहीं. केवळ स्वतंत्रपणानें बरींच वर्षें राज्यकारभार हांकून **सवाई माधवरावास** अकुतोभय पेशवाई संपादून दिली, ती केवळ **नानांनींच.** यामुळें श्रीमंत पेशव्यांचा **नानांस** धाक वाटेना; आणि **नानांपुढें** ह्मणण्यासारखें **श्रीमंतांचें** तेज पडेना. **माधवराव** आपले मालक व त्यांचे आपण नौकर ही गोष्ट कांहीं **नाना** विसरले नाहींत, किंवा जाणूनबुजून कधीं त्यांच्या हातून मालकाचा अपमान झाला नाहीं, या गोष्टी अगदीं खऱ्या आहेत. आपले मालक सातारकर छत्रपति व त्यांचे दास पेशवे, हा मूळ संबंध फक्त कागदोपत्रीं रहात चालला होता; पण पेशव्यांचा व सातारकरांचा संबंध कोणत्या प्रकारचा हें नानांनीं साऱ्या दुनयेदेखत साक्षात् वर्तनानें दाखविलें. **सवाई माधवरावाच्या** लग्नसमारंभास **सातारकर छत्रपति** आले होते त्यांच्यापुढें **श्रीमंत सवाई माधवराव** रुमालानें हात बांधून उभे राहिले व अनवाणी सामोरे गेले. इतका तारतम्यभाव ठेवणारे **नाना,** आपल्या खुद्द मालकाचा जाणून बुजून उपमर्द करतील हें शक्य नाहीं. तथापि ही गोष्ट खरी कीं **नानांनीं, श्रीमंत,** वयांत

येतांच त्यांच्या हातीं हळू हळू कारभार देऊन आपण मागें सरका-वयाचें. त्याप्रमाणें नाना वागावयासही लागले होते याबद्दलचा पुरावा सादर करितां येतो. सवाई माधवराव केवळ नांवाचे मालक असें लेखण्याचा क्रम नानांनीं ठेविला होता तर नानांच्या मर्जीतल्या घाशीरामास ठार मारण्याची श्रीमंतांनीं शिक्षा दिली हें कसें? नानांनीं श्रीमंतांकडे हळू हळू कारभार सोंपविण्याची सु-रुवात केली होती. व महादजी शिंद्यानें श्रीमंतांशीं संधान बां-धून आपणाकडे कारभार घेण्याचा घाट घातला होता, तेव्हां श्रीमंत माधवरावांकडे स्वतंत्रता होती ह्मणूनच मी आतां हरि हरि ह्मणण्याकरितां काशीनिवासास जातों, आज्ञा असावी, अशी त्यांची नानांनीं प्रार्थना केली व "डोळ्यांस पाणी आणिलें." ह्या हकीकतीवरून नानांनीं श्रीमंतांस अगदीं बाहुल्याप्रमाणें वाग-विलें, असें म्हणण्यास कांहीं आधार सांपडत नाहीं. आतां एवढी मात्र गोष्ट खरी कीं, पाटीलबुवांच्या कारस्थानांपासून जरा श्रीमंतां-वर सक्त देखरेख नानांनीं ठेविली असावी आणि त्यांत, राघो-बाच्या मुलांसंबंधानें श्रीमंत आपला रोंख तिकडे दाखवितात असें कळूं लागल्यापासून, व प्रत्ययास आल्यामुळें तर नानांनीं श्रीमंतांवर जास्त बंदोबस्ती जरब बसविली असावी. मराठी साम्राज्याच्या कल्याणार्थ जे बंदोबस्त करणें उचित आहेत असें नानांस वाटे त्याचा त्यांनीं अवलंब केला. हें सकृद्दर्शनीं कांहीं गैर झालें नाहीं. परंतु श्रीमंत सवाई माधवराव, नानांच्या कैदखोर शिस्तीस भारी कंटाळले आणि त्यांचा लळा राघोबाचा पुत्र बाजीराव याजकडे दिवसेंदिवस जास्त लागत चालला. बाजीरावानेंही माधवरावांस बरीच भुरळ पाडली होती व बाजीराव आणि माधवराव यांच्यांत चोरून पत्रव्यवहारही होऊं लागला. माधवरावानें बाजीरावास लिहिलेलीं पत्रें

हातीं आलीं तेव्हां नानांनीं माधवरावांची बरीच कानउघाडणी केली. पण तें माधवरावांस विषासारखें वाटून आपलें जिणें केवळ कैद्यासारखें असें त्यांच्या मनानें घेतलें. व त्या जिण्याला कंटाळून सवाई माधवरावांनीं तिसऱ्या मजल्यावरून खालीं उडी मारली व त्या अपघातामुळें त्यांचा अंत झाला! संपलें! मराठ्यांच्या ऐश्वर्याचे आणि विमल कीर्तिसंपन्नतेचे दिवस संपून नष्टचर्येला येथून प्रारंभ झाला आणि ह्मणूनच "खूप शर्तीनें" आजवर राज्य राखिलेल्या फडणीस नानांच्या हातूनही कैक मोठ्या भयंकर चुका होत चालल्या. त्याचें कथन खरोखर भारी कष्टकारक आहे. पण पत्करलेलें काम अर्धेंच सोडतां येत नाहीं!

२० पुढली मसलत. सवाई माधवरावानंतर पेशवाईपद कोणास द्यावें हा विचार नानांस पडला. राघोबाचा औरसपुत्र बाजीराव वास्तविकपणें योग्य वारसदार. पण त्याच्या हातीं अधिकार देणें नानांस फार धोक्याचें वाटे. कारण, आपला राघोबाशीं ठेवलेल्या वर्तनाचा व त्याच्या पश्चात् कैद वगैरे केलेल्या प्रकारचा सूड घेतल्याशिवाय बाजीराव कदापि राहणार नाहीं, अशी नानांची खात्री होती. राघोबा ब्रह्मघातकी. त्याच्या मुलास नमस्कार करणें नानांच्या जिवावर येई. आणि त्यांना नमस्कार करावयाचा नाहीं अशी तर प्रतिज्ञा करून नाना चुकले होते. आणखी बाजीराव पेशवा झाल्यावर आपल्या हातची सत्ता जाईल ही भीति. याशिवाय मग दुसरीं कारणें कल्पनेनें ताडतां येतात तीं निराळींच:- राष्ट्राचें नुकसान होईल, इंग्रज वरांत शिरतील, बाजीराव, सरदारांचा सूड घेईल, अशीं पुष्कळ कारणें आहेत. यामुळें नानांच्या मनांत बाजीरावास पेशवाई देण्याचें कांहीं नव्हतें. सवाई माधवरावांच्या

कुटुंबास कोणी दत्तक देऊन त्याची स्थापना मसनदीवर करावी ही नानांची मसलत. आणि त्या मसलतीस बहुतेक मंडळी नानांनीं अनुकूल करून घेतली. **शिंदे, होळकर, रास्ते, पटवर्धन** यांच्या सल्ला घेऊन त्यांजकडून निरनिराळीं पत्रेंही **माधवरावांच्या** कुटुंबास लिहविलीं. आणि **माधवरावांच्या** कुटुंबाच्या मांडीवर दत्तक देऊन राज्यकारभार चालवावयाचा निश्चयही कायम केला.

**शिंदे** यांच्या पदरीं शेणवी मंडळी भारी प्रमुख होती. त्यांत **जिवबादादा** बक्षी आणि **बाळोबातात्या** हे मुख्य होते. **जिवबा** महान् शूर आणि खासा कारस्थानी मुत्सद्दी ह्मणून प्रख्यात होता. **बाळोबाही** खोल कारस्थानी होता. आतां गादी कोणास द्यावी हा दरबारांत विचार चालला त्या वेळीं **बाळोबा** 'दत्तकविचारा'ला आड आला. **जिवबादादानें** दत्तक घेण्याची सल्ला दिली. **बाळोबाचें**, शिंद्याचे दरबारीं वजन फार होतें व तो मोठा धालमेली कारस्थानी, असें सर्वत्र महशूर होतें. **नाना** दत्तकाच्या विचारास लागले. त्यांनीं ती मसलत हां हां म्हणतां पारही पाडिली असती; परंतु मध्येंच **बाजीरावानें** आपण स्वतः खटपट चालविली. त्यामुळें **नानांचा** सर्व बेत फसला.

**२१ बाजीरावाची खटपट—नाना** फडणीस आपल्याला गादी मिळूं देत नाहीं, त्याच्या मनांत दत्तक वंशाकडे गादी चालवावयाची आहे आणि त्याला सर्व सरदारांनीं आपली संमति दिली, हें ऐकून **बाजीरावास** पराकाष्ठेचें वाईट वाटलें. एकटा **बाळोबा** आपल्या तर्फेनें बोलला, असें कळल्यामुळें आतां तिकडे तरी संधान बांधून पहावें असा **राव बाजीनें** निश्चय केला. आणि त्याप्रमाणें लगेच **शिंद्याच्या** दरबारीं असलेल्या **बाळोबाशीं बाजीरावानें** पत्रव्यवहार चालविला. मला गादीवर ब-

सवा, मी तुम्हांला चार लाखांची जाहागीर देतों, शिवाय हें काम करण्यास जो काय खर्च येईल तो माझा मी सोसतों, असें बाजीरावाकडून आमीष लागतांच बाळोबा भुलले. त्यांना आपलें वर्चस्व मिरविण्याची ही संधि फार उत्तम, असें वाटल्यामुळें आणि परंपरेनें पेशवाईत आपला शिरकाव हटकून होईल अशी खात्री झाल्यामुळें, बाळोबा, बाजीरावास गादीवर बसविण्याच्या तयारीस लागले. शिंद्याच्या गादीवर त्या वेळीं दौलतराव शिंदे होते. त्यांच्या वांट्यास, ब्रह्मदेवानें, अक्कल ही वेतावाताची सुद्धां दिली नव्हती. ह्मणून, पूर्वी दत्तक घेण्याबद्दल यशोदाबाईस आपणच पत्र लिहून ठरविलें काय आणि आतां त्याच्या उलट करावें कसें, हा विचार कांहीं दौलतरावास सुचला नाहीं. त्यानें बाजीरावासही लिहून दिलें कीं, या या करारावर तुह्मांला मी पेशवाईपद देववितों आणि त्याप्रमाणें त्या तयारीस अलिजा बाहादर लागलेही !! स्वहित आणि राष्ट्रहित यांत अंतर किती आणि स्वहिताखातर राष्ट्रहित बुडविणें हा कोण अधमपणा हें ज्यांना कळत नाहीं त्यांना मनुष्य तरी कसें ह्मणावें ? त्यांच्या जिण्यापासून दुनयेच्या कल्याणापेक्षां अकल्याणच फार व्हावयाचें यांत कांहीं नवल नाहीं.

२२ नाना फडणिसांचे गोंधळ—शिंदे, बाजीरावास पेशवाई देवविणार हें नक्की ठरलें, असें वर्तमान नानांला कळलें मात्र, तों त्यांनीं आपलें नवें असें दुसरेंच कारस्थान रचलें. पण त्यांत त्यांनीं दूरवर विचार किंवा पोक्त सल्ला योजिली नाहीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें. त्यांच्या निश्चयांतील काटकपणा व प्रयत्नांतील भगीरथता या वेळीं कशी नष्ट झाली याचेंच मोठें आणि राहून राहून आश्चर्य वाटतें ! शिंदे, बाजीरावास पेशवाई देवविणार, शिंदे फौजबंद आहेत, तेव्हां ही मसलत ते पार पाड-

तील असा नानांच्या मनानें ग्रह घेतला. आणि शिंदे उद्यां काम करणार तर तेंच आपण कां करू नये असा विचार नानांनीं केला. एकटे शिंदे वळले ह्मणून काय झालें, बाकीचे तर सर्व आपल्या बाजूला आहेत; आणि शिंदे वळले ते लोभामुळें, तेव्हां आपल्याकडेही ते न वळतील कशावरून, इत्यादि गोष्टी नानांच्या कशा ध्यानांत आल्या नाहींत याचें मोठें आश्चर्य वाटतें! आपण होऊन बाजीरावास गादी देववावी आणि शिंद्याच्या कुमकेचें कारण पडूं देऊं नये, ह्मणजे त्यांत आपली थोरवी व अधिकार तरी कायम राहील, हा विचार नानांनीं केला असावा. तें कसेंही असो. बाजीरावास पुण्याला आणण्याकरितां, नानांनीं, परशुरामभाऊस पाठविलें. तुह्मांला, गादीवर बसविण्याकरितां आणण्याला नानांनीं मजला पाठविलें आहे; असें परशुराम भाऊनीं बाजीरावास कळविलें, तेव्हां त्याला तें खरें वाटेना. यांत कांहीं तरी दगा असावा असें त्याच्या मनानें घेतलें. पण भाऊंनीं जेव्हां गाईचें शेंपूट हातांत घेऊन 'क्रियापूर्वक' कांहीं दगा नाहीं ह्मणून सांगितलें, तेव्हां बाजीरावाच्या मनांतील भीति नाहींशी झाली. मग ते पुण्यास यावयाला निघाले. पुण्यास आल्यावर बाजीराव आणि नाना यांच्यांत करारमदार ठरून, झाल्या गोष्टी होऊन चुकल्या, इतउत्तर उभयतांनीं मनांत कांहीं आणावयाचें नाहीं व पुढें एकदिलानें आणि साफ मनानें राज्यकारभार चालवावा, असें कागदावर करार होऊन ठरलें. आणि त्याप्रमाणें राज्यकारभारही चालूं लागला.

परंतु आपण गोष्ट करणार ती नानांनीं केली आणि आपल्या हातचें यश आणि आपला फायदा व्यर्थ गेला, ही गोष्ट कांहीं शिंद्याच्या मनांतून निघण्यासारखी नव्हती. त्यांना, नाना आणि

**बाजीराव** या उभयतांचा सारखा राग आला. आणि त्याबद्दल सूड घेण्याचाही त्यांनीं निश्चय कायम केला. **नानांला** इतउत्तर कारभारांत ठेवावयाचें नाहीं, आणि **बाजीरावास** पेशवाई पचूं द्यावयाची नाहीं, अशाबद्दल शिंद्यांनीं अर्थात् **बाळोबानें** मसलती चालविल्या. **शिंदे** मोठें सैन्य घेऊन पुण्यास येऊन दाखल झाले. शिंद्याचें सैन्य **पुण्यास** दाखल झालें ह्मणतांच **नानांचें** धाबें दणाणलें, त्यांचा जिवांत जीव नाहींसा झाला; आणि पुढें आतां आपली वाट काय याची त्यांना सारखी विवंचना पडली. **परशुरामभाऊ** ह्मणत, **नाना**, तुह्मी कांहीं घाबरूं नका; एकटे **शिंदे** एकीकडे आणि आह्मी सर्व एकीकडे, तेव्हां त्यांच्यानें काय होणार. पण **नानांला** इतका दम यावा कोठून ? भाऊ तुह्मी कांहींही ह्मणा, पण मला या शिंद्याचा आणि त्याच्या **बाळोबा** शेणव्याचा कांहीं भरंवसा येत नाहीं. ते कोणत्या वेळीं काय करतील याचा कांहीं नियम नाहीं. यास्तव माझ्यानें कांहीं आतां पुण्यास राहवत नाहीं, मी **सातार्‍याला** चालता होतों, असें ह्मणून **नानांनीं** **पुण्यास** रामराम ठोकिला आणि **सातारची** वाट धरली !

सातार्‍यास गेल्यावर **नानांनीं** **छत्रपति महाराजांशीं** संधान बांधून त्यांस सांगितलें कीं, एक कोटि रुपये देतों, लागेल तितकी फौज आपण ठेवा, पण हें **बाजीरावाकडील** पेशवाईपद काढून घेऊन **माधवरावाच्या** दत्तकसंततीकडे चालवा. सातारकर महाराजांना **नानांची** ही मसलत पसंत पडेना. ते ह्मणत अशानें आपली "विशोभा" मात्र होईल. मसलत सिद्धीस जाणार नाहीं. **नाना**, **सातारकरांच्या** मनांत भरवून देत कीं, हा सारा कारभार तरी तुह्मी आपल्या हातीं घ्या. पेशवे तुमच्या पदरचे, त्यांच्यावर तुमची सत्ता नाहीं हें काय ? पण तो दम **सातारक**-

रांत नव्हता. तथापि नानांच्या या कारस्थाबद्दल कोणासही तिटकारा आल्याशिवाय राहणें नाहीं. हेतूवर परीक्षा करावयाची तर सातारकरांस चिथावण्यांत नानांचा हेतु काय ? आपल्या हातीं पेशवाईचा कारभार नाहीं, तेव्हां, ती पेशवाई सातारकरांकडे परत आणून आपण पुनः कारभारी व्हावें, हाच नानांचा मतलब दिसतो. मूळराज्य सातारकरांचें, पेशवे मध्येंच बळकावून बसले, तेव्हां ज्याचें त्याच्याकडे जावें यांत कांहीं गैर नाहीं. पण तसें करूं पाहण्यांत हेतूकडे पहावें लागतें. आणि नानांच्या कारकीर्दीसंबंधानें लिहिण्याचा हा प्रसंग, सबब असा उल्लेख करवा लागला; इतकेंच.

२३ शिंद्याची खटपट—आपण केलेली मसलत फुकट गेली आणि आपल्या हातची शिकार अचूक नानांच्या हातीं पडली याबद्दल बाळोबा तात्या निसबत शिंदे यांना पराकाष्ठेचें वाईट वाटलें. शिंद्याला भिऊन नाना अगोदरच सातान्यास पळून गेले होते. यामुळें नानांला कैद करणें बाळोबास कांहीं साधेना. बाळोबानें पुण्यास राहून अनेक मसलती केल्या. त्यांत नानाचा दोस्त व मुख्य आधार सरदार परशुरामभाऊ, याला आपल्या कटांत सामील करून घेतलें, हेंच मोठें आश्चर्य होय. नानांचा व परशुरामभाऊंचा सुरेख स्नेह होता, पण हल्लीं तेच परशुरामभाऊ बाळोबास मिळून नानांचे कट्टे दुष्मन् बनले ! परशुरामभाऊ व बाळोबा यांनीं याउप्पर अशी मसलत केली कीं, बाजीरावाची पेशवाई दुसऱ्या कोणास तरी द्यावी. बाळोबानें नानांची जागा परशुरामभाऊंस दिली होती आणि ती सुरक्षित चालण्याच्या कामीं हटकून बाजीराव आड येण्यासारखा होता. तेव्हां बाजीरावाच्या ऐवजीं दुसरा कोणी तरी पेशवा परशुरामभाऊला हवाच होता. यशो-

दाबाईच्या—सवाई माधवरावांच्या स्त्रीच्या-मांडीवर **चिमाजी अप्पांस** दत्तक देऊन त्यांला पेशवा करावें ही मसलत **परशुरामभाऊंची** आणि **बाळोबाची** होती; व ही मसलत कशी काय आहे ह्मणून पुरातन दोस्त **नाना** यांना **परशुरामभाऊंनीं** विचारलें. **नानांनीं** या बेताला आपली पसंती तर दाखविलीच पण अमुक अमुक गोष्टींचा बंदोबस्त केल्याशिवाय या मसलतीस हात घालूं नका असेंही त्यांनीं स्पष्ट कळविलें !

**बाळोबा** आणि **परशुरामभाऊ** यांनीं **बाजीरावास** कैद करून त्याच्या जागीं **चिमाजीची** पूर्व संकेताप्रमाणें स्थापना केली; व त्याला पेशवाईचीं वस्त्रें, **नानांनीं** मध्यस्थी करून साताऱ्याहून पाठवून दिलीं ! पुढें **बाळोबाच्या** व **भाऊच्या** मनांत **नानांस** धरून कैद करावयाचें आलें. **नाना** यांच्या कपटजालास पुरून उरण्याजोगे असल्याकारणानें उभयतांच्या बेताची सफलता कांहीं झाली नाहीं. साताऱ्यास **नाना** होते त्यांस कैद करण्याकरितां **नानांच्या** दोघां हितशत्रूंस, **बाळोबांनीं**, पाठविलें. पण त्यांपैकीं एकास, **नानांचा**, हितशत्रुत्वानें दगा करून घात करणें आवडलें नाहीं. **नाना** व दोघे कैद करण्याच्या हेतूनें आलेले गृहस्थ, पुण्याच्या कारस्थानाबद्दल, सदरेवर गप्पासप्पा बोलत बसले. **नानांच्या** मनांत आपला दगा करावयास हे आले अशी कल्पनाही आली नाहीं. इतक्यांत कृतज्ञतेस जागणाऱ्या **नानांच्या** स्नेह्यानें आपल्या कानावर जानवें चढवून, **नानांस** या निमित्तानें आतां निसटा अशी सूचनादर्शक इषारत दिली. **नाना** जात्याच धूर्त, त्यांना एवढी इषारत मिळतांच, कैद करण्याच्या हेतूनें आलेल्या त्या उभयतांस, थोडें येथेंच बसा, मी जरा आंतून जाऊन येतों, असें सांगून, आपल्या कानावर जानवें चढवून, कोणत्या कामास आपण आतां चाललों हें

नानांनीं त्या उभयतांस दर्शविलें. लघुशंका किंवा बहिर्दिशेला नाना गेले आहेत, ते आतां इतक्यांत परत येतील व आले ह्मणजे त्यांस एकदम कैद करूं, हा त्या दगेखोर मित्राचा विचार होता. पण नाना कसचे परत येणार ! लघुशंकेचें ह्मणून निमित्त करून नाना जे आंत गेले ते थेट माहुलीस जाऊन पोंचले! कैद करावयास आलेले, नाना आतां येतील, घटकाभरानें येतील, अशी वाट पाहून दमल्यावर निमुटपणें चालते झाले!

ही अशी बाळोबाची मसलत फसल्यावर परशुरामभाऊंनीं नानांस कैद करण्याचा पक्कर घेतला. तुह्मी पुण्यास या, तुमचा कारभार तुह्मी पहा, तुमच्याविणें आमचें फार नडत आहे, वगैरे आमिषें, पत्रांतून, परशुरामभाऊ, नानांस दाखवूं लागले. नानांला अशा तऱ्हेनें फसवून पुण्यास आणावें व नंतर तेथें त्यांना कैद करावें हा मनसुबा परशुरामभाऊंचा. पण नाना त्याला बधणार आहेत थोडेच. नानांला पुण्यास आणण्याकरितां परशुरामभाऊंनीं खुद्द आपल्या चिरंजिवाची रवानगी करून दिली. पण तो मुलगा बरोबर लष्कर घेऊन येत आहे असें पहातांच नानांला त्याचा हेतु अगोदर कळून चुकला होता. ह्मणून नाना वांईहून कुच करून महाडास जाऊन दाखल झाले ! याप्रमाणें परशुरामभाऊंची हीही मसलत फसली !

**२४ नानांच्या कारस्थानाची कमाल !–सवाई माधवरावांनंतर** इतका वेळ नानांच्या वर्तनांत अतिशय भित्रेपणा व बुद्धीची विलक्षण चंचलता चांगली व्यक्त झाली ह्मणावयास हरकत नाहीं. महाराष्ट्र मंडळांत नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानांत, पूर्ण कारस्थानी, पटाईत धोरणी, साऱ्या दुनयेंत राजकार्यधुरंधर, अक्कलेचें आणि अटोकाट धोरणाचें माहेरघर

असें—इंग्रजांकडून कागदोपत्रीं—ह्मणवून घेण्याइतकी योग्यता असणारा **नाना**, आपल्या या अदूरदृष्टि वर्तनानें आपल्या शहाणपणास व कार्यधुरंधरतेस मुकत चालला कीं काय व मुकतो किंवा कसें ह्मणून शंका वाटावयास लागली! पण इतक्यांत त्यानें आपल्या कारस्थानपटुत्वाचा आणि कार्यधुरंधरतेचा असा एक खुबीदार डाव टाकून दिला कीं, तो पाहून त्याच्या कट्ट्या दुस्मनांनींही घटकाभर तरी तोंडांत बोटें घालावीं, आणि मोठ्या आनंदानें "शाबास" ह्मणून मान तुकवावी! तो बहारीचा प्रसंग साद्यंत पण थोडक्यांत सांगून फार लांबत चाललेला कथाभाग आटोपतों.

**परशुरामभाऊंचे** चिरंजीव दग्यानें आपणांस पकडावयाला येतात असें पाहतांच **नाना** महाडाकडे पळून गेले. इतका वेळ **नानांचें** अंगीं काळीज ससाचें होतें ह्मणावयास हरकत नाहीं. परंतु प्रसंगास अनुसरून त्यांनीं लेखणीच्या जय्यत तयारीबरोबरच आपल्या संरक्षणार्थ समशेरीची सामुग्री पैदा करण्याची तजवीज योजिली. आपल्याला कैद करण्याचें पुष्कळांचे मनांत आहे, व ती कैद, ते केवळ सैन्याच्या जोरावर करितात, तर आपणही पदरीं फौजफांटा बाळगावा, अशी योजना **नानांनीं** केली. **प्रतापगड, रायगड** हे किल्ले **नानांनीं** आपल्या स्वाधीन घेऊन तेथें लष्करी बंदोबस्त ठेविला. आपल्या पक्षाचे आणि आपल्या पसंतीस उतरलेले पटाईत कारस्थानी पुरुष, **नानांनीं** आपल्या जवळ जमा करून पांच हजार अरब व दुसरें इतर लष्करही पदरीं बाळगून, लढाईचा प्रसंग आल्यास " यः पलाय स जीवति"ची गरज ठेविली नाहीं!

**नाना** पदरीं फौजफांटा बाळगून किल्ल्याची डागडुजी करितात, आणि पटाईत पटाईत ह्मणविणारे कारकून गोळा

करून मसलती करितात, हें वर्तमान, शिंद्याच्या दौलतीचा लगाम हातीं धरणारा **बाळोबा** शेणवी याजला कळलें. तेव्हां त्यानें लगेच **परशुरामभाऊंस** सांगितलें कीं, तुह्मी या वेळीं शिंद्याचें सैन्य कुमकेस घेऊन **नानां**वर चालून जा. नाहीं तर कदाचित् मसलत बिघडेल. गांठ फडणीस **नानां**शीं आहे! त्याप्रमाणें **नानां**वर ससैन्य चालून जाण्याची **परशुरामभाऊंनीं** तयारीही केली. **नाना** बोलून चालून राजकार्यधुरंधरच; त्यांनीं ही जी फौजफांट्याची व सल्लामसलतीची योजना करण्याला स्थळ आणि वेळ पाहिली ती अशी कीं, कच्चेपणीं नरड्यावर नख लावण्याचाही योगायोग जुळून येऊं नये! पर्जन्यसुरुवातीची वेळ असून पावसाचें माहेरघर व प्रवासाला अति बिकट असें जें कोंकण तेथें **नानांनीं** आपल्या कारस्थानास सुरुवात केली. यामुळें झालें काय? तर **नानांचा** बेत अगोदर कळूनही, चार महिने तरी तिकडे कानाडोळा करून स्वस्थ बसणें, रणधुरंधरांसही प्राप्त पडलें! ह्मणजे सारांश चार महिने आपल्या कारस्थानाला अभेद्य राखण्याची पहिली खबरदारी **नानांनीं** घेतली. **परशुरामभाऊंनीं नानां**वर व त्यांच्या पदरीं जमत चाललेल्या सैन्यावर चाल करण्याचें नक्की ठरविलें. पण **नाना**, त्यांला रोज नव्या नव्या अडचणी, महाडास बसून, पुण्यांत उत्पन्न करवीत. यामुळें **भाऊंस** कांहीं **नानां**वर चालून जाण्याचा प्रसंग लौकर साधेना.

---

इकडे अशा तऱ्हेनें बंदोबस्त केल्यावर आतां पेशवाईवर कोणास ठेवावें व त्याचा कारभार आपल्या हातीं कसा येईल इकडे **नानांची** "मनसुब्यांची" तरवार वळली. **बाजीरावासच** पेशवा कायम ठेवावा हा निर्धार ठरल्यानंतर **नाना** त्या तयारीस लागले. **बाजीराव** तर **शिंद्याच्या** कैदेंत, कारभार **परशु**-

रामभाऊंच्या हातीं, आणि पेशवे **चिमाजीराव;** तेव्हां, इतक्यांकडे लक्ष ठेवून आपलें धोरण **नानांस** पुढें ढकलावयाचें होतें. **परशुरामभाऊ** ह्मणजे साक्षात् भीष्माचार्य, आणखी त्यांना शिंद्यासारख्या महाबलाढ्य व परम शौर्यशाली सेनेची भक्कम कुमक. त्यांच्याशीं स्पर्धा करणार, मुलखांतला भित्रा आणि बिगरलष्करी फडणीस **नाना**! परंतु बुद्धीच्या कुशाग्रतेपुढें समशेरीची धार बोंथट होते आणि कारस्थानी पेंचपाचांमुळें प्रचंड सेनासमूह सपसेल भुईवर पालथा पडतो; तो कसा? हें **नानांच्या** या कारस्थानावरूनच चांगलें कळून येणार आहे.

इतक्या सगळ्या घालमेलीस आणि दरबारी चुथड्यांस मूळ कारण **बाळोबा.** तेव्हां त्याचा प्रथमत: बंदोबस्त केला पाहिजे, ह्मणून **नानांनीं** युक्ति योजिली कीं, **बाळोबाच्या** उड्या साऱ्या शिंद्याच्या भिस्तीवर, तेव्हां, तिकडे कांहीं तरी संधान बांधलें पाहिजे. शिंद्याच्या मनांत **बाजीरावाला** पेशवा करावयाचें होतें आणि त्याला आपण आड आलों, ह्मणून इतके सांवळे गोंधळ माजले. तेव्हां त्या संधानावर शिंद्याला पुन: आपल्याकडे वळवावें असा **नानांनीं** निश्चय केला. शिंद्याला अवघा लोभ द्रव्याचा, आणि त्यासाठीं तो हवें तें करण्यास उद्युक्त होतो हें **नानांस** कळून चुकल्यामुळें, त्याच तऱ्हेवर **नाना** आपलें धोरण टेवूं लागले. **बाळोबाचा** दुष्मन् आणि शिंद्याच्या घसटींतला असा एक इसम **नानांस** माहीत होता. त्याच्या द्वारें **नानांनीं** शिंद्याशीं बोलणें लाविलें कीं, **बाळोबास** एकदम कैद करून **बाजीरावास** गादीवर बसविण्याच्या कामीं मदत कराल तर मी १० **लक्षांची** जहागीर बाजीरावांकडून आपणास देववीन. **परशुरामभाऊ** पटवर्धन यांचीही जहागीर मोठी आहे, तीही हवी असल्यास तुह्मांला बळकावयाला मिळेल. असें

सांगण्याचें कारण **परशुरामभाऊंचा** व शिंद्याचा स्नेह राहूं नये, परस्परांत वांकडें यावें हेंच मुख्य होय. अशा प्रकारें शिंद्याकडे संधान बांधून शिवाय आणखी दुसरीं धोरणें ठेविलीं. तीं हीं कीं, होळकरांची पूर्ण कुमक संपादन केली. **हरीपंत फड-क्याचा** मुलगा हुजुरातीच्या सैन्यावर मुख्य होता, त्याला वश करून घेतलें. आणि शिंद्याच्या कैदेंत असलेल्या **बाजीरावास** कळविलें कीं, तुह्मांला पेशवाई मिळविण्यासाठीं मीं असे असे भगीरथ प्रयत्न चालविले आहेत, मला अमके अमके वश झाले आहेत, तर तुह्मी मात्र आपलें इमान धड राखा व माझ्या या कारस्थानी सेवेचें चीज करा ह्मणजे झालें. आंधळा कांहीं दोन डोळे मागत नसतो. एकाच डोळ्यावर त्याची तृप्ति. तशी स्थिति **बाजीरावाची**. तेव्हां आपल्या हातून होईल न होईल तेवढें थोडें-बहुत साहाय्य करण्यास इकडे बाजीरावानेंही कंबर बांधिली. खर्ड्याच्या लढाईत पकडून आणलेल्या **मश्रुन्मुलुखामार्फत** संधान बांधून **निजामालाही नानांनीं** आपल्याकडे फितविलें आणि त्याचप्रमाणें नागपूरकर भोंसले यांसही आपली तरफ संभाळ-ण्याची विनवणी केली. **मश्रुन्मुलुख** मराठ्यांच्या कैदेंत होता त्याची सुटका कांहीं होण्याजोगी नव्हती; त्यामुळें **नानांचा** इ-लाज चालेना. **परशुरामभाऊंच्या** एका घरभेदी मुत्सद्यामार्फत **नानांनीं परशुरामभाऊंस** मसलत देवविली कीं, **मश्रूला** मुक्त करा ह्मणजे निजाम आपल्या बाजूचा होईल. **भाऊंस** तें खरें वाटलें आणि त्याप्रमाणें **मश्रूची** त्यांनीं सुटकाही केली. परंतु **नानांनीं** त्याला अगोदरच भारलें आहे हें कांहीं त्यांना कळलें नाहीं. अशा प्रकारें मजबूद व्यूह रचून झाल्यावर **नाना** साक्षात् प्रयत्नास लागले. **परशुरामभाऊ** मातबर योद्धा, त्याला कोणी-कडे तरी शह्यास गुंतवावें ह्मणून पटवर्धन सरदारांचे त्यांतून

**परशुरामभाऊंचे** पिढीजाद दुस्मन् कोल्हापुरकर छत्रपति, त्यांस **नानांनीं** फुसलत देऊन त्यांच्यावर उठविलें. शिवाय साऱ्या पेशवाई फौजेंत **नानांनीं** फारच सुरेख फितूर मांडून ठेविला होता तो निराळाच.

**नाना** प्रबळ होत चालले. कोंकणांत त्यांनीं दडी मारिली, त्यामुळें नाइलाजास्तव त्यांच्या पारिपत्यास सैन्य पाठवितां येईना; ह्मणून **परशुरामभाऊंची** आणि **बाळोबाची** कुंचंबणी झाली. तों इतक्यांत पावसाळा खलास झाला. **नानांवर भाऊंनीं** लगेच सैन्य रवाना केलें. पण त्या बिचाऱ्याला काय माहीत कीं आपल्या पायांखालील जागा पोंखरून पोकळ झाली आहे ती ! **परशुरामभाऊ नानांवर** सैन्य रवाना करून घटकाभर स्वस्थ बसतात न बसतात तोंच पुण्यास **नानांच्या** तर्फेनें **परशुरामभाऊंस** पकडण्याची गडबड उडाली. **परशुरामभाऊ** त्याच घटकेला कैद व्हावयाचे. पण **परशुरामपंतांस** कैद करण्याबद्दल लिहिलेली चिठी गफलतीनें त्यांच्या हातीं सांपडली, त्यामुळें हुषार होऊन **भाऊ** अगोदरच **चिमाजी** अप्पास घेऊन पुण्यांतून पळाले ! **बाळोबांस** शिंद्यानें कैद केलें, तेव्हां, फडणीस **नाना** पुण्यास येण्याकरितां कोंकणांतून एकदांचे हालले. **बाजीरावही** मोकळा झाला. पण **बाजीरावाचा** भरंवसा **नानांला** कांहीं येईना. ह्मणून **बाजीरावाच्या** हातचें एक पत्र व त्याजवर शिंदे आणि निजाम यांच्या जामीनातीच्या निशा करून घेतल्या तेव्हां **नानांनीं** पुण्यांत पाय ठेविला !

पुण्यास आल्यानंतर लगेच **नानांनीं** आपल्या हातीं फडणीसीचीं सूत्रें घेतलीं व **बाजीरावास** पेशवाईचीं वस्त्रें आणवून, **चिमाजीचें** दत्तविधान अशास्त्र आहे, कारण, ते **सवाई माधवरावाचे** चुलते, त्यांना चिरंजीव होतां येत नाहीं, असें शास्त्री,

विद्वान्, धर्माधिकारी यांजकडून पक्के ठरविलें. अशा प्रकारें या गूढ कारस्थानाचा शेवट लावून आपल्या अकलेची आणि धोरणी स्वभावाची नानांनीं कमाल करून सोडली ह्मणावयास हरकत नाहीं. या कारस्थानाला निरनिराळ्या प्रकारचे रंग सहज व कोणासही देतां येतील. पण सरळ रंग ह्मणजे हल्लीं दाखविला हाच खरा. कारण कारस्थान ह्मटलें ह्मणजे त्यांत अनेक लडथडी असावयाच्याच!

२९ **कैद**–इतकी पराकाष्ठा करून नानांनीं आपणांस व आपल्या बरोबर आपल्या स्वराज्यास येत चाललेल्या नष्टचर्येस प्रतिबंध करण्याची पराकाष्ठा केली खरी, पण "होष्यमाण" अथवा ज्याला "भवितव्यता" ह्मणतात ती चुकणार आहे थोडीच! बाजीरावासारखे मूर्ख, अजागळ, भित्रे, कपटी, खुनशी, बे-अकली, व्यसनी, दुर्बुद्ध आणि दुष्ट अशा नरपतीच्या कारकीर्दींत नानांस कैद झाली याचें फारसें आश्चर्य नाहीं. कारण हा एक प्रकारें सूडच उगविला! असें मनांत आणून समाधान मानावें! दुसरें काय! आपण जन्मलों कोणत्या कुळीं, आपल्या पूर्वजांनीं केलें काय, आपणांस करावयाचें उरलें कोणतें, आपणां-वर जबाबदारी आहे किती व तींतून पार न पडूं तर आपल्या योग्यतेची किंमत किती व कशी ठरेल इत्यादि गोष्टींचा विचार ही स्वप्नीं नसणाऱ्या आणि मनुष्यमात्रांत राहूं शकतील इतक्या तमाम दुर्गुणांची केवळ खाण अशा नरपशूच्या हाताखालीं वागून त्याचें कल्याण करण्याचें काम बजाविणें हें कांहीं लहानसान दुर्दैव नव्हे!

एकंदरींत नाना फडणीसांच्या अपूर्व करामतीचा, आणि अ-साधारण मनसुब्याचा, त्याचप्रमाणें अगाध बुद्धीचा व कल्प-नासागराचा बाजीरावासारख्या कपाळकरंट्या व हतभागी

धन्यापुढें कांहींएक उपयोग होईना. **नानां**ला कैद केलें तर आपला कारभार अकुतोभय चालून आपल्या जुलमी व आत्मघातकी सुलतानशाईस यथेच्छ मिरवितां येईल, असें **बाजीरावा**च्या कृतघ्न व हलकट मनानें पुरें घेतलें. त्याला दिलेलीं वचनें व त्याच्यापुढें वाहिलेल्या शपथा यांची तर गोष्ट एकीकडे राहो; पण त्यानें केलेल्या उपकारराशीला झुगारून, लाथेनें तुडवून **बाजीराव** कोणता मोक्ष साधणार होता नकळे!

अंतस्थ भानगडी आकाशांतील तारागणांइतक्या असंख्यात असल्याकारणानें त्यांचा उल्लेख असाध्य आहे. सबब, थोडक्यांत इतकेंच कळवावयाचें कीं, शिंद्याच्या मसलतीनें आणि **बाजीरावा**ची फूस होती ह्मणून **नानां**स दग्यानें कैद करण्याचा मनसुबा पुण्यांत कायम ठरला! **बाजीरावा**च्या अमदानींतले सरदार आणि त्यांचीं वर्तनें त्याचप्रमाणें खुद पुण्यप्रतापी सदायशवंत पंतप्रधान यांच्या स्वभावाचें आणि वर्तनाचें यथासांग वर्णन करण्याची चित्रगुप्ताखेरीज इतरांची ताकद नाहीं ही गोष्ट अगदीं खरी!

**नानां**स आपल्या छावणींत मेजवानीस ह्मणून बोलावून न्यावें, व तेथें त्याला कैद करावें, हा **शिंद्यां**चा बेत. कारण **नाना** फौजबंद असल्याकारणानें त्यांच्या नांदत्या घरीं कैद करण्याची हिम्मत **अलिजाबहादुर** शिंद्यांस किंवा त्यांच्या पुण्यप्रतापी मालकास नव्हती! आपल्यास कैद करतील अशी **नानां**ला पहिल्यापासून शंका होतीच. शिंदे **दौलतराव** यांनीं **नानां**कडे समक्ष अनेक वेळां येऊन व पत्रांतून–लेखी–कळवून, आपले वडील **पाटीलबुवा** यांच्या पायांशपथ तुमच्याबद्दल माझी कपटबुद्धि नाहीं असें हजार वेळां सांगितलें. तेव्हां, त्यांच्या आमंत्रणास न जावें तर विनाकारण त्यांच्या मनांत

शंका येऊन नसतीं वैषम्यें वाढावयाचीं, अशी नानांला शंका आली. शिवाय शिंदे इतके बलाढ्य फौजबंद आहेत; आणि आपले धनी इतके बेअकली बेवकूफ आणि बदनियतीचे आहेत तर आपला निभाव तरी कसा लागणार असेंही नानांच्या मनांत येई. एकदां वाटे काशीयात्रेला जावें, आणि मुकाम्यानें तेथें हरिहरि करीत बसावें. आतां आपलें वार्धक्य झालें, आपल्याला या राज्य कारभाराच्या दगदगी नकोत आणि याप्रमाणें श्रीमंत बाजीरावांस नानांनीं कलमी लिहून कळविलें. बाजीरावानें ती परवानगी दिली नाहीं आणि राज्यकारभार सुयंत्र चालण्यास ज्या कांहीं किरकोळ अडचणी होत्या व नानांला खुष ठेवण्याचीं जीं कलमें होतीं तीं, बाजीरावानें मोठ्या आनंदानें लेखी करारद्वारें कबूल केलीं. पण त्यांची किंमत जेवढ्यास तेवढीच ! !

शिंद्यांच्या छावणींत जाणें ह्मणजे त्यांत दगा आहे असें नानांच्या मनानें पक्कें घेतलें. शिंद्यांच्या सैन्यांत कर्नल मिचेल फेलोज ह्मणून इंग्रज अमलदार होता. त्याला नानांनीं बोलावूं पाठवून ह्मटलें, आज दगा नाहीं अशी आपण खातरजमा केल्यास मी छावणींत येतों. नाहीं तर येणें रहित करितों. इंग्रज लोक व इंग्रज इतिहासकार वक्तीं बेवक्तीं हरदम तोरा मिरवितात कीं, हिंदुस्थानचे लोक ह्मणजे वेवचनी; त्यांच्या आणा, क्रिया, व पवित्र शपथा यांची आणि इंग्रजी "होय" किंवा "नाहीं" याची किंमत सारखी. मेकाले नामक खुमारीची सफाई लेखण चालविणाऱ्या इतिहासकारानें तर, हें वर सांगितलेलें, साधारण इंग्रज व हिंदुस्थानचा भारी थोर मनुष्य यांच्यांतील नीतिमत्तेचें सर्वसाधारण लक्षण असें ठांसून ह्मटलें आहे. तें कदाचित ग्रंथोग्रंथीं खरेंही असेल. पण प्रत्यक्ष

अनुभव हरवक्तीं आणि हा वेळपर्यंत विपरीत येतो, याचें कारण काय हें मात्र कळत नाहीं. फेलोजनें आपल्या पवित्र बायबलावर हात ठेवून, तुह्मांस मी बिलकूल दगा होऊं देणार नाहीं हें खात्रीनें सांगतों; त्याबद्दल जिस्मा मीं घेतली ,अशा बद्दल हें लेखीही वचन घ्या, असें नानांस ठांसून सांगितलें, पुढें नानांस छावणींत नेण्याकरितां तोच फेलोज आला व नानांच्या पालखीबरोबर असलेल्या पांच हजार अरबांच्या टोळीस यांचें कांहीं काम नाहीं, त्यांना बरोबर आणूं नका, असा अग्रह नानांला करून त्या अरबांना त्याच फेलोजनें परत लाविलें. आणि नंतर अचानक कैद करून शिंद्यापुढें नानांला उभा करणाराही तोच फेलोज! इंग्रज एकवचनी आणि महानीतिमान खरे! पण दगलबाजी किंवा विश्वासघात या गणेशटोपीनें सपसेल पाडविणें आणि दिलेल्या वचनांचा खुबीदार भंग करणें हें त्यांच्यासारखें इतरांस मात्र साधत नाहीं, हें खरें आहे. असें फेलोजच्या संबंधानें तरी इतिहासकाराला ह्मणावयास हरकत कोणती ? असो. नानांला एकदांचें कैद करून शिंद्याला, खुद्द बाजीरावानें, आपल्या देखत पुणें शहर यथेच्छ लुटूं दिलें. कारण, त्याला देऊं केलेला ऐवज बाजीरावाजवळ नव्हता ह्मणून पुणें लुटून त्या रकमेची भर करण्याची अजब युक्ति बाजीरावानें लढविली! व ती नाना फडणीस कारभार हाकी तोंपर्यंत सिद्धीस जाणार नाहीं ह्मणून त्याला कैद करण्याची फूस शिंद्यास "पुण्यप्रतापी" राव बाजीनें दिली! असलें पांढऱ्या पायांचें रत्न गादीवर यावें हें महाराष्ट्रभूच्या नष्टचर्येचेंच मुख्य लक्षण ह्मटलें पाहिजे!

नानांला कैद करूनच शिंदे स्वस्थ बसले नाहींत. त्यांना नगरच्या किल्ल्यांत शिंद्यांनीं रवाना केलें आणि हें सर्व

**बाजीराव** मुकाट्यानें पहात बसला. या भोगाला काय ह्मणावयाचें आहे ?

**२६ बंधमुक्तिः—शिंदे** आणि **बाजीराव** एक होऊन विचाऱ्या **नानांला** त्यांनीं कैद केलें खरें. पण पुढें **शिंद्याचें** आणि **बाजीरावाचेंही** जमेना. इतक्यांत **शिंद्याच्या** घरीं कलहाग्नि माजला. त्या अग्नीनें चांगला पेट घेऊन **दौलतराव** शिंदा होरपळूं लागल्यामुळें त्यास मरणाचीही भीति वाटूं लागली. निजामाचें सहाय्य घेऊन शिंद्याचें पारिपत्य करण्याची **बाजीरावानें** खटपट चालविली. तेव्हां मात्र शिंद्याचें धाबें दणाणलें. तो घटकाभर गांगरून गेला. घरीं कलहाग्नि सारखा भडकत सुटलेला. आहे ती दौलत संभाळण्याची अंगीं अक्कल व ताकद नाहीं आणि निजाम व मालक पेशवे आपणांवर चालून येणार तेव्हां याला काय करावें ? या विवंचनेंत **दौलतराव** शिंदा असतां, त्याला कोणीं सल्ला दिली कीं, **नाना** फडणीसास कैदमुक्त करा ह्मणजे सर्व गोष्टी साधतील. गृहकलह **नाना** हां हां ह्मणतां मिटवितील. निजामाजवळ **नानांचें** विलक्षण वजन आहे. **नानांच्या** एका शब्दानें दरबार हालत राहील. शिवाय **नाना** मोकळे झाले कीं **बाजीरावाचे** ढंग आपोआप बंद पडतील. कारण **नानांचा** इतका वचकच **बाजीरावास** आहे ! शिंद्याला हें सर्व ह्मणणें खरें वाटलें. कारण, तसा वास्तविक प्रकार होताच. तेव्हां **नानांस** कैदमुक्त करण्याची सल्ला **दौलतराव** शिंद्यानें योजिली. कैदमुक्त केल्यास काय द्याल असें **नानांस** शिंद्याकडून विचारणें आल्यावर दाहा लक्ष रुपये देण्यास **नाना** कबूल झाले. व त्याप्रमाणें **दौलतराव** शिंद्यानें **नानाची** मुक्तताही केली !

**२७ पुनःराज्यकारभाराची सुरुवातः—**कैदेंतून **नानांची**

सुटका झाली तेव्हां **बाजीराव नानांशीं** स्नेहभाव दाखवूं लागले. **नानांचा** मानमरातब श्रीमंतांनीं उत्तम प्रकारें ठेविला. **नानांस** कारभारी करण्याचा विचार कांहीं प्रथमतः श्रीमंतांच्या मनांत नव्हता व **नानांलाही** कारभार करण्याचा कंटाळा आला होता. शिंद्याचें ठाणें पुण्यांत होतें तोंवर खुद्द पुण्यासही जिकडे तिकडे इमामशाही मोंगलाई चालली होती. शिंद्याला पुणें सोडून हालतां येण्याजोगें नव्हतें. कारण, घरचा कलहाग्नि आणि तो मोठ्या शिताफीनें **नानांनीं** कांहीं वेळ विझविला. **नानांला** कारभारी करा असा शिंद्याचा, त्याचप्रमाणें इंग्रजांचा **बाजीरावास** फार आग्रह चालला होता. पण तें **बाजीरावाच्या** मनास कांहीं येईना. त्याला वाटे काय कीं इंग्रज आणि **नाना** एक असावेत व **नानांच्या** धोरणाप्रमाणें आपण चाललों नाहीं तर ते खास इंग्रजाला राज्यांत आणणार. याला ह्मणावें खासा न्याय! कारण इंग्रजांस "खडे चारणारे" व चारण्यासाठीं अहर्निश प्रयत्न करणारे महाकुशल मंत्री व पक्के स्वराज्यनिष्ठ **नाना** त्यांच्या स्वप्नींही ही गोष्ट कधीं आली नसेल! **बाजीराव** मात्र इंग्रजांच्या मदतीनें आपल्या पिढीजाद नौकर सरदारांवर वचक बसविण्याकरितां आमच्या घरीं या असा इंग्रजांस आग्रह करीत असे!

पण **बाजीराव** ह्मणजे काय! घटकेंत छप्पन्न तरंग येणाऱ्या बुद्धीचा खंदक. आतां एक तर घटकेंत दुसरें. केव्हां मनांत काय येईल आणि कोणता बेत कसा फिरेल याचा कांहीं त्याच्या जवळ धरबंधच नव्हता. प्रथम **नानांला** कारभारांत घेऊं नये असा त्याचा निर्धार होता. पण लगेच **नानांजवळ** त्यानें बोलणें लाविलें कीं, कसेंही करा आणि एवढीं कारभारसूत्रें हातीं घ्या. **नानांनीं** त्याला साफ जबाब केला कीं, इंग्रज आणि

मोंगल निजाम यांना जामीन दिल्याशिवाय मी दरबारांत पाऊल टाकणार नाहीं. आणि ती गोष्ट तर साधण्याजोगी नव्हती. याला काय करणार ? तेव्हां त्याला बाजीरावानें सवंग व सोपीशी युक्ति योजिली. एके दिवशीं मुकाट्यानें कोणास न कळतां बाजीराव नानांच्या वाड्यांत गेला आणि नानांच्या पायांवर डोकें ठेवून व आसवें डोळ्यांत आणून ह्मणाला, नाना! तुह्मी मजला तीर्थरूपांच्या ठिकाणीं; आजवर आपल्या राज्याचें तुह्मीं नांव राखिलेंत. हें जहाज आतां अर्ध्यांच वाटेला बुडवूं नका ! तुमच्या पायांची शपथ वाहतों, तुमच्याशीं अन्यथा व कुमित्रभावानें मी वागावयाचा नाहीं. हें मालकाचें भाषण व त्याची इतकी लीनता पाहून नानांस काय वाटलें असावें याची कल्पना कोणासही सहज होण्यासारखी आहे. नानांनीं तें श्रीमंतांचें ह्मणणें मुकाट्यानें मान्य केलें. जास्ती कांहीं आढेवेढे घेतले नाहींत, कारण घेणें रास्त नव्हतें.

**२८ शेवटः**—वाघ खरा पण त्याचे पाय बांधून, त्याची मर्जी नसतांना, खंगल्या–थकल्या–भागल्या वेळीं जर त्यास श्वापदावर नेऊन सोडलें तर तो ज्याप्रमाणें आपला प्रताप गाजवील तसाच प्रकार हल्लीं नाना फडणीसांचा ह्मणण्यास हरकत नाहीं. बाजीराव पेशवा, पण तो खुनशी, कपटी, चंचल, अनिश्चित बुद्धीचा, दुष्ट, मदांध, व्यसनी, उल्लू, घरसोडी वर्तनाचा अशा एकंदर तमाम वाईट व हानिकारक दुर्गुणांचा व दुष्ट स्वभावाचा मूर्तिमंत पुतळा. यामुळें नानांच्या कारस्थानाचा कांहींएक उपयोग होण्यासारखा नव्हता. कैदेंतून सुटका झाल्यावर नानांनीं फडणीशी पत्करिली खरी, पण ती केवळ नाममात्रच. कारण, इकडे नानांची खुशामत करून संपते न संपते तोंच त्याला पुनः कैद करण्याची व त्याचा सर्वंध घात करण्याची मसलत बा-

जीरावाची चालू असावयाची. नानांनीं अमुक एक धोरण ठेविलें कीं, त्यांत बाजीराव विनाकारण मध्यें पडून चुथडा करून सोडावयाचाच. नानांचें धोरण एक तर राव बाजीचे चाळे भलतेच. यामुळें नानांस आपल्या कार्यधुरंधरतेचा प्रभाव कांहीं दाखवितां आला नाहीं. म्हैसूरच्या वाघाशीं लढाई देण्याकरितां इंग्रज सहाय मागत, ह्मणून नानांनीं त्या संबंधाचीं खलबतें चालविलीं. तों हे बडे अक्कलवान मालक टिपूशीं सहाय्य देण्याचा बेत ठरवीत, असा कांहीं एकंदर घोंटाळा होऊन गेला! ह्यामुळें नानांच्या अटोकाट राजकार्यधुरंधरतेचा फर्मास नमुना व अखेरची अक्कलेची कडेलोट, दुनयेस दाखविण्यास मिळाली नाहीं! नाहीं ह्मणावयास इंग्रज, "सबसाइडरी" जाळ्यांत पेशव्यांना अडकवावयाला पहात होते व बडे अक्कलवान् बाजीराव त्या जाळ्यांत पाय ठेवून बसतही होते. परंतु डोळे उघडे ठेवून प्राण जात नाहीं ह्मणतात त्याप्रमाणें नानांनीं बरीच धडपड करून तें विराटस्वरूपी व केवळ कपटमय "जाळें" व तें पसरणारे इंग्रज यांस दूर भिरकावून दिलें! सालबाईच्या तहांत महादजीला पेशव्यांच्या ताटाखालून काढण्याचा कावा इंग्रजांनीं साधला, तसा आतां भोंसल्या संबंधानें करावें असा त्यांचा मानस होता. पण नाना फडणीस कांहीं तसें करूं देईनात. त्यांनीं तो कावा ओळखून तेव्हांच इंग्रजांस लांब धुडकावून सोडिलें. अशी आतां कितीही नानांच्या शहाणपणाची व अक्कलेची कमाल दुनयेस दाखवीत बसलें तरी त्याचा कांहीं उपयोग होण्यासारखा नाहीं! सर्वभक्षक पण खरा निःपक्षपाती काळ आ पसरून नानांच्या शेजारीं बसला होता. नानांला घेतल्याशिवाय परत जावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. ज्वराला पुढें पाठवून आतां आमच्याकडे या असें आमंत्रण यमदूतांनीं नानांस पाठविलें! आणि त्याप्रमाणें मुका-

त्यानें निघून जाणें नानांस भाग पडलें! **नाना फडणीस**, मराठी साम्राज्याला अनेक संकटांतून केवळ आपल्या बुद्धिबलाच्या जोरावर मुक्त करणारा **सन्मित्र;** हैदर, टिपू, इंग्रज, मोंगल असलाल्या–काबेबाज, पूर्ण पटाईत, रणधुरंधर व हरघडी हिंदुपदपातशाहीवर आपल्या उग्र आणि तीक्ष्ण नखांचे पंजे मारणाऱ्या–क्रूर श्वापदांच्या नाकांत वेसणें अडकविणारा वस्ताद **दरवेशी;** अनाथ झालेल्या पेशवाईबाळकास गांजगांजून आणि छळछळून त्राहि त्राहि करीन तरच मी नांवाचा अशा प्रतिज्ञा करून भूत व पिशाचचेष्टा माजविणाऱ्या आनंदीबाई, राघोबा, बाळोबा, मोरोबा इत्यादि खवीस, डांकिणी, पिशाचें, भूतें अशांचा बिलिंदर **पंचाक्षरी;** स्वामिसेवापरायणता, स्वदेश व स्वराज्य यांचा अभिमान, शिस्त, न्याय, खरेपणा इत्यादिकांची चाड; आणि निरालसपणा, कार्यक्षमता इत्यादि बहुदुष्प्राप्य सद्गुणांची **खाण;** जरब, फत्तेमसलत, पेंचपाचांची सुरेख व तात्काळ ओळख, अंगीकृत कार्याची तड लावण्याविषयीं नेट व तडफड, चोहोंकडे सारखी फांकणारी तीक्ष्ण नजर यांचें **अधिस्थान;** मराठ्यांच्या यशसौभाग्याचें **मंगळसूत्र;** शाहाणपणाचें व कार्यधुरंधरतेचें सदा फडफडणारें **निशाण;** व अकलेची आणि तेजस्वी बाणेदारपणाची **सरिता,** असे **फडणीसनाना** शके १७२१च्या फाल्गुन वद्य तृतीयेच्या दिवशीं गुरुवारीं कैलासवासी झाले! त्यांच्या कैलासवासामुळें झालेली हानि भरून यावयाची नाहीं. आणि **नानांच्या** कैलासवासामुळें रिकामी पडलेली त्यांची जागा भरून काढण्याची पुण्याई आणि संधीही परमेश्वरानें आमच्या वांट्यास ठेविली नाहीं! **नाना** कैलासवासी झाल्यावर लगेच त्यांच्याबरोबरच महाराष्ट्रभूच्या सौभाग्यानें, स्वातंत्र्यानें, शाहाणपणानें, शौर्यानें, कार्यधुरंधरतेनें,

स्वाभिमानानें, आणि कर्तृत्वशक्तीनें आपलें प्रयाण करून हा महाराष्ट्रलोक केवळ प्रेतवत् करून सोडला ! हें दुःख भारी असह्य आहे, व त्या दुःखाची आतां अनायासें आठवण झाल्यामुळें पुढील हकीकत ऐकण्यास कोणाचें अवधान राहाणार नाहीं, ह्मणून हातचें कलम येथेंच आखडतें धरावें हें बरें. आणि महाराष्ट्रकविशिरोमणि **मयूरपतांनीं नानांसंबंधानें श्रीगंगेस** प्रार्थना केली तीच आपणही करावी आणि आजचें काम संपवावें.

"गंगे संदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त **नानातें** ॥
"जगतोक माय तूं हें पूर्ण कर मनोरथास या नातें ॥ १ ॥"

# धनुर्धारी.

केसरीपत्रांत "**वाग्वाण**" सोडणारे लेखक "**धनुर्धारी**" यांजकडून निरनिराळीं पुस्तकें आम्हीं लिहविलीं आहेत, तीं छापण्याचें काम चालू आहे. तीं स्वस्त व सत्वर मिळावीं यासाठीं आह्मीं खालील योजना केली आहे. मूळपासून वर्गणीदार झालें पाहिजे.

धनुर्धारीचीं पुस्तकें हवीं असणारांनीं आमच्या दुकानीं **दोन रुपये आगाऊ** भरावेत. निघालेलीं पुस्तकें देऊन निघतील तशीं पाठवीत जाऊं व पोष्टेजसुद्धां हिशेब कळवूं.

सदरप्रमाणें दोन रुपये भरणारांस, पुस्तकांवरील किंमतीच्या **पाऊणपटीनें** तीं मिळतील. पोस्टेज पडेल. असें नेहमीं चालेल. आगाऊ रु. न भरणारांस पुरी किंमत व पोस्टेज.

## ह्या सदराखालीं पुस्तकें निघतात:—

### १ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावलीपैकीं.

( १ ) मराठ्यांच्या मर्दुमकी भाग१ला ८= ( २ ) जवानमर्द ब्राह्मणभाई ( १ बापू गोखले ) ८= ( ३ ) वीरस्नुषा राधाबाई ( ऐतिहासिक ) ८= ( ४ ) जवानमर्द मराठेगडी ( मल्हारराव होळकर ) ८= ( ५ ) शूर अबला ( १ राणी लक्ष्मीबाई झांशीकर, २ ताई तेलीण व ३ कितूर चन्नवा ) ८= ( ६ ) जवानमर्द ब्राम्हणभाई ( उमदेतुल्मुल्ख विठ्ठल शिवदेव विंचूरकर ) ८≡ ( ७ ) मराठ्यांच्या मर्दुमकी भाग२रा (कर्नाटकांतील स्वाऱ्या ) ८≡ (८) हिं०इतिहास ·।= (९)पानपतचा मोहरा ·।-

### २ मुलांचे चिमुकले पुस्तकालयापैकीं.

( १ ) नीतिधर्मपाठ पहिलें पुस्तक ८- ( २ ) आपणावरील जवाबदारी ८-॥ ( ३ ) स्वभाव ८-॥ ( ४ ) अभ्यास ८॥ ( ५ ) आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी ८- इतकीं छापून झालीं.

### ३ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

## ( १ ) आतां पुढें काय करावें—पैसा कसा मिळेल?

किंमत ८८ आणे, ट. हां. ८१

# वधुवरांस देणगी.

# सीता.

श्रीमति जनककन्या रामभार्या हिचें पवित्र चरित्र, तिच्या लहानपणापासून तों ती महाराज्ञीपदारूढ होईपर्यंत आहे. आधींच हें चरित्र रमणीय, त्यांत रचना बाणकादंबरीच्या धर्तीप्रमाणें असल्यामुळें प्रसंगानुसार अंगावर रोमांच उभे राहणें, नेत्रांवाटे ढळढळां अश्रु वाहणें वगैरे विकारांनीं वाचकांचें मन तल्लीन झाल्यावांचून राहतच नाहीं. सीतादेवीचें प्रियभर्त्यावर असलेलें अनुपम प्रेम, आनंदानें वनांत जाणें, तें रामाज्ञेबाहेर क्षणभरही न वागणें, समाधानानें राहणें, मिळेल तें संतोषानें खाणें, रामचित्तास आपलेंसें करून घेणें, दशाननाच्या मधुर भाषणास, वैभवास, क्षणभर तरी महादुःखावस्थेंतही न भुलून रामचरण न विसरणें, इत्यादि **स्त्रीसमाजानें अनुकरण करण्यास** कोणतीही असंभवनीयता पुढें न येतां गुणांचें हुबेहूब खरें चित्र वाचणारांच्या हृदयपटावर सहज उठतें. एकंदरींत रामायणांतील अथपासून रामराज्याभिषेकापर्यंत बहुतेक मुख्य कथाभाग यांत येऊन **अबाढव्य रामायणाचें वाचनश्रेय** हें पुस्तक वाचल्यानें येतें. एकदां वाचावयास आरंभ केला कीं पूर्ण झाल्यावांचून राहवतच नाहीं अशा प्रकारची मनोवेधक भाषारचना आहे. पृष्ठसंख्या ४०० शेंवर.

किं. २ रु. ट. ख. ८॥

---

## संस्कृत कविपंचक–मराठींत.

( कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु, दंडी. )

कै. **विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत**. "ह्यांतील निरूपण नव्या पद्धतीस अनुसरून केलें आहे. पहिल्यानें प्रत्येक कवीच्या कालाचा निर्णय, पुढें त्यांच्या ग्रंथांचा निर्देश व त्याचें विवेचन आणि शेवटीं उत्कृष्ट स्थलांपैकीं कांहींचे उतारे असा क्रम धरलेला आहे. यांत साऱ्या विषयांचा समावेश होऊन मराठी वाचकांस जें **अपेक्षित** आहे तें **सर्व** आलें आहे."

१।८=

---